

# दिवास्वप्न

लेखक:

गिजुभाई बधेका

अनुवाद:

शोभा भागवत

इंडियन इन्स्टिट्यूट
ऑफ एज्युकेशन, पुणे

# दिवास्वप्न

लेखक : गिजुभाई बधेका
अनुवाद : शोभा भागवत

इंडिअन इन्स्टिटयूट ऑव्ह एजुकेशन
जे. पी. नाईक पथ, १२८/२ कोथरूड, पुणे ४११ ०२९

# दिवास्वप्न

**पुनर्मुद्रण :** डिसेंबर २०११

**संपादन/प्रकाशन**
इंडिअन इन्स्टिटयूट ऑव्ह एजुकेशन
१२८/२, जे. पी. नाईक पथ, कोथरूड, पुणे ४११ ०३८

**© इंडिअन इन्स्टिटयूट ऑव्ह एजुकेशन**
**कोथरूड, पुणे ४११ ०३८**

**सजावट :** अनिल उपळेकर

**मुद्रक :** प्रिंट इंप्रेशन्स, हडपसर, पुणे ४११ ०१३

**किंमत :** रु. २०.००

# दोन शब्द

गुजरातमध्ये, भावनगर शहराजवळच्या एका खेड्यात गिजुभाई बधेका यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८८५ रोजी झाला. त्यांचे पूर्ण नाव होते गिरिजाशंकर भगवान बधेका. १५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांची जन्मशताब्दी भारतातील बालशिक्षणप्रेमी संस्थांनी आणि व्यक्तींनी स्नेहभराने साजरी केली.

भारतातील बालशिक्षणाचा पाया गिजुभाईंनी ७० वर्षांपूर्वी घातला. या सुमाराला युरोपमध्ये माँटेसरी, फ्रोबेल, पेस्टालॉझी, रूसो, अशा बालशिक्षणाविषयी आत्मीयतेने व अभिनवतेने विचार मांडणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांचा दृष्टिकोन मोठ्या आदराने समजून घेतला जात होता. त्यांच्या प्रेरणेने बालशिक्षणाचा जोरदार आरंभ नव्या पद्धतीने युरोपमध्ये झाला. प्रत्येक बालकाला स्वतःची आंतरिक विकासशक्ती असते, बालकांमध्ये मुळातच स्वयंशिस्त असते, कारण निसर्गातच स्वयंशिस्त आहे, आणि बालक हे त्या निसर्गाचा एक उच्चतम भाग असतो, असे विचार त्यावेळी नव्या बालशिक्षणाचा पाया घालत होते. लहान मूल म्हणजे ठोकून-पिटून आकार देण्याचा मातीचा गोळा नव्हे, तर तो सामर्थ्याचा झरा असतो, बुद्धिमत्ता, भावना आणि जाणीव असणारा व पूर्णत्वाची तयारी असलेला तो मानव असतो ह्याकडे त्यावेळच्या मानसशास्त्रज्ञांनी समाजाचे लक्ष वेधले. बालशक्तीच्या त्या विचारांनी गिजूभाई बधेका प्रभावित झाले. प्रत्येक बालक मूलतः निर्दोष असते, त्याच्या वेगवेगळ्या आवडीनिवडी असतात, जग समजून घेण्याची त्याची आंतरिक इच्छा असते आणि त्यासाठी आवश्यक असणारे मानसिक सामर्थ्य देखील त्याच्याकडे असते, हा साक्षात्कार गिजूभाईंना झाला. सामान्य पालकांना व शिक्षकांना हे समजावून सांगण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले.

गिजुभाई व्यवसायाने वकील होते पण बालशिक्षणाची आराधना करण्याकरिता त्यांनी वकिली सोडली आणि बनले. जणू काही ते बालकांचे वकील झाले. बालकांना मुक्त विकासाची संधी दिली तरच मानव जातीला सुख आणि शांती मिळू शकेल ही गिजुभाईंची श्रद्धा होती. त्या श्रद्धेतूनच निर्माण झाले आहे त्यांचे 'दिवास्वप्न'. गिजुभाईंचा आवडता मंत्र म्हणजे 'बालदेवो भव'. ह्या मंत्राचे प्रात्यक्षिक गिजुभाईंनी 'दिवास्वप्न' ह्या अलौकिक कथनामध्ये रेखाटले आहे. दिवास्वप्नाचा आशय असा : लक्ष्मीशंकर नावाचे एक शिक्षक शिक्षणाधिकाऱ्याकडे जातात आणि नम्रपणे विनंती करतात की माझ्याकडे एखाद्या प्राथमिक शाळेतला एक वर्ग वर्षभर शिकवायला द्या. त्यांची ही विनंती अधिकारी मान्य करतात पण लहान मुलांना शिकवण्याचे अवघड काम लक्ष्मीशंकर करू शकतील असा त्यांना विश्वास वाटत नाही. तरी देखील लक्ष्मीशंकरांची उत्कट इच्छा पाहून त्यांना प्रयोग करण्याची परवानगी अधिकारी-महाशय देतात. ह्या प्रयोगाचे वर्णन म्हणजे 'दिवास्वप्न'. हे 'दिवास्वप्न' काल्पनिक मात्र नाही. गिजुभाईंनी प्रत्यक्षपणे घेतलेल्या शैक्षणिक अनुभवांचेच ते रम्य दर्शन आहे. लक्ष्मीशंकरांसारखे प्राथमिक शिक्षक भारतात सर्वत्र तयार व्हावेत हेच खरोखर गिजुभाईंचे स्वप्न !

गिजुभाईंनी आपल्यासमोर ठेवलेले 'दिवास्वप्न' म्हणजे शिक्षकांच्या कृतिशीलतेला, नवनिर्माणाच्या जिद्दीला केलेले आव्हान आहे. हे 'दिवास्वप्न' समजून घेऊन प्राथमिक शिक्षक-शिक्षकांनी लक्ष्मीशंकरच्या मनोभूमिकेशी समरस व्हावे आणि 'बालदेवो भव' या मंत्राचा प्रत्यय त्यांच्या कार्यात यावा, हे गिजुभाईंचे खरे स्वप्न. ते स्वप्न साकार व्हावे, प्राथमिक शिक्षणाचे आजचे अंधारलेले चित्र सुप्रकाशित व्हावे, ह्या हेतूने 'दिवास्वप्न' चा हा मराठी अनुवाद पालकांच्या व शिक्षकांच्या हाती देत आहोत.

अनुवादाचे काम श्रीमती शोभा भागवत यांनी मोठ्या हौसेने आणि गिजुभाईंच्या भावनांशी एकरूप होऊन केले याबद्दल त्यांचे मनःपूर्वक कौतुक व आभार. 'दिवास्वप्न' मराठीत अनुवादित करून ते प्रसिद्ध करण्याचा प्रेमळ आग्रह आमचे स्नेही श्री. अरविंद गुप्ता यांनी धरला, त्यांना धन्यवाद. भारत सरकारच्या मनुष्यबळ मंत्रालयातील अतिरिक्त सचिव श्री. अनिल बोर्डिया यांनी प्रकाशनाची सोय करून दिली त्यासाठी त्यांचे ऋण मानावे तेवढे थोडे. वाचक-मित्रहो, चला आता एकसाथ म्हणूया, "बालदेवो भव!"

चित्रा नाईक

# दिवास्वप्न

## भाग पहिला

### प्रयोगाचा प्रारंभ

(१)

शिकवावं कसं, याबद्दल मी बरंच वाचलं होतं. खूपसा विचारही केला होता पण मला प्रत्यक्ष कामाचा अनुभव नव्हता. मी ठरवलं, आता प्रत्यक्ष अनुभव घ्यायला हवा. अनुभवानंच आपले विचार पक्के होतील. प्रत्यक्ष काम करता करताच आजवरचे विचार किती अर्थपूर्ण आणि किती निरर्थक आहेत हे पण लक्षात येईल.

मी शिक्षण खात्यातल्या एका मोठ्या अधिकाऱ्यांना भेटलो आणि त्यांना विनंती केली की मला प्राथमिक शाळेचा एक वर्ग शिकवायला द्या.

ते अधिकारी जरासं हसले आणि म्हणाले— " हा विचार सोडून द्या. हे काम तुमच्याकडनं व्हायचं नाही. मुलांना शिकवायचं. आणि तेसुद्धा प्राथमिक शाळेतल्या मुलांना, म्हणजे कर्मकठीण काम आहे. तुम्ही आहात लेखक आणि विचारवंत. खुर्चीवर बसून लेख लिहिणं सोपं आहे आणि कल्पनेत शिकवणं तर त्याहून सोपं. प्रत्यक्ष काम करणं आणि त्यात यशस्वी होणं फार कठीण आहे. "

मी म्हटलं, " म्हणून तर मला स्वतःला अनुभव घ्यायचा आहे. मला माझ्या कल्पनांमध्ये वास्तवता आलेली पाहायची आहे. "

माझा चिवटपणा पाहून ते अधिकारी म्हणाले, " ठीक आहे. तुमचा एवढा आग्रह आहे तर खुशाल एक वर्षभर अनुभव घ्या. प्राथमिक शाळेचा एक चौथीचा वर्ग मी तुम्हाला देतो. हा चौथीचा अभ्यासक्रम. ही चौथीची पाठ्यपुस्तकं आणि हे शिक्षणखात्याचे सुट्यांचे वगैरे नियम. "

मी अतिशय आदरानं त्या सगळ्या गठ्ठ्याकडे पाहिलं. अभ्यासक्रम हातात घेऊन खिशात ठेवला आणि पुस्तकं दोरीनं बांधू लागलो.

साहेब म्हणाले, " हे पाहा, तुम्हाला काय हवे ते प्रयोग करण्याचं स्वातंत्र्य आहेच. त्यासाठी तर तुम्ही आला आहात. पण हेही लक्षात ठेवा की वर्षअखेरीला परीक्षा होईल आणि तुमचं काम शेवटी परीक्षेच्याच मापानं मोजलं जाईल. "

मी म्हटलं, "कबूल आहे, पण माझी एक दुसरी विनंती आहे की परीक्षक म्हणून आपण स्वतः यावं. आपणच माझ्या कामाचं मूल्यमापन करावं. आपण मला प्रयोग करण्याची संधी देत आहात, तेव्हा आपल्यालाच काम दाखवून मला समाधान मिळेल. माझ्या यशापयशाची कारणं आपल्यालाच समजू शकतील. "

साहेबांनी हसून मान्य असल्यासारखी मान डोलवली. आणि मी कार्यालयातून बाहेर पडलो.

(२)

मी सगळा अभ्यासक्रम पाहिला होता. त्यात काही फेरफार करता येतील असा मला विश्वास होता. पाठ्यपुस्तकंसुद्धा मी बसल्या बैठकीत चाळून पाहिली. त्यातले गुणदोष मला दिसू लागले. त्यात काय काय

सुधारणा करता येतील त्याबद्दलही मी विचार केला. मनातल्या मनात पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंतच्या कामाचं एक चित्र उभं राहिलं. परीक्षेत काय होईल, निकालाच्या दिवशी काय होईल याची पण काही एक कल्पना मी मनात केली. आणि वर्षभर असंअसं काम केलं की त्याचा हा परिणाम होईल असे काही आडाखे बांधले. विचार करता करता रात्रीचे दोन कधी वाजले पत्ताही लागला नाही. शेवटी दुसऱ्या दिवशी वर्गात काय काय घ्यायचं ते लिहून ठेवून मी तीन वाजता अंथरुणाला पाठ टेकली.

सकाळ झाली. उत्साह होता. श्रद्धा होती. उत्सुकता होती. अंघोळ वगैरे करून नाश्ता करून मी वेळेवर तीन नंबरच्या शाळेत पोचलो. शाळेचा दरवाजा अजून उघडला नव्हता. आमचे मुख्याध्यापकसुद्धा आले नव्हते. शिपाई त्यांच्या घरी किल्ली आणायला गेला होता. मुलं येऊ लागली होती आणि रस्त्यावर त्यांचा दंगाही सुरू झाला होता.

माझे विचार धावत होते. केव्हा एकदा शाळा उघडेल आणि आपण आपल्या वर्गाचं काम सुरू करू असं मला झालं होतं. आपण आपल्या नव्या योजना प्रत्यक्षात आणू. वर्गात मुलांना व्यवस्थित आणि शांत बसवू. रसिकपणे पाठ घेऊ आणि मुलांची मनं जिंकून घेऊ. अशा विचारांचा प्रवाह माझ्या डोक्यात जोरानं वाहत होता.

घंटा वाजली. मुलं वर्गात येऊन बसली. मुख्याध्यापकांनी माझ्याबरोबर येऊन मला माझा वर्ग दाखवला आणि ते मुलांना म्हणाले, "हे पाहा, आजपासून हे तुमचे शिक्षक आहेत. यांचं नाव श्री. लक्ष्मीशंकर. ते सांगतील तसं वागा. त्यांची आज्ञा पाळा. गडबड करू नका."

मुख्याध्यापक बोलत होते आणि इकडे मी माझ्या वर्षभराच्या सोबत्यांकडे पाहत होतो. कुणी हसला, कुणी डोळे तिरके केले, कुणी डोळा मारला, कुणी मान वेळावली, कुणी माझ्याकडे आश्चर्यानं तर कुणी टिंगलीच्या नजरेनं पाहत होते. कुणी नुसतेच स्तिमित झाले होते.

त्या मुलांना मला शिकवायचं होतं! त्या टिंगलबाज, दंगेखोर, वात्रट, जादा मुलांना! मी थोडा बिचकलो. छातीतली धडधडही थोडी वाढली. पण विचार केला, "हरकत नाही. हळूहळू सवय होईल!"

आदल्या रात्री टिपून ठेवलेल्या गोष्टी मी खिशातून कागद काढून पाहिल्या. लिहिलं होतं— प्रथम शांतीचा खेळ. मग वर्गाच्या स्वच्छतेची पाहणी. मग समूहगीत. मग गप्पा इत्यादी.

मी मुलांना म्हटलं, "चला आपण शांतीचा खेळ खेळूया. बघा हं, आता मी "ॐ शांतिः" म्हणीन, तेव्हा सर्वांनी अगदी गुपचूप बसून राहायचं. नीट मांडी घालून बसा. कुणीही हलायचं नाही. मग मी दार बंद करीन. अंधार होईल. तुम्ही सर्वांनी शांत राहायचं. तुम्हाला आजूबाजूचा कोलाहल ऐकू येईल. तो ऐकायला खूप गंमत वाटेल. तुम्हाला माशांची गुणगुण ऐकू येईल. तुम्हाला स्वतःचा

केव्हा एकदा शाळा उघडेल आणि आपण आपल्या वर्गाचं काम सुरू करू असं मला झालं होतं. आपण आपल्या नव्या योजना प्रत्यक्षात आणू. वर्गात मुलांना व्यवस्थित आणि शांत बसवू. रसिकपणे पाठ घेऊ आणि मुलांची मनं जिंकून घेऊ.

श्वासोच्छ्वाससुद्धा ऐकू येईल. मग मी गाणं म्हणीन. तुम्ही ऐकायचं."

एवढं सांगून झाल्यावर मी शांतीचा खेळ सुरू केला. मी " ओम् शांतिः " म्हटलं पण मुलं बडबड करत होती. आपसात धक्काबुक्की चालूच होती. दोन चारदा मी " ओम् शांतिः " म्हणालो. पण मुलांनी तिकडे मुळीच लक्ष दिलं नाही. जसा काही मी एकटाच बडबडत होतो ! मी मनात हबकलो. " गप्प बसा. गडबड करू नका. " असं कसं म्हणणार ? कुणाला तरी धपाटा मारून सर्वांना घाबरवून कसं सोडणार ? जाऊद्या ! मी पुढे होऊन खिडक्या बंद केल्या. अंधार झाला. आणि ध्यान (?) सुरू झालं. मुलांमधून कुणी 'ऊं ऊं' आवाज काढले. कुणी " हाऊऽ हाऊऽ " असे आवाज काढले. कुणी धाडधाड पाय वाजवू लागले. एवढ्यात एकानं टाळ्या वाजवायला सुरुवात केली. सर्वजण टाळ्या वाजवू लागले. एवढ्यात कोणीतरी हसलं. आणि सगळे हसू लागले. आता माझा धीर खचला. मी पांढरा फटक पडलो. मी खिडक्या उघडल्या आणि थोडा वेळ वर्गाबाहेर जाऊन परत आलो. वर्गात हल्लागुल्ला चालू होता. मुलं एकमेकांना " ओम् शांतिः " म्हणत होती. काही मुलं उठून स्वतःच खिडक्या बंद करत होती.

माझ्या मनात आलं माझं हे टिपण काही कामाचं नाही ! घरात बसल्या बसल्या नोटस् काढून कल्पनेत शिकवणं सोपं होतं. पण हे तर कठीण काम आहे. जी मुलं आजवर गडबड गोंधळात आणि दंगाधोपा करत मोठी झालीत त्यांचा शांतीचा खेळ घेणं म्हणजे गाढवापुढं गीता वाचण्यासारखं होतं ठीक आहे. काही बिघडलं नाही. पहिल्याच दिवशी हा प्रश्न पुढे आला ते चांगलंच झालं. उद्यापासून नवीन प्रकारे काम सुरू करू.

मी वर्गात आलो आणि मुलांना म्हटलं, " मित्रहो, आज आता आणखी काही अभ्यास नको करायला. आता उद्यापासून आपलं नवं काम सुरू होईल. आज सुट्टी. मजा करा. "

" सुट्टी " शब्द ऐकल्याबरोबर मुलं होऽऽहोऽऽ करत वर्गाबाहेर धावली. आणि सगळ्या शाळेत खळबळ माजली. सगळीकडे ' सुट्टीऽ सुट्टीऽ 'चे आवाज घुमले. मुलं नाचत बागडत उड्या मारत घराकडे धावत सुटली.

शेजारचे शिक्षक आणि विद्यार्थी पाहातच राहिले. " हे काय चाललंय ? " मुख्याध्यापक एकदम माझ्यापाशी आले आणि कपाळाला आठ्या घालून बोलले, " तुम्ही यांना सुट्टी कशी दिलीत ? अजून दोन तास बाकी आहेत. "

मी म्हटलं, " मुलांची आज शिकायची इच्छा नव्हती. ती शांत बसायला तयारच नव्हती. शांतीच्या खेळात मला ते कळलं. "

मुख्याध्यापक कडकपणे म्हणाले, " पण अशी आधी विचारल्याशिवाय तुम्हाला सुट्टी देता येणार नाही. एका वर्गाची मुलं घरी गेली तर दुसरी शाळेत राहातील का ? असले हे प्रयोग इथे चालणार नाहीत."

पुन्हा जरा रागातच ते म्हणाले, " मुलांना शिकायची इच्छा नव्हती न् बिच्छा नव्हती हे मला

**घरात बसल्या बसल्या नोटस् काढून कल्पनेत शिकवणं सोपं होतं. पण हे तर कठीण काम आहे. जी मुलं आजवर गडबड गोंधळात आणि दंगाधोपा करत मोठी झालीत त्यांचा शांतीचा खेळ घेणं म्हणजे गाढवापुढे गीता वाचण्यासारखं होतं.**

शिकवू नका. शांतीचा खेळ कसला घेता? तो मॉन्टेसरीत घेतात. इथे प्राथमिक शाळेत एक मुस्कटात मारली की झटकन् सगळे गप्प बसतात. सगळे शिक्षक नियमाप्रमाणे शिकवतात. तुम्ही पण तसं शिकवायला लागा म्हणजे वर्षभरात काहीतरी परिणाम दिसायला लागेल. आजचा दिवस तर असाच फुकट गेला. पोरं गेली उनाडायला!"

मला आमच्या मुख्याध्यापकांची दया आली. मी म्हटलं, "गुरुजी, मुस्कटात मारून तर इतर सगळे शिकवतातच आहेत आणि त्याचा परिणामही मी पाहतो आहे. मुलं अत्यंत असभ्य, जंगली, दंगेखोर, अव्यवस्थित आहेत. मला हे पण दिसतंय की चार वर्षं थोडी ओळख वाढवली पाहिजे. माझ्याबद्दल त्यांना थोडा विश्वास निर्माण झाला पाहिजे. त्यांना प्रेम वाटलं पाहिजे, रस वाटला पाहिजे. तेव्हा कुठे ती माझं म्हणणं ऐकतील आणि तसं करतील. जिथे मुलांना शाळेपेक्षा सुट्टी जास्त आवडते तिथे काम करणं म्हणजे भगीरथासारखं स्वर्गातून गंगेला खाली आणणं आहे."

उद्यापासून काय कसं घ्यायचं ते ठरवलं आणि मी अंथरुणावर पडलो. रात्रभर आज घडलं त्याची आणि उद्यापासून जे करायचं ठरवलं त्याची स्वप्नं पडत होती.

> मुस्कटात मारून तर इतर सगळे शिकवतातच आहेत आणि त्याचा परिणामही मी पाहतो आहे. मुलं अत्यंत असभ्य, जंगली, दंगेखोर, अव्यवस्थित आहेत.
>
> जिथे मुलांना शाळेपेक्षा सुट्टी जास्त आवडते तिथे काम करणं म्हणजे भगीरथासारखं स्वर्गातून गंगेला खाली आणणं आहे.

मुलं इथे 'हा हा' 'ही ही' करायला, टाळ्या पिटायलाच शिकलीत. त्यांना शाळेबद्दल काही प्रेम नाही. 'सुट्टी' हा शब्द कानावर पडला नं पडला तोच सगळे धावत बाहेर गेले उड्या मारत."

मुख्याध्यापक म्हणाले, "आता तुम्ही काय दिवे लावता ते आम्हीही बघूच."

मी हताश होऊन कसेबसे पाय रेटत घरी आलो. पडल्या पडल्या विचार करू लागलो, "बाबा रे, काम तर कठीण आहेच, पण यातच खरी परीक्षा आहे. काळजी करू नकोस. हिंमत सोडू नको. असा कुठे शांतीचा खेळ होतो का? मॉन्टेसरी पद्धतीत या खेळासाठी पहिल्यापासून केवढी सवय करतात! मी पण थोडा मूर्खच आहे! नाहीतर पहिल्याच दिवशी कशाला हा खेळ घेतला असता! प्रथम या मुलांशी

## (३)

शाळा उघडली आणि मी वर्गात गेलो. मुलांनी माझ्या भोवती घोळका केला आणि अगदी जराही न घाबरता ती मला चेष्टेत म्हणू लागली, "गुरुजी, आजपण सुट्टी द्या ना. आजपण सुट्टी. सुट्टी. सुट्टी.!"

मी म्हटलं, "ठीक आहे, ऐका. आजपण सुट्टी देईन पण सबंध दिवसभर नाही. दोन तास. आता चला. मी तुम्हाला एक गोष्ट सांगणार आहे. तुम्ही सगळ्यांनी ऐकायची. नंतर मग आपण आणखी गप्पा मारू."

मी लगेच गोष्ट सांगायला सुरुवात केली.

"एक होता राजा. त्याच्या सात राण्या होत्या. त्या सातजणींना सात राजपुत्र होते आणि सात राजकन्या होत्या."

गडबड, गोंधळ, गलका करत सगळी मुलं माझ्याभोवती बसली. मी गोष्ट सांगता सांगता थोडा वेळ थांबलो आणि म्हणालो, "हे बघा, सगळे नीट बसा. असं नाही बसायचं."

मुलांनी नीट बसल्यासारखं केलं आणि म्हणू लागली, "पुढे काय झालं सांगा ना लवकर. लवकर सांगा गोष्ट."

मी हसत हसत सुरुवात केली—

"त्या सात राजकन्यांचे सात सात राजमहाल होते आणि एकेका महालात सात सात मोत्यांची झाडं होती."

मुलं डोळे विस्फारून गोष्ट ऐकू लागली. सगळा वर्ग चूपचाप होता. कुणी बोलत नव्हतं की हलत नव्हतं. मुख्याध्यापकांना वाटलं असावं, 'काय चाललंय काय या वर्गात! एवढी शांतता!' ते आलेच वर्गात. मला म्हणाले, "काय चाललंय? गोष्ट सांगता आहात काय?"

मी म्हटलं, "होय गुरुजी. गोष्ट आणि हा नवा शांतीचा खेळ दोन्ही एकदम चालू आहे."

मुख्याध्यापक परत फिरले. माझी गोष्ट चालू झाली. शेजारपाजारच्या वर्गांमध्ये खूप गोंगाट चालू होता. मी म्हटलं, "बघा बरं किती आवाज चाललाय शेजारच्या वर्गात!" सगळ्या मुलांनी त्याबद्दल तोंडं वाकडी केली. नापसंती व्यक्त केली.

गोष्ट मध्यावर आली आणि मी म्हटलं, "बोला मंडळी, सुट्टी हवी असेल तर थांबू या, नाहीतर पुढे सांगू या गोष्ट."

सगळे म्हणाले, "सांगा, सांगा. आम्हाला सुट्टी नको. गोष्ट पाहिजे."

मी म्हटलं, "वा! छान! आता गोष्ट पुढे ऐका हं!" पण मी म्हटलं, "मध्ये जरा थोड्या गप्पा मारू या. मग मात्र घंटा होईपर्यंत मी गोष्ट सांगीन."

एक मुलगा म्हणाला, "नाही नाही. गप्पा उद्या. आत्ता गोष्ट सांगा. पुरी करा."

मी म्हटलं, "पुरी कशी करू? गोष्ट तर इतकी मोठी आहे की चार दिवस संपणार नाही."

सगळे म्हणाले, "बाप रे! एवढी मोठी गोष्ट? मग तर जाम मजा येईल!"

मी खिशातून रजिस्टर काढलं आणि नावं लिहायला लागलो. सगळ्यांनी एक एक करून आपली नावं सांगितली. अगदी चटपट. मग मी हजेरी घेतली आणि म्हटलं, "मुलांनो, आपण आता रोज गोष्ट सांगायच्या आधी हजेरी घ्यायची आणि मग गोष्ट—" एवढं सांगून मी जी गोष्ट सुरू केली ती एकदम घंटा होईपर्यंत.

शाळेची वेळ संपली होती, पण मुलं म्हणत होती, "नाही नाही. जायचं नाही. अजून बसा ना. गोष्ट सांगा पुढे."

मी म्हटलं, "आता खरंच बास! उद्या." मग विचारलं, "उद्या सुट्टी का गोष्ट?" सगळे म्हणाले, "गोष्ट गोष्ट गोष्ट." असं म्हणून सगळी मुलं पळाली.

काल मुलं गेली तेव्हा "सुट्टी सुट्टी सुट्टी!"चा आवाज घुमला होता. आज सगळीकडे "गोष्ट गोष्ट गोष्ट" घुमत होता.

मी मनाशी म्हटलं, "चला. आजचा दिवस तर गेला. खरंच! गोष्ट म्हणजे एक अजब जादू आहे. आणि खरोखरच उपयोगी आहे!"

## (४)

दुसऱ्या दिवशी सकाळी सगळी मुलं हसतमुखानं आली आणि मी वर्गात पोचल्या पोचल्या ढकलाढकली करत एकमेकांच्या अंगावर पडत माझ्याभोवती जमली. म्हणाली, "चला चला गुरुजी. आता गोष्ट सांगा."

मी म्हटलं, "आधी हजेरी मग थोड्या गप्पाटप्पा आणि मग आपली गोष्ट."

खिशातून खडू काढून मी एक गोल आखला आणि म्हटलं, " आता रोज असे बसत जा बरं का. " मी बसून दाखवलं आणि म्हणालो, " असे. ही माझी जागा. मी इथे बसून गोष्ट सांगणार. "

सगळे बसले. मी पण बसलो. हजेरी घेतली आणि गोष्ट सुरू केली. सगळ्यांचं पूर्ण लक्ष होतं. गोष्ट रंगात आली. सगळे मंत्रमुग्ध होऊन पुतळ्यांसारखे शांत बसून गोष्ट ऐकत होते. मध्येच गोष्ट थांबवून मी विचारलं, " आवडतेय् का गोष्ट ? सांगा. "

" होऽऽ. आम्हाला तर गोष्ट खूऽऽप आवडतेय्. "

" जशी तुम्हाला गोष्ट ऐकायला आवडते तशी गोष्ट वाचायलापण आवडते का ? "

" हो तर ! आम्हाला वाचायलापण आवडते. पण अशी पुस्तकं आहेत कुठे ? "

" जर मी गोष्टीची अशी पुस्तकं तुम्हाला आणून दिली तर तुम्ही वाचणार का ? "

" वाचू ना. नक्की वाचू. "

इतक्यात एक चुणचुणीत मुलगा म्हणाला, " पण तरी तुम्ही गोष्ट सांगायचीच बरं का. आम्हीच आपलं आपलं वाचायचं हे नाही चालणार. "

मी म्हटलं, " कबूल ! " आणि पुढे गोष्ट सांगायला सुरुवात केली.

घंटा झाली आणि माझी गोष्ट थांबली. सगळे मला घेराव घालून उभे राहिले. काही माझ्याकडे प्रेमानं पाहात होते. काहींनी हळूच माझ्या हाताला हात लावला. एकूण मुलं खूष दिसत होती.

मी म्हटलं, " चला. पळा आता. शाळा सुटली, घरी जा. "

मुलं म्हणाली, " आम्ही नाहीच जाणार. तुम्ही गोष्ट सांगा. आम्ही अंधार पडेपर्यंत बसू. "

मुलं गेली आणि काही शिक्षक माझ्याजवळ आले. म्हणायला लागले, " गुरुजी, तुम्ही तर कमाल केली. आता आमच्या वर्गातल्या मुलांना पण गोष्ट हवी आहे. त्यांचं अभ्यासाकडे आजकाल लक्षच नाही. सारखं म्हणतात आम्ही गोष्ट ऐकायला जाऊ, नाहीतर तुम्ही आम्हाला गोष्ट सांगा. "

मी म्हटलं, " मग सांगत जा ना गोष्टी. "

ते म्हणाले, " इथे कुणाला येतायत गोष्टी सांगायला ? एकतरी गोष्ट आठवली पाहिजे ना ! तर ती सांगणार ! "

मी मिशीतल्या मिशीत हसत राहिलो.

## (५)

दुसऱ्या दिवशी रविवार होता. मी मोठ्या साहेबांना भेटायला गेलो.

साहेब म्हणाले, " का हो, मुख्याध्यापक तर म्हणत होते तुम्ही दिवसभर गोष्टच सांगत असता. "

मी म्हटलं, " हो ना ! अजून गोष्टच चाललीय. "

साहेब म्हणाले, " मग प्रयोग केव्हा करणार ? आणि अभ्यास कसा पुरा होणार ? "

मी म्हटलं, " साहेब, प्रयोगच तर चालला आहे. आता मला खरं पटलं की, शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना एकमेकांजवळ आणायला गोष्टीसारखी दुसरी जादू नाही. पहिल्या दिवशी जी मुलं माझा एक शब्द ऐकायला तयार नव्हती आणि 'हा हा', 'ही ही' करून माझी टिंगल करत होती तीच मुलं गोष्ट ऐकायला मिळते म्हटल्यावर शांत झाली आहेत. आता माझ्याकडे प्रेमानं पाहू लागली. माझं ऐकू लागलीत. मी सांगीन तसं बसायला लागलीत. " गप्प बसा. गडबड करू नका " हे तर मला कधीच म्हणावं लागत नाही. आणि वर्गातून जा म्हटलं तरी ती जायला तयार नसतात. "

साहेब म्हणाले, " ठीक ठीक. हे सगळं कळलं पण आता नवीन पद्धतीनं शिकवायला कधी सुरुवात करणार ?"

मी म्हटलं, " साहेब, हीच तर नवी पद्धत आहे शिकवण्याची. गोष्ट सांगता सांगता आज मी त्यांना व्यवस्थित बसायला शिकवतोय. नियमित हजेरीची सवय लावतोय. लक्ष केंद्रित करायला शिकवतोय. भाषा आणि साहित्याची ओळख होते आहे. हळूहळू इतर काही गोष्टी पण शिकवायला सुरुवात होईल. "

साहेब म्हणाले, " पाहा बरं. नाहीतर गोष्टच सगळं वर्ष खाऊन टाकेल. "

मी म्हटलं, " साहेब, तशी काही काळजी करू नका. "

सगळ्यांनी आपल्या टोप्या पाहिल्या. एखाद–दुसऱ्या मुलाचीच टोपी बरी होती.

मी म्हटलं, " आता बघा बरं, तुमच्या सदऱ्याची बटणं धड आहेत का ? "

मग मी म्हटलं, " आता आज आणखी तपासणी नको करायला. गोष्टीला उशीर होतोय ना! " एवढं बोलून मी गोष्टीला सुरुवात केली.

गोष्ट चालू असताना मध्येच एका मुलानं विचारलं, " गुरुजी, गोष्टीच्या पुस्तकांचं काय झालं ? "

> शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना एकमेकांजवळ आणायला गोष्टीसारखी दुसरी जादू नाही. पहिल्या दिवशी जी मुलं माझा एक शब्द ऐकायला तयार नव्हती आणि ' हा हा ', ' ही ही ' करून माझी टिंगल करत होती तीच मुलं गोष्ट ऐकायला मिळते म्हटल्यावर शांत झाली आहेत. आता माझ्याकडे प्रेमानं पाहू लागली. माझं ऐकू लागलीत. मी सांगीन तसं बसायला लागलीत.
>
> हीच तर नवी पद्धत आहे शिकवण्याची. गोष्ट सांगता सांगता आज मी त्यांना व्यवस्थित बसायला शिकवतोय. नियमित हजेरीची सवय लावतोय. लक्ष केंद्रित करायला शिकवतोय. भाषा आणि साहित्याची ओळख होते आहे. हळूहळू इतर काही गोष्टीपण शिकवायला सुरुवात होईल.

## (६)

गोष्टीसाठी सगळी मुलं गोल बसली होती. मी फळ्यावर लिहिलं—

" आजचं काम. हजेरी, गप्पा, गोष्ट. "

हजेरी घेतल्यावर मी गप्पा सुरू केल्या. मी म्हटलं, " जरा बघू बरं, तुमची नखं किती वाढलीत. सगळ्यांनी उभं राहून आपले हात दाखवा. "

सगळ्या मुलांची नखं वाढली होती. नखात घाणपण खूप साठली होती.

मी म्हटलं, " तुमच्या टोप्या हातात घ्या आणि बघा किती मळल्यात आणि कशा फाटक्या तुटक्या दिसतायत. "

मी म्हटलं, " एक दोन दिवसांत घेऊन येईन. कुणाला गोष्टीची पुस्तकं वाचायचीत ? हात वर करा. "

सगळ्यांचे हात वर झाले.

मी विचारलं, " तुम्ही आत्तापर्यंत गोष्टींची कोणती कोणती पुस्तकं वाचलीत ? नावं सांगा. " काही मुलांनी दोनचार गोष्टी वाचल्या होत्या. ती मुलं चौथीत आली होती तरी आजवर पाठ्यपुस्तकं सोडली तर इतर पुस्तकं त्यांनी फारच कमी वाचली होती.

मी विचारलं, " तुम्ही कुणी मासिकं वाचता का ? " दोघांनी सांगितलं, " गुरुजी, आम्ही बालमित्र वाचतो. "

मी म्हटलं, "ठीक आहे. मी गोष्टी आणीन. तुम्ही वाचा. इतक्या गोष्टी आणीन की तुम्ही वाचता वाचता दमून जाल."

सगळी मुलं एकदम खूष दिसत होती.

मग जी गोष्ट सुरू झाली ती थेट घंटा होईपर्यंत. सुट्टी झाली आणि मी म्हटलं, "मंडळी, एक जरा ऐकता का ? गोलावर बसून ऐका. उद्या ही नखं कापून या बरं का. आपल्याला आली तर आपण स्वतः कापायची, नाही तर वडलांना सांगायचं, नाही तर न्हावी आला तर त्याच्याकडून कापून घ्यायची."

एक म्हणाला, "मी तर आपला दातानं तोडीन."

मी म्हटलं, "नको बाबा. असं नको करू. नखं कात्रीनं कापावीत, नाहीतर चाकूनं."

मी परत म्हटलं, "आपण आणखी एक नाटक करू या."

सगळे म्हणाले, "कशाचं नाटक ?"

"तुम्ही टोप्या न घालताच शाळेत या. ही मळकी टोपी करायची काय ? आणि आपल्याला या टोपीची गरजच काय आहे ?"

सगळे हसले. म्हणाले, "नको रे बाबा. टोप्या न घालता शाळेत कसं यायचं ? हेडमास्तर रागावतील की !"

मी म्हटलं, "उद्यापासून मी पण टोपी न घालता येईन. तुम्ही पण या."

मुलं म्हणाली, "पण वडील नको. म्हणाले तर ?"

"मग सांगा ना, की हे कशाला उगीच ओझं!" मळकी टोपी घालण्यापेक्षा न घातलेली चांगली."

मी आणखी पुढे म्हणालो, "आणखी सदऱ्याची बटणं लावून या बरं का. असं बरं दिसत नाही." सगळे मनात विचार करत करत घरी गेले.

रस्त्यात माझी मुख्याध्यापकांशी गाठ पडली. म्हणाले, "मास्तर, तुमचं काहीच्या बाहीच चाललंय ! ही काय ढोंगं लावलीत ? नखं कापा काय, बटणं लावा काय ! एक ना दोन ! नवीन पद्धतीनं शिकवणार आहात तर शिकवा नं ! बाकीची ही कामं पालकांची आहेत. त्यांना पाहिजे तर ते करतील, नाही तर आपल्याला काय घेणं आहे ? आणि हे पण लक्षात ठेवा की मुलं जर का टोप्या न घालता शाळेत आली तर मी त्यांना शाळेत घेणार नाही. हा असभ्यपणा चालणार नाही. असल्या गोष्टींसाठी साहेबांच्या हुकमाची जरुरी आहे."

मी म्हटलं, "गुरुजी, हीच तर शिकवण्याची नवी पद्धत आहे. कळकट मळकट आणि अस्ताव्यस्त मुलांना पहिल्या प्रथम हेच शिकवायला हवं. आता तुम्हीच पाहा ना, जेव्हा मी मुलांना हे सांगितलं, तेव्हा सगळ्यांना लाज तर वाटली. त्यांच्या मनात निदान विचार तरी आला आहे की असं गलिच्छ राहणं बरं नाही. माझी खात्री आहे की यापुढे बरीच मुलं स्वच्छ स्वच्छ राहायचा प्रयत्न करतील. आता राहिलं फक्त टोप्यांचं. त्याविषयी मी मोठ्या साहेबांचं मत विचारतो. आणि एवढी खात्री बाळगा की त्यांची परवानगी मिळाली नाही तर हा बदल मी करणार नाही."

मी घरी गेलो. जेवण केलं आणि लगेचच मोठ्या साहेबांच्या घरी गेलो.

"या. या. यावेळी इकडे ?"

"साहेब, एका बाबतीत आपलं मत विचारायचं होतं."

"विचारा ना. काय आहे ?"

"मी आणि माझे विद्यार्थी वर्गात टोप्या न घालता आलो तर चालणार नाही का ?"

"का पण ? कशासाठी ?"

"त्यांच्या टोप्या, अहो, इतक्या गलिच्छ आणि फाटक्या आहेत की ते टोप्या न घालता आले तर काय बिघडलं ? या वयात त्यांच्या डोक्यावर हे ओझं नसलं तर काही बिघडेल का ?"

"पण लोकांना ते विचित्र आणि हास्यास्पद नाही वाटणार ?"

" वाटेल ना, पण याबद्दल आपलं मत काय आहे ? "

"माझं मत विचाराल तर तुमच्या त्या प्रयोगात अशा सामाजिक गोष्टींमध्ये तुम्ही न शिरणं चांगलं. आपल्याला आपल्या शाळेच्या चार भिंतींच्या आत राहून आजच्या शिक्षण पद्धतीत काय सुधारणा करता येईल एवढंच पाहायचंय. टोप्या बिप्यांचं सोडून द्या बुवा. "

मी म्हटलं, " मला आपला हा विचार थोडा संकुचित वाटतो. पण ठीक आहे. मी आज काही त्यावाचून अडून राहाणार नाही. सुरुवातीलाच आपला आणि लोकांचा रोष मला ओढवून घ्यायचा नाही. "

साहेब म्हणाले, " सध्यातरी हा विचार सोडून द्या. "

मी म्हटलं, " माझ्यापाशी दुसरीही एक योजना आहे. आपण मान्यता दिलीत तर ती प्रत्यक्षात येईल. योजना अशी की प्रत्येक विद्यार्थ्याला पाठ्यपुस्तकं तर घ्यावीच लागतात. चौथीचं भाषेचं पुस्तक, त्याचं गाइड, इतिहासाचं पुस्तक— सगळीच पुस्तकं सगळी मुलं विकत घेतात नाही का ? "

" हो हे खरं आहे. "

" आता मला असं म्हणायचंय् की मुलांनी ही पाठ्यपुस्तकं विकत न घेता त्याच किमतीत इतर चांगली वाचण्याजोगी पुस्तकं खरेदी केली आणि त्यांचा एक संग्रह बनवला तर ? "

**मुलांनी ही पाठ्यपुस्तकं विकत न घेता त्याच किमतीत इतर चांगली वाचण्याजोगी पुस्तकं खरेदी केली आणि त्यांचा एक संग्रह बनवला तर ?**

" अच्छा अच्छा ! पण पाठ्यपुस्तकं नसतील तर तुम्ही शिकवणार काय ? "

" साहेब, त्याचा विचार मी केलाय्. शिकवण्याच्या पद्धतीतल्या बदलावर माझा पूर्ण विश्वास आहे. मी आपल्याला काम करून दाखवीन. याबाबतीत आपली खात्री पटवून देईन. "

" ते चांगलंच आहे ! मला मान्य आहे की हा प्रयोग तुमचा आहे आणि त्याचं फलितही तुम्हीच दाखवायचं आहे. पण मला थोडं सावध करायलाच हवं. पाहा बरं. विद्यार्थ्यांना इतकं सैल सोडू नका. प्रयोगात मी तुमच्या पाठीशी उभा आहे पण तरी थोडं छातीत धडधडतंच. "

मी म्हटलं, " साहेब, आपण माझ्यावर विश्वास ठेवा. एकदा पाहा तर खरं. आपण इतके प्रयत्न करतो आहोत ! परमेश्वराच्या मनात असेल तर यश आपलंच आहे. "

मी पुन्हा म्हटलं, " समजा, जर मुलांनी वर्गात टोप्या काढून ठेवल्या तर काही हरकत नाही नं ? "

साहेब म्हणाले, " छे छे ! बिलकुल नाही. वर्गात तुम्ही हवी ती सुधारणा करा. असं करता करता लोकांना ते मान्य झालं तर माझा स्वतःचा काही आग्रह नाही."

मी म्हटलं, " फार छान झालं हे ! आता आणखी एक गोष्ट विचारून घेतो. मला माझ्या वर्गात एक छोटासा पुस्तकसंग्रह करायचा आहे. त्यासाठी मला काही पैसे मिळू शकतील का ? "

साहेब म्हणाले, " पैसे ? अहो, पैसे कुठून आणणार ? हा प्रयोग तर एका प्रकारे तुमच्या माझ्यातला आहे. बजेटमध्ये जितके पैसे आहेत त्यातून तर आम्हाला शाळा चालवायचीय्. तुमच्या वर्गाच्या वाट्याला जे आठ-बारा आणे येतील त्यातूनच तुम्हाला तुमचा खर्च भागवावा लागेल. "

मी म्हटलं, " मग काय करावं ? "

" एक सांगा की वर्षाच्या शेवटी तुमच्या ह्या पुस्तकांचं काय होईल ? विद्यार्थ्यांना ती पुस्तकं वाटून टाकाल ? "

" होय ! ही सगळी पुस्तकं सगळ्या वर्गाचीच असणार आणि ती वर्गातल्या मुलांना परत मिळायलाच हवीत. पण जर पालकांना मला पटवून देता आलं की त्यांनी पुस्तकं नेऊ नयेत, तर ती पुस्तकं वर्गातच राहतील. वर्गाला कायमचं पुस्तकालय मिळेल आणि दरवर्षी नव्या नव्या पुस्तकांची त्यात भर पडेल. "

" कुणी सांगावं ! लोकांना तुमचं म्हणणं पटेलही ! हा विचार तर सुंदर आहेच. एकदा प्रयोग करून पाहाच हा. पण तरीही एक प्रश्न आहेच. शिकवायच्यावेळी पाठ्यपुस्तकांशिवाय कसं चालेल ?

" त्याबद्दल मी सगळा विचार करून ठेवलाय्. "

साहेबांचा निरोप घेऊन मी घरी आलो.

## (७)

दुसऱ्या दिवशी शाळा सुरू झाली. मला वाटलं होतं, कदाचित् मुलं टोप्या न घालता येतील. पण माझे डोळे चांगलेच उघडले. मुलांकडून कळलं की पालकांनाच ते मान्य नव्हतं. पालक म्हणाले, " असं बोडक्यानं शाळेत जायचं असतं का ? तुमच्या मास्तरांना काय वेडबीड लागलंय् का काय ? "

मी नखं पाहिली. पण दोघातिघांचीच कापलेली होती. घरातल्या अनेक अडचणी त्याला कारण होत्या. सदऱ्याची बटणं लावायला वेळ होता कुणाला ? एका आईनं तर असाही निरोप पाठवला की— " मास्तर, तुम्ही शिकवायला आला आहात तर मुकाट्यानं शिकवा की. ही नवी नवी सोंगं कशाला काढता ? आम्हाला काय उद्योगधंदे नाहीत का ? का आपलं मुलांची नखं कापा, बटणं लावा, हे करा न् ते करा, हेच करत बसावं ? आमच्या मुलांचं असंच चालतं. इथे आम्हाला मरायलापण सवड नाही आणि ही नसती हमाली कोणी करायची ? "

मी तर चकितच झालो. वाटलं होतं, आज वर्ग सगळा स्वच्छ, छान दिसेल. पण त्याऐवजी हा प्रतिसाद ! शंकाकुशंका ! ठीक आहे. काही बिघडलं नाही. मी विचार केला की, असं काम होणारच नाही. एका बाजूनं मला पालकांचा पाठिंबा मिळवायला हवा आणि दुसरीकडे योजनाच अशा करायच्या की ज्यामुळे मुलांना शाळेतच या सगळ्या स्वच्छतेची गोडी लागेल.

त्यादिवशी मी त्यांच्याशी आणखी काही बोललो नाही. लगेच गोष्टच सुरू केली आणि सुरू केलेली गोष्ट शेवटपर्यंत सांगितली.

मुलं म्हणायला लागली, " आता दुसरी गोष्ट. "

मी म्हटलं, " उद्यापासून नवीन गोष्ट सुरू करू चला, आज थोडं खेळूया. "

" खेळूया ? " मुलं आश्चर्यचकित होऊन माझ्याकडे पाहातच राहिली. " हो. खेळूया. खेळ खेळूया. सांगा सांगा तुम्हाला कोणते खेळ माहीत आहेत ? "

" कितीतरी माहीत आहेत. पण ते शाळेत कसे खेळणार ? "

" का बरं ? खेळता येणार नाहीत शाळेत ? "

" अहो, ही तर शाळेची वेळ आहे ना ! शाळेच्या वेळात मुलं कधी खेळ खेळतात का ? कधीतरी खेळताना पाहिलंय् का तुम्ही मुलांना ? "

" तरी आपण खेळूया. चला, तुमच्याबरोबर मीपण खेळीन. या. आपण खेळूया. "

काही मुलं तर पुतळ्यासारखी ठप्प उभीच राहिली. काही " हाऽऽ हूऽऽ " करत खेळायला धावली. एवढ्या वेळात हाऽऽ कोलाहल झाला. दुसऱ्या वर्गातली मुलं डोकावून डोकावून पाहायला लागली आणि इतर शिक्षकही माझ्याकडे पाहत राहिले.

एवढ्यात मुख्याध्यापक एकाएकी आले आणि मला बोलले— " हे पाहा, इथे शाळेत तुम्हाला खेळता येणार नाही. वाटलं तर लांब त्या मैदानात जा. इतर वर्गांना इथे त्रास होतो. "

मी मुलांना घेऊन मैदानात गेलो.

मुलं तर दावं सुटलेल्या वासरांसारखी बागडत होती. " खेळ ! खेळ ! चला, खेळूया खेळ ! "

मी म्हटलं, " कुठला खेळ खेळायचा ? "

एक म्हणाला, " खो खो. "

दुसरा म्हणाला, " नाही. हुतूतू "

तिसरा म्हणायला लागला, " नाही नाही. वाघोबाचा खेळ. "

चौथा म्हणाला, " आम्ही तर मग नाहीच खेळणार. "

पाचवा म्हणाला, " त्याला जाऊदे. आपण खेळूया. "

मुलांना भांडायच्या किती अनिष्ट सवयी लागल्या होत्या !

मी म्हटलं, " अरे बाबानो, आपण इथे खेळायला आलोय् ना ? हो, नाही, खेळणार नाही, खेळणार असे वाद घालायचे असले तर चला परत वर्गात जाऊया. "

मुलं म्हणाली, " नको नको. आम्हाला खेळायचंय्. "

मी म्हटलं, " मग चला. आज खो खो खेळूया. दोघंजण दोन गटांचे कप्तान व्हा आणि भिडू मागा. " मुलं गेली.

पण कप्तान ठरवण्यात इतका वेळ गेला ! एक म्हणायचा, मी कप्तान होतो, दुसरा म्हणायचा, मी होतो. शेवटी मी दोघांची नावं सुचवली. आणि दोन गट पाडले. तेव्हा कुठे खेळ सुरू झाला.

पण हा तर खो खो चा गल्लीतला खेळ झाला ! कणी बडबड न करता खेळायला तयारच नव्हतं. कारण जरा, नसो मुलं आपली बोलतच होती. " हं या राव. पकडा पकडा. ", " हो हो. म्हणे पकडा पकडा. तुझी तरी हिंमत आहे का पकडायची ? ", " ए. ए. सांभाळ सांभाळ ", " वा रे वा ! जरा बघ रे. तो तिकडून पळून जाईल ", " अरे लक्ष द्या ना. ए, तिकडे बघ. मी म्हणत नव्हतो तो पळून जाईल म्हणून ? ", " मोठे आले गप्पा मारणारे ! तो तिकडून गेलाय ना पळून ? घ्या ! हरलात ना शेवटी ? " . . .

मी मनात म्हटलं, हे काय खेळाचं मैदान आहे का भाजीमार्केट ? खो खो चा खेळ चाललाय् का दंगाधोपा करायची स्पर्धा ?

खेळ संपल्या संपल्या जिंकलेल्या गटातला एक मुलगा म्हणाला, " जिंकलो ! आम्ही जिंकलो ! अरे तुम्ही नुसता घाम गाळला रे, पण काही चाललं नाही ना ? भिडू चांगले होते नाही का तुमचे ? त्यांचं काय झालं रेऽऽ ? "

दुसरा गट चिडला. त्यातला एकजण म्हणाला, " हो हो हरलो ! बोला ! काय घेणं आहे तुम्हाला ? "

पहिला मुलगा पुन्हा म्हणाला, " हरले हप्प ! हरले हप्प ! आम्ही जिंकलो. घेणं काय ? जिंकलो ! जिंकलो ! झिंदाबाद ! "

हरलेल्या गटाच्या कप्तानाच्या चेहऱ्यावर राग दिसत होता. तो म्हणाला, " आता गप्प बसतोस का नाही ? हा दगड पाहिलास का माझ्या हातातला ? "

जिंकलेला कप्तान म्हणाला, " बघा बघा ! चिडका बिब्बा चिडलाऽऽ ! चिडला ! आम्ही चिडवणारच ! सोडतो का काय ? हरला रे हरला ! हरला रे हरला ! हाय हाय हरला ! "

आता त्या दुसऱ्याला संताप अनावर झाला. त्यानं दगड फेकून मारला. तो दगड दुसऱ्या एका मुलाला लागला आणि रक्ताची धार लागली. मला वाटलं, हे फार वाईट झालं. तिथेच माझा रुमाल फाडून मी पट्टी बांधली. सगळ्या मुलांना गोळा केलं आणि म्हटलं, " हे बघा, उद्यापासून खेळ बंद. "

सगळी मुलं म्हणायला लागली, " पण गुरुजी, त्या दोघांचं भांडण झालं. यात आमचं काय चुकलं ? "

मी म्हटलं, " तुम्हाला दोन गोष्टी कबूल असतील तर मी खेळ खेळायला देईन. "

सगळे म्हणाले, " कबूल. कबूल. "

मी म्हटलं, " पहिला नियम. खेळताना विनाकारण कुणी बोलायचं नाही. जे बोलतील त्यांनी बाद व्हायचं. "

सगळे म्हणाले, " कबूल ! आम्ही नाही बोलणार ! "

" दुसरी गोष्ट अशी की खेळात हरणं, जिंकणं असं काही नाही. शेवटी तो खेळ आहे. कधी आपली सरशी होईल कधी दुसऱ्याची. त्यात कोण हरलं, कोण जिंकलं, असं बोलायचं तरी कशाला ? खेळ म्हणजे खेळायचं, बागडायचं, धावायचं. मजा करायची. हरणं, जिंकणं, भांडणं, एकमेकांची डोकी फोडणं हे आपल्याला हवंय् कशाला ? "

सगळे म्हणाले, " आम्हाला हे पण कबूल आहे. "

खेळ संपल्यावर आम्ही सगळे शाळेत आलो. ज्याला डोक्याला लागलं होतं, होतं तो मुलगापण बरोबर होता. बाकीचे शिक्षक आणि मुलं त्याला पाहायला बाहेर आली. एका खोडकर मुलानं टोमणा मारला, " खेळ फारच रंगलेला दिसतोय् ! "

दुसरा म्हणाला, " अरे, हे तर धुळवड खेळायला गेले होते. "

शाळा सुटली आणि सगळे शिक्षक आणि मुख्याध्यापक माझ्यापाशी आले. एक शिक्षक म्हणाले " आज काय पोरांची लढाई जुंपलीत का काय तुम्ही ? "

दुसरे शिक्षक म्हणाले, " गुरुजी, ह्या खेळाचा नाद सोडून द्या. ही तर बारा घरची बारा पोरं. यांना चांगलं वर्गात डांबून घोकंपट्टी करून घेऊन शिकवायला पाहिजे. यांना थोडं मोकळं सोडा की, फोडलीच समजा एकमेकांची डोकी. गल्लीगल्लीत रोज काय होतं हे तुम्हाला माहीत नाही का ? "

मुख्याध्यापक म्हणाले, " मला वाटलंच होतं की आज काहीतरी घोटाळा होणार. झालं ते बरं झालं म्हणायचं. ह्या गृहस्थांना एकदा अनुभव यायलाच हवा होता. त्याशिवाय ते गप्प बसणार नाहीत. शाळेत कधी कुणी खेळ शिकवले होते का ? "

मी म्हटलं, " गुरुजी, खेळातूनच खरं शिक्षण देता येतं. जगातली कितीतरी थोर माणसं खेळाच्या मैदानावरच घडली. खेळातून चारित्र्य घडतं. "

मुख्याध्यापक म्हणाले, " असं ? म्हणूनच बहुतेक आज मारामाऱ्या झाल्या न् डोकी फुटली ! "

आमचं हे बोलणं चालू होतं, तेवढ्यात ज्या मुलाला लागलं होतं, त्याचे वडील रागानं लाल होऊन तिथे येऊन धडकले. म्हणाले, " काय करायचंय्

खेळात हरणं, जिंकणं असं काही नाही. शेवटी तो खेळ आहे. कधी आपली सरशी होईल कधी दुसऱ्याची. त्यात कोण हरलं, कोण जिंकलं, असं बोलायचं तरी कशाला ? खेळ म्हणजे खेळायचं, बागडायचं, धावायचं. मजा करायची. हरणं, जिंकणं, भांडणं, एकमेकांची डोकी फोडणं हे आपल्याला हवंय् कशाला ?

" गुरुजी, खेळातूनच खरं शिक्षण देता येतं. जगातली कितीतरी थोर माणसं खेळाच्या मैदानावरच घडली. खेळातून चारित्र्य घडतं. "

असलं शिक्षण घेऊन ? बघा, पोराचं डोकं फुटलं निष्कारण, कुठे गेले तुमचे मुख्याध्यापक ? कोणी मारलं याला ? "

मी म्हटलं, " अहो, जरा ऐका तर. मुलं मुलं खेळत होती. तिथे आपसात काही भांडणं झाली आणि याला लागलं. "

ते म्हणाले, " याला खेळायला सोडलं कुणी ? शाळेत काय अभ्यास घेतात का खेळ चालतात ? दिवसभर तर रस्त्यावर ही पोरं खेळतच असतात ना ? तुम्ही मुलाला शिकवणार असलात तर मी पाठवीन. नाहीतर शाळा-बिळा बंद. "

मी सगळं मुकाट्यानं ऐकून घेतलं.

मुख्याध्यापक म्हणाले, " अहो, काय सांगू तुम्हाला ? हे गृहस्थ आमच्याकडे नव्यानं शिक्षक म्हणून आलेत. ते शिक्षणात नवे नवे प्रयोग करतायत. आज त्यांनी म्हणे खेळाचा प्रयोग केला. त्यामुळेच तर तुमच्या मुलाचं डोकं फुटलं. "

मुलाचे वडील म्हणाले, " मला जरूर नाही तुमच्या या असल्या प्रयोगांची ! मुलाला नीट शिकवायचं तर शिकवा सरळपणे. नाही तर शाळेतून काढून टाकतो नाव त्याचं. "

हे चालू असताना बाकीचे शिक्षक गालातल्या गालात हसत होते. अशा वेळी मी काय बोलणार ?

घरी गेलो. जेवण गोड लागेना. खोलीत जाऊन बसलो आणि विचार करू लागलो. " ही तर पंचाईतच झालीयू. मुलांना खेळाचे नियम तर आता सांगितले आहेतच. आणखीही पुन्हा सांगीन. खेळायला तर हवंच. माझ्या मते, खेळ हाच खरा अभ्यास आहे. "

पडल्या पडल्या एक विचार मनात आला. मुलांच्या पालकांची एखादी सभा भरवायला हवी. त्यांना खेळाचं महत्त्व समजावून दिलं तर काय होईल ? स्वच्छतेत आणि टापटिपीतही मदत करा, अशीही त्यांना विनंती करावी. त्यांनी मदत केली नाही तर माझ्या हातात काय आहे ? आपल्या मुलांसाठी ते एवढं पण करणार नाहीत का ? आम्ही शिक्षक मंडळी पालकांचं सहकार्य का मागत नाही ? हा आमचाच दोष आहे. चला ! उद्याच सभेची निमंत्रणं पाठवली पाहिजेत. सभा व्हायलाच हवी.

> आम्ही शिक्षक मंडळी पालकांचं सहकार्य का मागत नाही ? हा आमचाच दोष आहे.

## (८)

सभा झाली. अर्थात तिला सभा म्हणावं की नाही शंकाच आहे. चाळीस पालकांना पत्रं पाठवली होती. एकूण सात पालक आले होते. मी फार निराश झालो. मी सभेत करायच्या भाषणाची चांगली तयारी केली होती. पण श्रोते कुठे होते ? काय करणार ! शेवटी मी माझं भाषण सुरू केलं. विचार केला, प्रयत्न करणं आपलं काम आहे. चला. भाषणाचा आणखी एक प्रयोग !

अगदी मन लावून तासभर मी गंभीरपणे भाषण केलं. जमलेल्या सातजणांपैकी एका गृहस्थांना धरून निरोप आला आणि ते उठून गेले. उरलेले माझं भाषण साशंक होऊन ऐकत होते. माझे सगळे मुद्दे महत्त्वाचे होते आणि ते त्यांना समजावून देण्याची फार गरज होती.

मी त्यांना खरं शिकवणं म्हणजे काय आणि वरवरचं शिकवणं म्हणजे काय यातला फरक तपशीलवार समजावून सांगितला. आध्यात्मिक

प्रगतीचं स्वच्छतेशी काय नातं आहे ते पण सांगितलं. खेळ आणि चारित्र्यसंवर्धन यांचा संबंध स्पष्ट करून सांगितला. मी त्यांना आतून निर्माण होणाऱ्या खऱ्या शिस्तीचं महत्त्व सांगितलं. तसंच, सध्याचं शिक्षण आणि मुलांवर बाहेरून लादलेली शिस्त कशी चुकीची आहे तेही सांगितलं.

पण पालथ्या घड्यावर पाणी ! दोघं चौघं बिचारे लाजेकाजेस्तव आले होते, त्यांना क्रेव्हा एकदा घरी जाऊ असं झालं होतं. भाषण संपल्या संपल्या ते चालू लागले.

राहता राहिलो आम्ही शिक्षक आणि आमचे अधिकारी. साहेब जरासं हसून म्हणाले, " लक्ष्मीशंकरजी, गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता ! अहो तुमचं हे तत्त्वज्ञान कुणाला समजणार ? "

मागून कोणीतरी म्हणाले, " मूर्ख आहेत, हो, हे मूर्ख ! "

मला हे काही आवडलं नाही पण मी मला सावरलं. मला मनातल्या मनात असं वाटलं, या अनुभवातून असंही की माझं सगळं पुस्तकी पांडित्य आहे. सामान्य माणसांना समजेल, असं कसं बोलावं हेही मला कुठे कळत होतं ?

सगळे शिक्षक मला हसतच घरी गेले.

## (९)

दहाबारा दिवस गेले आणि मी पुस्तकालयाच्या कामाला हात घातला. गोष्टी तर पुष्कळ सांगितल्या होत्या. ही मुलं चौथीत होती. आता लौकरच त्यांच्या हाती पुस्तकं यायला हवी होती.

मी मुलांना म्हटलं, " उद्या तुम्ही चौथीचं भाषेचं पुस्तक आणि इतिहासाचं पुस्तकं यांचे पैसे घेऊन या. इथूनच आपण व्यवस्था करू खरेदीची. "

दुसऱ्या दिवशी एक मुलगा दोन्ही पुस्तकं घेऊनच आला. म्हणायला लागला, " तिसरीचा निकाल लागला त्याच दिवशी वडलांनी ही पुस्तकं घेऊन ठेवली होती. "

दुसरा म्हणाला, " माझ्या मोठ्या भावाची ही पुस्तकं घरातच होती. मी तीच घेऊन आलो. "

तिसरा म्हणाला, " मला माझे काका मुंबईहून पुस्तकं पाठवणार आहेत. आम्ही इथे नाही घेत पुस्तकं "

आणखी एक मुलगा म्हणाला, " माझे वडील पैसे द्यायला तयार नाहीत. ते म्हणतात मी तुला पुस्तकं आणून देईन. "

मी मनात म्हटलं, " मेलो ! कल्पनेत पुस्तकालय उभं करणं सोपं होतं, पण प्रत्यक्षात हे काम कठीण दिसतंय् !

काही मुलं पैसे घेऊन आली होती. मी त्यांचे पैसे घेतले. पावत्या दिल्या आणि मुलांना म्हटलं, " हे छान झालं ! "

दुसऱ्या दिवशी मुलं विचारायला लागली, " आमची भाषेची, इतिहासाची पुस्तकं आली ? "

मी म्हटलं, " तुम्ही दिलेल्या पैशातून ही गोष्टीची पुस्तकं आणली बघा. तुम्ही म्हणत होतात ना, गोष्टीची पुस्तकं वाचायला मजा वाटते म्हणून ? "

मुलं फार खूष झाली. रंगीत चित्रं आणि सुंदर मुखपृष्ठ असलेली पुस्तकं पाहून मुलं पुस्तकांवर तुटून पडली.

मी म्हटलं, " आपल्याकडे आता पंधरा पुस्तकं आली. पंधरा जणांना वाचता येतील. बाकीच्या वीस मुलांनी इकडे या आणि मी वाचून दाखवतो ते ऐका. " नंतर घोटाळा होऊ नये म्हणून मी म्हटलं, " आधी पंधरा मुलांनी पुस्तकं घ्या आणि बाकीच्यांनी माझ्यापाशी या. "

पंधराजणांनी पंधरा पुस्तकं उचलली आणि त्यांच्यावर भुकेलेल्या वाघासारखे ते तुटून पडले. मी

म्हटलं, " हे बघा, एक पुस्तक वाचून झालं ना, की ते टेबलावर आणून ठेवायचं आणि टेबलावर दुसरं असेल तर घेऊन जायचं. असं केलं की एकेक करून सगळी पुस्तकं सर्वांना वाचायला मिळतील. "

ज्यांना पुस्तकं मिळाली नव्हती त्यांना मी माझ्याजवळ बसवून घेतलं आणि आदर्श वाचन सुरू केलं. मी आवाजांच्या चढउतारांसकट, हावभावांसह वाचू लागलो पण त्या पंधरा जणांच्या वाचण्याचा आवाज इतका येत होता! मी जरा थांबून म्हटलं, " मंडळी, तुम्ही जरा मनातल्या मनात वाचा. आम्हाला त्रास होतोय. " काही वेळ आवाज खाली आला पण त्यांना मूक वाचनाचा गंधही नव्हता. ती मुलं मोठ्यानंच वाचायची. काही वेळ त्यांनी जरा हळू आवाजात वाचलं आणि पुन्हा ती मोठ्यानंच वाचायला लागली. मी त्यांना व्हरांड्यात वेगवेगळं बसून वाचायला सांगितलं आणि मी आत वर्गात बसलो.

आदर्श वाचन छान झालं. गोष्ट आवडीची होती. म्हणून सगळ्यांनी मन लावून ऐकली. घंटा होईपर्यंत बाहेर पुस्तकवाचन आणि आत आदर्शवाचन चालू होतं. मग आम्ही घरी गेलो.

## (१०)

गोष्टी आणि खेळ, वाचनालय आणि आदर्श वाचन, स्वच्छता आणि टापटीप यांच्याशी झगडता झगडता दोन-तीन महिने पटकन् गेले.

मी माझ्या कामाचा आढावा घ्यायला बसलो. झालेल्या कामावर नजर टाकली, मला जाणवलं की अजून आम्ही अभ्यासक्रमाला हातही लावलेला नव्हता. भाषा, गणित, इतिहास, शास्त्र यांचं काहीच झालं नव्हतं. इतर वर्गांचा अभ्यास बराच पुढे गेला होता: वर्षअखेरपर्यंत मलाही हे सगळं पुरं करायचं होतं. माझ्या प्रयोगात ती एक अट होती ना! ते ठीकच होतं म्हणा. पण मी काय मिळवलं होतं, ते तर बघू. गोष्ट सांगण्यात मला चांगलं यश मिळालं होतं. त्यामुळे बहुतेक मुलांना शिकण्यात रस वाटू लागला होता. तरीही चंपकलालला आणि रमणलालला गोष्ट आवडत नाही. रामजीवनला आणि शंकरलालला गोष्ट फार साधी वाटते. गोष्टीच्या वेळी राघव आणि माधव डोळे मिचकावतात, टिचक्या वाजवतात, एकमेकांना तोंडं वेडीवाकडी करून चिडवतात. यावर मला अजून उपाय सापडलेला नाही. हे मात्र खरं की, खेळायला लागल्यापासून मुलं मोकळी झालीत. माझ्या जवळ आलीत. मी त्यांना त्यांच्यापैकीच एक वाटतो. ती आता मला भीत नाहीत. आणि खेळ झाल्यावर माझं आदर्श वाचन सगळे लक्ष देऊन ऐकतात. पण अजून खेळातला गोंधळ आणि आरडाओरडा मात्र फारसा कमी झालेला नाही. मी कष्ट तर खूप करतोय, पण नेमकं कुठल्या प्रकारे काम करावं ते ठरत नाही.

वाचनालयात अजूनही फारशी पुस्तकं नाहीत. पाठ्यपुस्तकं घेण्यापेक्षा वाचनालय वाढवणं महत्त्वाचं आहे, हे मी पालकांना अजून पटवून देऊ शकत नाही. मला वाटलं होतं की, भाषण देऊन पालकांना समजावून सांगितलं की झालं पण; आमच्या पालकांना

> आमच्या पालकांना " शिकवा " एवढंच कळतं. त्यापलीकडचं काही समजून घ्यायला त्यांना सवडही नाही आणि त्यांना ते समजतही नाही.

" शिकवा " एवढंच कळतं. त्यापलीकडचं काही समजून घ्यायला त्यांना सवडही नाही आणि त्यांना ते समजतही नाही. तरी हरकत नाही. नेटानं काम करूनच हे सगळं बदलेल. आज नाही तर उद्या. अजून माझ्यापाशी धीर आहे.

मनात विचार यायला लागले, हा प्रयोग म्हणजे प्रचंडच काम आहे. जितक्या जास्त कल्पना लढवाव्यात, ज्ञान मिळवावं, आदर्श समोर ठेवावेत तितक्याच मोठ्या गंभीर अडचणी समोर उभ्या राहतायत. काही प्रश्नांचा भुंगा मला पोखरत होता. साफसफाईचं अजून काही फारसं जमलं नव्हतं. टोप्या हुडहुडी भरते. त्यापेक्षा मी जे करतो ते लाखपटीनं चांगलं आहे. माझे विद्यार्थी मला बघून पळून तरी जात नाहीत ! त्यांचं माझ्यावर थोडंफार प्रेमपण आहे. त्यांच्या मनात माझ्याविषयी आदरपण आहे. मी सांगीन ते ती ऐकतात. ह्या शिक्षकांना पाहून मुलं दूर पळून जातात आणि त्यांच्या पाठीमागे त्यांच्या नकला करतात ते मी स्वतः पाहिलंय्. एकाही मुलाला शिक्षकांजवळ जावं, प्रेमानं, हसतखेळत गप्पा माराव्यात, असं वाटत नाही. मुलं वर्गात तर मारून मुटकून गप्प बसतात. पण बाहेर पडली की इतका आरडाओरडा, मारामाऱ्या करतात की काही विचारू

एकाही मुलाला शिक्षकांजवळ जावं, प्रेमानं, हसतखेळत गप्पा माराव्यात, असं वाटत नाही. मुलं वर्गात तर मारून मुटकून गप्प बसतात पण बाहेर पडली की इतका आरडाओरडा, मारामाऱ्या करतात की काही विचारू नका.

तशाच होत्या. एकदोन दिवस कपडे जरा व्यवस्थित दिसले. पण पुन्हा गाडी मूळपदावर. नखंही पुन्हा फावड्यासारखी वाढली होती. ह्या सगळ्या गोष्टींच्या मागे लागल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. कारण समाजाला नवीन वळण लावायचं तर धीर धरून पुन्हा पुन्हा काम करूनच हेतू साध्य होणार.

आणि यात फक्त मुलांचाच प्रश्न आहे असं नाही. मोठे साहेबपण आता उतावीळ झालेत. त्यांनापण वर जाब विचारणारे आणि विरोध करणारे आहेतच ना ! त्यांना यशाचे भागीदार व्हायचं आहे आणि बदलपण चटपट व्हायला हवा आहे. पण मला मदत मात्र ते फारशी करू शकत नाहीत.

माझ्या बरोबरच्या शिक्षकांचा तर माझ्यावर जरासुद्धा विश्वास नाही. ते मला अस्सल मूर्खच समजतात. तेही खरंच म्हणा ! मी मूर्ख आहेच. त्यातून अनुभव नाही गाठीशी, पण तरी त्यांच्या शिकवण्याच्या पद्धती आणि परंपरांना कोपरापासून नमस्कार करतो ! त्यांना शिकवताना पाहिलं की, मला नका. माझ्या विद्यार्थ्यांना मी योग्य ते स्वातंत्र्य दिलेलं आहे. ते वर्गात थोडीफार गडबड करतात पण त्यापेक्षा जास्त कधी बाहेर करत नाहीत. पण माझे सहकारी तर माझ्यावर असा आरोप करतात की मी मुलांना बिघडवतो आहे. त्यांना उद्दाम बनवतो आहे, नुसत्या गोष्टी सांगत बसतो आणि शिकवत काही नाही. त्यात आणखी खेळ शिकवून त्यांना अगदीच मोकाट सोडतोय्. ठीक आहे. हेही सिद्ध होईल कधीतरी माझ्या मते, की हे खेळ आणि ह्या गोष्टी हेच अर्धं शिक्षण आहे.

हे सगळं भोवती घडत असताना मला माझं काम किती बिकट आहे याची सतत जाणीव असते. हे मान्य करूनच मला माझं काम करत राहिलं पाहिजे.

टण्. टण्. बारा वाजले आणि माझी विचारांची मालिका तुटली. मी परमेश्वराला म्हटले, " ईश्वरा, शेवटी तूच माझा आधार आहेस. " प्रार्थना करून सगळ्या चिंता त्या दयाघन परमेश्वराला अर्पण करून मी, " उद्याचं उद्या पाहू, " असं म्हणत झोपी गेलो.

□ □ □

# भाग दुसरा

## प्रयोगाची प्रगती

(१)

तिसरा महिना चालू झाला. मनात विचार आला की आता दैनंदिनी लिहायला लागलं पाहिजे. म्हणजे मला स्वतःलाही आठवड्याभरात किती काम होतं त्याचा अंदाज येईल. त्याबरोबरच मी एकेका महिन्याच्या कामाचा आराखडापण तयार केला. त्यामुळे दैनंदिनी किती उपयोगी पडते ते माझ्या लक्षात आलं. माझी ही दैनंदिनी लॉग–बुकसारखी नव्हती तर कामाची दिशा दाखवणाऱ्या सूचीसारखी होती.

गोष्ट रोज चालू होतीच आणि खेळपण चालू होते. अधूनमधून गप्पा, आदर्श वाचन आणि मुलांची शारीरिक तपासणीपण चालायची. वाचनालयसुद्धा हळूहळू वाढत होतं.

(२)

मी अभ्यासक्रमातले एकेक विषय आता घ्यायला सुरुवात केली. एकदा सकाळी मी म्हटलं, " लिहा. शुद्धलेखन सांगतो, ते तुम्ही लिहा. " मुलं माझ्याकडे पाहायलाच लागली. त्यांना कधी वाटलंही नव्हतं की, आपले गुरुजी असे इतरांसारखे शुद्धलेखन घालतील किंवा पाठ घेतील किंवा नकाशावरून गावं विचारतील किंवा असंच काहीतरी इतर घेतील. एकप्रकारे मी तसा नव्हतोही. त्यांनाही तसं वाटत नव्हतं.

मी त्यांना म्हटलं, " चला,लिहा. "

बहुतेकांजवळ पाटीपण नव्हती आणि पेन्सिल पण नव्हती. इतके दिवस त्यांना वर्गात पाटी, पेन्सिल, पुस्तकं लागलीच नव्हती ना ! म्हणून ते तसेच शाळेत यायला लागले होते. शेजारच्या वर्गातून मी पाट्या–पेन्सिली आणवल्या आणि सर्वांना शुद्धलेखन लिहायला बसवलं.

मुलांनी तोंडं वाकडी केली. कोणी म्हणायला लागलं, " गुरुजी, गोष्ट नाही सांगणार ? " दुसरा एकजण म्हणाला, " पुस्तकं तर आपण शिकलोच नाही.मग शुद्धलेखन कशातलं घालणार ? " दुसरे दोघं म्हणाले, " आधी जरा आम्हाला वाचून बघूदे,म्हणजे चुका नाही होणार ! "

मी मनात म्हटलं, " अस्सं ! ह्या सगळ्या मुलांवर जुन्या शिक्षणपद्धतीचे संस्कार पक्के झाले आहेत. शुद्धलेखनाचा पारंपरिक अर्थ यांना तंतोतंत कळलाय. म्हणूनच यांना ते आवडत नाही. शुद्धलेखनाचा यांना कंटाळा आहे आणि तरी त्यांची तयारी मात्र आधी करू म्हणतायत. "

मी वाचनालयातलं एक पुस्तक घेतलं आणि सांगायला सुरुवात केली. मी एक संपूर्ण वाक्य सांगितलं. पण सुरुवातीचे दोन चार शब्द सांगितल्यावर अर्धे–मुर्धे जे ऐकू आलं ते ती मुलं लिहायला लागलीसुद्धा. पुरतं वाक्य त्यांनी ऐकलंच नाही. " काय गुरुजी ? " " काय काय ? " असं विचारायला लागली.

मी म्हणालो, " थांबा बरं सगळ्यांनी. शुद्धलेखन कसं लिहायचं ते मी तुम्हाला सांगतो. मी जेव्हा सांगीन तेव्हा तुम्ही सगळ्यांनी माझ्याकडे पाहा आणि सांगून

संपलं की नीट ऐकलेलं समजून घेऊन लिहा. आणि मग पुन्हा पुढचं वाक्य ऐकण्यासाठी माझ्याकडे पाहा " अशा पद्धतीनं मग मी त्यांना लिहायला सांगू लागलो. पण त्यांची जुनी सवय एकदम कशी बदलणार ? नंतर मात्र हळूहळू नव्या पद्धतीची सर्वांना सवय झाली आणि मग सारखं, ' काय, काय ' म्हणून विचारायची गरजच उरली नाही. मग मीपण प्रत्येक वाक्य एकदाच सांगू लागलो. परत सांगावंच लागायचं नाही.

एकानं विचारलं, " पण मग मार्क ? पास ? नापास ? "

मी म्हटलं, " जेव्हा तुम्ही गोष्ट ऐकता तेव्हा कुणी पास कुणी नापास होतं ? "

" नाही. "

" तुम्ही स्वच्छ कपडे घालून येता तेव्हा मी कुणाला पास,कुणाला नापास म्हणतो ? "

" नाही. "

" आणि तुम्ही खेळ खेळता तेव्हा ? तेव्हा नंबर देतो का आपण ? "

आता आलं का लक्षात ? आपल्या वर्गात पास-नापास ठरवायची काही जरूरच नाही. ज्याची कविता पाठ असेल त्यानं ती म्हणावी, ज्याची नसेल त्यानं पाठ करावी. कुणाला खेळायला येत नसेल तर बघून बघून त्यानं शिकावं. ज्यांना येतं, त्यांनी खूप खूप खेळावं. मजा करावी. शुद्धलेखनात ज्याचं अक्षर सुंदर असेल त्याचं पाहून इतरांनी आपलं अक्षर सुधारावं. मी कुणाला काही विचारलं आणि त्याला ते येत नसेल तर ज्याला येत असेल त्यानं ते दुसऱ्याला सांगावं नाहीतर मी सांगीनच. इतकं सगळं सोपं आहे.

शुद्धलेखन लिहून झालं आणि सर्वांनी पाट्या खाली ठेवल्या. तपासल्यावर माझ्या लक्षात आलं की विरामचिन्हांच्या पुष्कळ चुका आहेत, जोडाक्षरं नीट लिहिलेली नाहीत, अक्षरंपण चांगली नव्हती.

मी कुणाच्या चुका लगेच काढल्या नाहीत. एक एक करून सगळ्या पाट्या पाहिल्या आणि परत दिल्या. सगळी मुलं विचारायला लागली. " आमच्या किती चुका झाल्यात ? मला पास करा. याला नापास करा. "

एवढ्यात एक मुलगा म्हणाला, " आता तर हेपण गुरुजी आपल्याला शिकवतील, नंबर देतील आणि सगळं इतर वर्गासारखं सुरू होईल ! "

मी म्हटलं, " असलं काही मी करणार नाही बरं का. तुम्हा सगळ्यांना लिहिता येतंच. उद्या पुन्हा असंच लिहा. असं करता करता तुम्ही आणखी चांगलं लिहायला लागाल. रोज लिहिलं तर चांगलं आलंच पाहिजे. का नाही येणार ? आणि चुका काढून करायचंय काय ?

" नाही. "

" तुमच्यापैकी कोणी उंच आहेत, कोणी बुटके. त्यावरून तुम्हाला कोणी पास–नापास ठरवतं ? "

" नाही. "

" तुमच्यातले कोणी अंगानं चांगले आहेत, कोणी सडसडीत आहेत. यात काही पास नापास आहे ? "

" नाही. "

" तुम्ही कोणी श्रीमंत आहात, कोणी गरीब आहात. म्हणून काय त्यावरून तुम्हाला शाळेत नंबर देतात ? पास–नापास करतात ? "

" छे. छे. "

" आता आलं का लक्षात ? आपल्या वर्गात पास–नापास ठरवायची काही जरूरच नाही. ज्याची कविता पाठ असेल त्यानं ती म्हणावी, ज्याची नसेल त्यानं पाठ करावी. कुणाला खेळायला येत नसेल तर बघून बघून त्यानं शिकावं. ज्यांना येतं, त्यांनी खूप खूप

खेळावं मजा करावी. शुद्धलेखनात ज्याचं अक्षर सुंदर असेल त्याचं पाहून इतरांनी आपलं अक्षर सुधारावं. मी कुणाला काही विचारलं आणि त्याला ते येत नसेल तर ज्याला येत असेल त्यानं ते दुसऱ्याला सांगावं. नाहीतर मी सांगीनच. इतकं सगळं सोपं आहे. "

सगळे आश्चर्यानं डोळे मोठे मोठे करून माझ्याकडे पाहातच राहिले. त्यांना हे सगळं विलक्षणच वाटत होतं.

शेवटी मी म्हटलं, " आपला वर्ग इतरांपेक्षा वेगळा आहे. हे सगळं नवीनच आहे. नव्या पद्धतीनंच आपण सगळी कामं करतो. हा ' आपला वर्ग ' आहे ना ? "

" आपला वर्ग " या शब्दांवर मी दोनतीनदा मुद्दामच जोर देऊन बोललो आणि मुलांनी ते बरोबर पकडलं. ती म्हणायला लागली, " आपला वर्ग ! आपला वर्ग म्हणजे एक खास चीज आहे ! आपला वर्ग म्हणजे एक नवीनच गोष्ट आहे ! "

शुद्धलेखनाच्या बाबतीत एका आठवड्याच्या आत मी बरीच प्रगती केली.

मुलांना मी म्हटलं की, रोज घरून कुठल्याही पुस्तकात बघून चार ओळी जशाच्या तशा लिहून आणायच्या. मी स्वतः रोज त्यांना दहा मिनिटं शुद्धलेखन सांगायला लागलो. एकमेकांचं पाहून चुका दुरुस्त करायच्या, समजावून द्यायचं यासाठी पंधरा मिनिटं ठेवलेली असायची.

जोडाक्षरं शुद्ध लिहिता यावीत म्हणून मी कठीण जोडाक्षरांची, विशेषतः चौथीच्या पुस्तकात आलेल्या सगळ्या जोडाक्षरांची, एक वही तयार केली आणि सर्वांना आळीपाळीनं ती वाचायला आणि पाटीवर लिहायला दिली.

चौथीच्या पुस्तकात येणाऱ्या कठीण विरामचिन्हांची मी एक यादी केली आणि त्यांचा उपयोग कसा करायचा ते ठरवलं.

आता आमचं काम सुरळीतपणे चालू झालं होतं.

## (३)

एक दिवस शेजारच्या वर्गातून " अरे बापरे ! मेला रे मेला. ठार मारलं," असा आवाज आला.

आम्हाला सर्वांना स्पष्टपणे ऐकू आलं. मी गोष्ट सांगत होतो. सगळ्या मुलांचं लक्ष एकदम तिकडे गेलं. मी गोष्ट तिथेच थांबवली आणि म्हटलं, " कुणीतरी एकानं जाऊन बघा रे काय झालंय. कोण रडतंय ? कशासाठी ? "

एक समजूतदार मुलगा गेला. पाहून आला आणि म्हणाला, " गुरुजी, त्या वर्गात तो जीवनलाल आहे ना त्याला गुरुजींनी मारलं. "

मी विचारलं– " का ? "

" भूगोलाचा अभ्यास केला नव्हता त्यानं. "

मी पुन्हा विचारलं, " मग मारलं कशासाठी ? "

माझा एक विद्यार्थी म्हणाला, " एखाद्यानं जर अभ्यास केलेला नसेल, सांगितलेलं पाठ केलं नसेल तर आणखी काय होणार ? "

मी म्हटलं, " पण एखाद्याच्या लक्षातच राहात नसेल तर ? "

दुसरा म्हणाला, " पाठांतर तर लक्षात राहिलंच पाहिजे. नाही राहिलं तर गुरुजी आणखी काय करणार ? शिक्षाच देणार. "

मी पुन्हा विचारलं, " समजा, एखाद्यानं खूप घोकून घोकून पाठ केलं तरी त्याच्या लक्षात राहिलं नाही तर ? "

तिसरा म्हणाला, " तरी त्याला गुरुजींचा मार खावाच लागणार. गुरुजी तरी दुसरं काय करणार ? लक्षात राहिलं नाही म्हणून ते मारणार, ठोकून काढणार, शिक्षा करणार ! "

मी म्हटलं, " हे चांगलं आहे की ! मग सांगा तुमच्यातले कोण कोण मार खायला तयार आहेत ? "

सगळे म्हणाले, " नको. नको. आम्ही नाही मार खाणार. मार खायला कोण तयार असेल ? "

मी म्हटलं, " मी तुम्हाला काहीतरी पाठ करून यायला सांगितलं आणि तुम्ही ते केलं नाही तर मी तुम्हाला मारलं पाहिजे, नाही का ? "

" पण आम्ही सगळे मुळी ते पाठ करूनच येऊ. "

" तुम्ही पाठ केलंत तरी तुमच्या लक्षात राहिलं नाही तर ? "

" मग काय . . . पण तरी शिक्षा नाही केली तर चांगलं. मारलं तर कसलं लागतं ! जर आमच्या लक्षात आलं नाही तर पुन्हा शिकवा. मग पुन्हा आम्ही पाठ करू. "

मी म्हटलं, " ठीक आहे. आता आपण गोष्टीला सुरुवात करायची ना ? "

पण मुलांच्या मनातून काही जीवनलाल जायला तयार नव्हता. ती म्हणत होती, " आता पाहा हं. जीवनलाल तर असला भारी आहे ना, की तो त्या मास्तरांना शिव्या देईल, भिंतीवर त्यांचं चित्र काढेल आणि त्यांच्या नावानं खूप घाणेरडं लिहील. "

मी म्हटलं, " नाही नाही. जीवननं असं नको करायला. शिक्षकांशी असं वागणं बरोबर नाही. "

सगळे म्हणायला लागले, " पण शिक्षकसुद्धा त्याला जास्तच मारतात बरं का. "

मी म्हटलं, " मग याला काही उपाय आहे का ? "

मुलं म्हणाली, " हो. काही झालं तरी त्याला मारता कामा नये. "

मी म्हटलं, " पण मग अभ्यासाचं काय ? "

मुलांनी उत्तर दिलं, " जो अभ्यास करणार नाही त्याला शाळेतून काढून टाकणं. उगाच मारून काय होणार आहे ? मारून जर अभ्यास आला असता तर काय ? इतकी मुलं रोज मार खातातच की. "

एकानं म्हटलं, " अहो, पण जीवनचं अभ्यासात लक्षच नाही. त्याला तर ससे पकडायला फार आवडतं आणि गुरं चरायला न्यायलापण आवडतं. "

दुसरा म्हणाला, " अरे, जीवन शाळेतच फक्त इतरांकडून मार खातो. एरवी बाहेर तोच सगळ्या मुलांना मारत असतो. आम्हाला सर्वांनाच त्याची भीती वाटते. "

मी विचारलं, " त्याची जात काय ? "

मुलं म्हणाली, " तो कोळी आहे जातीनं. त्याचे वडील सरकारी नोकर आहेत आणि बळे बळे त्याला शाळेत पाठवतात. त्याला शिकवायला एक शिक्षकपण ठेवला आहे घरी. "

मी म्हटलं, " आता पुरे बरं का. सोडून द्या हा विषय. आपण आपली गोष्ट पुरी करूया. "

गोष्ट पुरी करून आम्ही उठलो आणि तेवढ्यात घंटा झाली. घरी जाताना माझ्या मनात शिक्षा आणि शिक्षेचे परिणाम यांचेच विचार घोळत होते. मी काही कधीच कुणाला शिक्षा करणार नव्हतो त्यामुळे मला कसलीच काळजी नव्हती.

असेच आणखी काही दिवस गेले.

## (४)

एक दिवस मी मोठ्या साहेबांना भेटायला गेलो आणि म्हणालो, " साहेब, एक असा नियम करा की शाळेत येणाऱ्या मुलांनी स्वच्छ कपडे घालूनच शाळेत आलं पाहिजे. डोक्यावर टोपी घालून यायचं असेल तर टोपीपण स्वच्छ असली पाहिजे. केस कायम व्यवस्थित विंचरलेले असले पाहिजेत. दर आठवड्याला मुलांची नखं कापली पाहिजेत आणि केस वाढलेले असतील तर ते पण कापले पाहिजेत. बटणं तुटलेला किंवा अर्धवट बटणं असलेला सदरा घालून यायचं नाही. प्रत्येकानं आंघोळ करूनच शाळेत आलं पाहिजे. कमीत कमी हात पाय तोंड तरी धुऊन आलं पाहिजे."

साहेबांनी शांतपणे सगळं ऐकून घेतलं. हसले आणि म्हणायला लागले, " का ? पोरांचे आईवडील तुमचं ऐकत नाहीत वाटतं ? "

मी म्हटलं, "साहेब, त्यांना तर खूप समजवायचा प्रयत्न करतो मी. पण त्याचा काहीही परिणाम होत नाही. चांगल्या चांगल्या, श्रीमंत पालकांनासुद्धा समजत नाही. म्हणतात, लहानपणी आम्हीपण असेच शाळेत जायचो," आणि म्हणतात— "रोज रोज हे सगळं कोण करणार ? गुरुजी, तुमचं काम काय ? शिकवणं ! मग शिकवा ना तुम्ही. बाकीचं सगळं आम्ही बघून घेऊ." आजवर फार कमी प्रगती झालीय् या बाबतीत आणि साहेब, खरं तर मला असल्या मुलांना शिकवायला बरं नाही वाटत."

साहेब म्हणाले, "तुम्ही म्हणता ते अगदी खरं आहे. आपला समाजच असा आहे. ह्या समाजावर काही संस्कार करणं म्हणजे अशक्य गोष्ट शक्य करून दाखवणं आहे. तरीही मी ह्या भागात आल्यापासून पालकांवरसुद्धा काही प्रमाणात परिणाम झाला आहे."

मी म्हटलं, "मग तुम्ही हे नियम का करून टाकत नाही ?"

"अहो, असा नियम मला नाही करता येणार. हे माझ्या अधिकारात येत नाही."

"तुमच्या अधिकारात नाही असं कसं म्हणता साहेब ? तुम्ही एवढे मोठे अधिकारी आहात !"

"मोठे कसले ! हा विभाग छोटा आहे म्हणून. पण इतर ठिकाणी अधिकाऱ्यांच्या हातात अशी सत्ता नसते."

मी म्हटलं, "मग काय करावं ?"

साहेब म्हणाले, "तुम्ही वरच्या लोकांना जरा हलवा. तिथून असा आदेश काढता येईल. पण लोक कुठे असे आदेश पाळतात ? आणि जर त्यांनी आपण केलेले नियम पाळले नाहीत तर आपण काय करणार ?"

"त्यांच्या मुलांना शाळेतून काढून टाकू की."

"हे नाही चालणार.असं केलं तर फार आरडा ओरडा होईल."

मी म्हटलं, "साहेब, सगळं काही होऊ शकतं. पण सत्तेशिवाय शहाणपण काय कामाचं ? खरं तर आपल्या शिक्षकांच्या हातात आहे काय ?"

साहेब म्हणाले, "हो ना! असंच आहे. सध्यातरी जसं चाललंय् तसं चालू ठेवा."

"नाही. नाही. तसं नाही जमणार. मी माझ्याकडून जेवढं होईल तेवढं शाळेत करून घेणारच. मुलांना चांगल्या सवयी लावणार. एवढंच नाही, तर वेळ मिळेल तेव्हा याबाबतीत सार्वजनिक चळवळपण करणार. साहेब,लोकांनी कितीही बेपर्वाई दाखवली तरी हेही अगदी खरं आहे की, आपल्या शाळांमधलं हे घातक वातावरण अनेक रोगांचं मूळ आहे. आपण हे थांबवायला हवं."

साहेब म्हणाले, "ठीक आहे तुम्हाला जसं वाटतं आहे तसं करा. प्रयोगच करायला तुम्ही आला आहात. पण हा चौथा महिना संपत आला. काळ फार झपाट्यानं जातोय हे लक्षात घ्या."

नमस्कार करून मी घरी आलो. मी माझ्या पैशानं (किरकोळ खर्चासाठी जी रक्कम होती तिच्यातून काहीच घेणं शक्य नव्हतं.) दोन चांगले झाडू खरेदी केले, एक छोटासा आरसा आणला. एक कंगवा, खादीचा एक पंचा आणि छोटी कात्री आणली. शाळेच्या आवारात एक नळ होता ही त्यातल्या त्यात

> आपला समाजच असा आहे. ह्या समाजावर काही संस्कार करणं म्हणजे अशक्य गोष्ट शक्य करून दाखवणं आहे.

आनंदाची गोष्ट ! त्या दिवशी मी वर्गात ही सगळी तयारी करून ठेवली.

दुसऱ्या दिवशी मुलांना मी रांगेत उभं केलं. आता त्यांची सगळ्याला तयारी असायची. त्यांचं माझ्यावर प्रेमही होतं, त्यांची खात्री होती की मी जे काही करतो ते त्यांच्या फायद्याचंच असतं.

मी त्यांना आरशात त्यांची तोंडं पहायला सांगितली आणि म्हणालो, "जर तुम्हाला आपलं तोंड, डोळे किंवा नाक घाणेरडं आहे असं वाटत असेल तर नळावर जाऊन धुवून या. आपले हातपाय धुवा आणि केसाला पाणी लावून या."

झालं ! सगळे "हाऽऽ हूऽऽ" करत एकदम बाहेर धावले आणि ढकलाढकली करत तोंड, हात, पाय, धुवायला लागले.

मी मनात म्हटलं, "या मुलांना ओळीनं जायचं, रांगेत उभं राहून कामं करायची, हे शिकवायला पाहिजे. असला दंगाधोपा तर आपल्या समाजात सगळीकडे चालतो. या बेशिस्तीपासून तर या मुलांना दूर ठेवलंच पाहिजे."

मी लगेच तिथे एक रेघ आखली आणि म्हटलं, "हे बघा या रेघेवर उभे राहा सगळे आणि आळीपाळीनं एकेकजण नळावर जा."

मी दोन्ही हातात दोन खादीच्या पंचाचे तुकडे घेऊन उभा राहिलो आणि मुलं दोन्ही बाजूंनी हात, पाय, तोंड, डोकं पुसायला लागली.

शाळेच्या आवारात हा अशा प्रकारचा कार्यक्रम प्रथमच होत होता. त्यामुळेच रस्त्यावरून जाता जाता लोक पाहत होते की, आज इथे हे चाललंय तरी काय !

हात, पाय, तोंड धुवून झाल्यावर आम्ही वर्गात गेलो. तिथे मुलांना कंगवा देऊन मी म्हटलं, "हं, चला आता आपापले केस विंचरा." त्यांच्या टोप्या मी एका कोपऱ्यात ठेवून दिल्या होत्या. मुलं आता स्वच्छ, सुंदर आणि नीटनेटकी दिसत होती. मी खडूनं एक गोल आखला आणि सर्वांना त्यावर बसवलं. मीपण तिथेच बसलो आणि त्यांना म्हणालो, "बघा बरं, आता तुमचे हात किती स्वच्छ दिसतायत ! तुमचे चेहरे किती छान दिसतायत ! तुम्हाला असं राहायला आवडतं की नाही ?"

सगळे म्हणाले, "हो ! आवडतं तर !"

मी म्हटलं, "मग आता असं करायचं, रोज शाळेत आल्याबरोबर हे काम करायचं. नंतर मग इतर कामं आपण करू."

त्या दिवशी मला फार बरं वाटलं. मनाला फार प्रसन्न वाटलं. मी म्हटलं, "चला आपण एक कविता म्हणूया." मी जी पहिला कविता म्हटली ती एक प्रार्थना होती. आपोआप माझ्या तोंडून प्रार्थना बाहेर पडली.

त्या दिवशी नखं कापायची राहिली. कपडे आणि बटणांच्या दुरुस्त्या करायच्याच होत्या. तरी मी तात्पुरता त्यावेळी तो विचार सोडून दिला आणि इतर कामं सुरू केली.

## (५)

मी असा विचार केला की इतिहासाच्या अभ्यासाला तर मी गोष्टीतून सुरुवात केलीच आहे. आता लोकगीतं गाऊन कवितेची सुरुवात करावी. खूप विचार करून मी ठरवलं होतं की पहिले सहा

"या मुलांना ओळीनं जायचं, रांगेत उभं राहून कामं करायची, हे शिकवायला पाहिजे. असला दंगाधोपा तर आपल्या समाजात सगळीकडे चालतो. या बेशिस्तीपासून तर या मुलांना दूर ठेवलंच पाहिजे."

महिने मला पायाभरणीचं काम केलं पाहिजे मग त्यावर सहा महिने अभ्यासक्रमातल्या शिक्षणाची इमारत उभी केली पाहिजे.

मुलांना जेव्हा असं काही नवं शिकायला मिळतं तेव्हा त्यांना त्यात गंमत तर वाटतेच पण आनंद होतो, आणि प्रसन्नपण वाटतं. मी लोकगीताचा श्रीगणेशा करून म्हटलं, " आता आपण गाणं म्हणायचं बरं का. सगळ्यांनी म्हणा. मी सांगतो,

मी सांगितलं,

"कान्हा माझ्या काळजाची कोर ग सखे
कान्हा माझ्या काळजाची कोर . . ."

पण माझ्याबरोबर कोणीच गाणं म्हटलं नाही.

मला आश्चर्य वाटलं. चौथीतल्या मुलांना तसं करा. आणि नाही यशस्वी झाला प्रयोग तर काय,हे आपला बाडबिस्तरा घेऊन चालू लागतील. "

इतक्यात मुख्याध्यापक आले. म्हणाले, " अहो लक्ष्मीशंकर, हा काय तमाशा आहे का ? सगळ्यांना गाणी गायला लावताय ते ! हे यांचे नवे प्रयोग ! ही गाणी तर सगळ्यांना माहीत आहेत. " एवढं म्हणून ते निघून गेले.

ते गेल्यावर मी मनात म्हटलं, " कठीण आहे एकूण सगळं ! बाबा रे, कुठे येऊन पडलास ? आता समूहगीत ठेव बाजूला आणि नुसतंच गाणं म्हणून दाखव. "

मी मुलांना म्हटलं, " थांबा हं. आता मी म्हणतो. तुम्ही ऐका. "

मी असा विचार केला की इतिहासाच्या अभ्यासाला तर मी गोष्टीतून सुरुवात केलीच आहे. आता लोकगीतं गाऊन कवितेची सुरुवात करावी.

एवढंही कसं नाही गाता येत ? पण त्यांना गाण्याची सवयच नव्हती. मी दुसरं गाणं म्हटलं–

"माझा हा मोर बाई माझा ग मोर
मोत्याचा चारा खातो माझा ग मोर"

आता मुलांनी थोडं थोडं गाणं म्हटलं.

पण २५ । ३० मुलांनी एकदम गायला सुरुवात केली त्या कोलाहलानं वर्ग दणाणला.

शेजारचे एक शिक्षक आले आणि म्हणाले, "काय चाललंय? बंद करा हा आवाज. एक शब्द ऐकू येत नाही वर्गात आम्हाला. "

दुसरे एक शिक्षक म्हणाले, " हे सद्‌गृहस्थ तर रोज एकेक नवा नखरा शोधून काढतात. आम्हाला काय आमच्या पोरांना सुखानं शिकवून देता का नाही ? त्यांना काय त्याची पर्वा असणार म्हणा ! त्यांचा हा प्रयोग यशस्वी झाला की साहेब आपल्याल.च म्हणायला लागतील,आता असं करा न्

मी " नथ घडवी सोनारा, माझी नथ घडवी रे सोनारा, " हे गाणं म्हटलं. माझा आवाज तर गाढवालाच ऐकावासा वाटेल असा होता ! पण समाधान इतकंच की तो बेसूर नव्हता. कसं–बसं काम झालं. मी मनात म्हटलं,देवानं मला गोड गळा दिला असता तर किती बरं झालं असतं. गाणं मी साभिनय आणि झोकात म्हटलं होतं. अभिनयाचा थोडासा अभ्यासपण केला होता. त्यामुळे माझं गाणं काही मुलांना आवडलं. काहींनी मात्र अंगाला आळोखेपिळोखे द्यायला सुरुवात केली होती. काही मुलं एकमेकांच्या खोड्या काढत होती. चंपकलाल तर डोळे चकणे करून माझी थट्टा करत होता. मी हे सगळं पाहत होतो. पण काही बोललो नाही. कारण त्यांच्या या सवयीच मला बदलायच्या होत्या.

ज्या मुलांना गाण्यात काही रस नव्हता त्यांना मी म्हटलं, " बाबांनो,तुम्ही बाजूला जाऊन बसा,आपल्या

पाटीवर जे हवं असेल ते लिहा किंवा चित्रं काढा. "

मी दुसरं गाणं म्हटलं. मुलांना आणखी गंमत वाटू लागली. मग तिसरं गाणं म्हटलं. त्यांना दुसरं गाणं खूप आवडलं होतं. ते मला पुन्हा म्हणावं लागलं. जसजसं मी गात होतो, तसतसा त्यांचा गाण्यातला रस वाढत गेला. शेवटी मी मुलांना म्हटलं, " आता रोज मी तुम्हाला अशी गाणी गाऊन दाखवीन. पण एक अट आहे. शाळेच्या आवारात ही गाणी म्हणायची नाहीत. "

पण दोन दिवसात मुलं येता जाता " नथ घडवी रे " गुणगुणायला लागली. मी त्यांना समजावून सांगितलं की गायचं असलं तर शाळेतून बाहेर पडल्यावर गा. शाळेत नको.

गावातले लोक आपसात चर्चा करू लागले,— " ही गाणी कुठल्या प्रकारची आहेत ? "

भगवान शिंपी म्हणाला, " ही तर भोंडल्याची गाणी वाटतायत. "

रघूजी म्हणाले, " हा मास्तर काय नाच्या वगैरे आहे काय तमाशातला ? भोंडला शिकवायला शाळेत आलाय का काय ? "

मुलांच्या आया विचारायला लागल्या, " तुमचे मास्तर शाळेत पोरीबाळींची गाणी कशाला शिकवतात ? "

मी तर हे सगळं ऐकलं न ऐकलंसं करून सोडून देत होतो. हे सगळं ऐकत बसलो असतो तर कान किटून गेले असते. आणि काम मात्र काही झालं नसतं.आपलं काम बरं आणि आपण बरे ! नवीन क्षेत्रं तयार होतात; ती अशीच विरोधातून होतात.

मी रोज मुलांसमोर नव्या नव्या कविता म्हणून दाखवायला लागलो. त्यांना कोणत्या विशेष आवडतात ते लक्षात यायला लागलं. असं करता करता दहा—पंधरा गाणी तर मुलांची अशीच पाठ झाली. दोन चार मुलं मात्र अशी होती की त्यांना गाण्याविषयी मुळीच प्रेम नव्हतं. इकडे गाणी चालू असली की ती मुलं तिकडे काही लिहीत वाचत बसायची आणि मी पण तिकडे फारसं लक्ष द्यायचो नाही.

याच काळात मी मनातल्या मनात वर्गात रास—क्रीडेचा कार्यक्रम करायचा असं ठरवलं आणि त्याला सुरुवात करायचीच, असंही मनाशी ठरवलं.

यावेळी माझ्या वर्गात साधारणपणे इतक्या गोष्टी व्हायच्या— बातम्या सांगणं, पुस्तकं वाचणं, खेळ, शुद्धलेखन, कविता ऐकणं, स्वच्छता आणि प्रार्थना.

## (६)

एक दिवस आमच्या शाळेत एक साधू महाराज आले. त्यांच्याबरोबर मुख्याध्यापकपण होते. मुख्याध्यापकांनी मला त्याची ओळख करून दिली— " हे महाराज चांगले धर्मोपदेशक आहेत. मुलांवर त्यांचं खूप प्रेम आहे. सगळ्या राज्यांमधून शाळांशाळांतून जाऊन ते उपदेश करतात. आज ते मोठ्या साहेबांची चिठ्ठी घेऊन आपल्या शाळेतल्या मुलांना उपदेश करायला आले आहेत.

मी त्यांना आदरानं नमस्कार केला. बसायला खुर्ची दिली आणि म्हटलं, " महाराज, आता आपण आपलं काम सुरू करावं. "

माझे विद्यार्थी तर महाराजांच्या मुंडण केलेल्या डोक्याकडे आणि तुळतुळीत चेहऱ्याकडेच पाहात होते. त्यांची बारीक देहयष्टी, तेजस्वी मुद्रा आणि हातातला कमंडलू साऱ्याबद्दल मुलांना प्रचंड कुतूहल वाटत होतं.

मी मुलांना म्हटलं, " मुलांनो, हे स्वामीजी आता आपल्याला काही उपदेश करणार आहेत. सर्वजण लक्ष देऊन ऐका. "

अलीकडे मुलं माझ्या आज्ञा पाळायला लागली होती. सगळी एकदम गप्प बसली.

स्वामीजी उपदेश करायला लागले, " विद्यार्थी जनहो, ह्या जगात परमेश्वर सर्वात मोठा आहे. हे जग त्यानंच निर्माण केलं. त्याच्यामुळेच हे जग अस्तित्वात आहे आणि तोच आपणा सर्वांचा जन्मदाता आदिपुरुष आहे. "

अशाप्रकारे त्यांनी ईश्वराचं मोठेपण सांगायला सुरुवात केली. मी गप्प बसलो होतो. मुलंपण शांत होती. पण हळूहळू त्यांची चुळबूळ सुरू झाली. कोणी आळोखे-पिळोखे द्यायला लागला. कोणी पाटीवर पेन्सिलीनं रेघा मारायला लागला, कोणी पाटीवर टकटक करून ठिपके काढायला लागला, कोणी पुस्तकं चाळायला लागला. कोणाचे डोळे झोपेनं लाल दिसायला लागले, कोणी सरळ करंगळी दाखवून बाहेर पळाला. एक गेला, त्याच्यामागे दुसरापण गेला. एक दोघंजण आपापसात गप्पा मारत होते. मी त्यांना खूण केली, ते गप्प बसले.

मी महाराजांना नम्रपणे म्हटलं, " स्वामी महाराज, ह्या मुलांना समजेल असं काही सोपं सांगता का ? " तसे स्वामीजी स्वभावानं अगदी सरळ होते. त्यांनी लगेच ते मान्य करून हिंदू धर्म, त्यातली पोथ्या पुराणं आणि त्यांचे विषय याबद्दल बोलायला सुरुवात केली. पण मुलांना त्यातही रस नव्हता.

मी मनात विचार करत होतो, हा धर्मोपदेश करायचा म्हणजे असाच का? जे धर्माचे सार अतिशय गूढ आहे आणि जे समजून घेण्यासाठी सगळं जीवन समर्पण करावं लागतं, ते काय असं समजावून देता येतं ? यालाच धार्मिक शिक्षण, ज्ञान म्हणायचं का ? धर्माचं असलं ज्ञान किती वरवरचं आणि निरुपयोगी वाटतं नाही ?

मी हा विचार करत होतो. तेवढ्यात स्वामीजी श्लोक म्हणायला लागले. मुलं मारून मुटकून ऐकत होती पण त्यांना काही कळत नव्हतं, केवळ द्यायचा म्हणून आपली हुंकार देत होती.

खरोखरच स्वामी महाराज गंभीरपणे सगळं सांगत होते. त्यांच्या मते त्यांचं हे काम अतिशय आवश्यक आणि पवित्र होतं. ते आपल्या कर्तव्याचं पालन करत होते. पण मुलांना हे सगळं गाढवापुढे गायन केल्यासारखं होतं.

आता स्वामी महाराजांनी श्लोकांचे अर्थ समजावून सांगायला सुरवात केली. मुलं मुकाट्यानं ऐकून घेत होती. नंतर त्यांनी तो अर्थ फळ्यावर लिहिला आणि मुलांना सांगितलं आपापल्या वहीत लिहून घ्या. त्यानंतर त्यांनी सांगितलं, " रोज पहाटे उठून हे श्लोक म्हणायचे, रात्री झोपण्यापूर्वीपण म्हणायचे. त्यामुळे तुमची बुद्धी, शक्ती व तेज वाढतील. "

माझ्या वर्गातली दहा-दहा बारा-बारा वर्षाची मुलं ती ! त्यांना काय धर्म आणि श्लोकांचं प्रेम असणार ?

तरी त्यांनी श्लोक लिहिले आणि त्याचे अर्थपण लिहून घेतले.

माझ्या मनात विचारांची साखळी गुंफली जात होती. धर्मशिक्षणासाठी आज काही दुसरी जागा राहिली नाही, म्हणून शाळेत ही मंडळी येऊन थडकली का ? पूर्वी देवळात प्रवचनं व्हायची आणि त्यानुसार घरात आईवडील वागायचे. घरातल्या आचार विचारांतून मुलांना धार्मिक शिक्षण मिळायचे. अलीकडे लोकांना प्रवचन ऐकायला सवड नाही, किंवा वयस्कर माणसं ती ऐकून इतकी तृप्त झाली आहेत की आता हे काम शाळेत आलेलं आहे. माझ्या मनात हे विचार चालू होते तेवढ्यात घंटा झाली आणि मी त्या विचारांच्या तंद्रीतच घरी जायची तयारी करू लागलो.

मुलं थकून गेली होती. स्वामीजींना नमस्कार करून ती घरी गेली. आता मागे राहिलो मी आणि स्वामीजी. मी म्हटलं, " महाराज, आपलं आजचं भोजन माझ्याकडे घ्याना ! "

आम्ही बोलत बसलो. बोलता बोलता धर्मावर आलो. स्वामीजी म्हणाले, " गुरुजी, अलीकडे धर्माचा लोप व्हायला लागला आहे. सगळे नास्तिक होत आहेत.

त्यामुळे लहानपणापासून मुलांवरं धर्माचे संस्कार करून आपल्याला नवीन पिढी आस्तिक बनवली पाहिजे."

मी म्हटलं, "पण स्वामीजी, ह्या कोवळ्या मुलांच्या डोक्यात ईश्वर, आत्मा, धर्म कसं काय शिरणार? आज आपण सांगत होता तेव्हा आपल्या लक्षात आलं असेल, त्यांना त्यात काडीइतका रस नव्हता. वाईट दिसेल म्हणून आपली ती मुलं गप्प बसली होती."

म्हणजे ते किती कठीण आहे! सर्वसामान्य माणसाच्या बुद्धीच्या आवाक्याच्या पलीकडचं आहे. त्यासाठी आधी खूप अभ्यास करायला हवा."

स्वामीजी म्हणाले, "अगदी बरोबर. हे ठीकच आहे पण— "

मी तसंच रेटून मध्ये म्हटलं, "धर्म म्हणजे काही बाजारचा भाजीपाला नाही. पुस्तकात छापलेलं तेवढं म्हणजे धर्म नाही. आपल्याला असं वाटत नाही का की, एवढी महत्त्वाची गोष्ट गूढ आणि गुप्तच

> **"पण स्वामीजी, धर्म काय केवळ तोंडात असतो का? धर्म म्हणजे जागृती, ती आतूनच आली पाहिजे, जेव्हा माणसाला त्याची खरी आस लागेल तेव्हाच त्याला धर्माचं ज्ञान होईल. प्रत्येकाच्या जीवनात त्याचा सुद्धा काही योग्य काळ वेळ असेल ना? आपल्याला असं वाटत नाही का की, हे असं शिकवणं म्हणजे मुलांच्या डोक्यावर ओझं देणं आहे?"**

स्वामीजी म्हणाले, "हे ठीक आहे. मुलांना काय खेळ, दंगा-धोपाच जास्त आवडतो. गोष्टी त्यांना आवडतात. धर्माची चर्चा त्यांना आवडो न आवडो त्यांच्यासमोर ती केली पाहिजे आणि काही धार्मिक श्लोकांचं पाठांतर त्यांच्याकडून करून घेतलं पाहिजे."

"पण स्वामीजी, धर्म काय केवळ तोंडात असतो का? धर्म म्हणजे जागृती. ती आतूनच आली पाहिजे. जेव्हा माणसाला त्याची खरी आस लागेल तेव्हाच त्याला धर्माचं ज्ञान होईल. प्रत्येकाच्या जीवनात त्याचा सुद्धा काही योग्य काळ वेळ असेल ना? आपल्याला असं वाटत नाही का की, हे असं शिकवणं म्हणजे मुलांच्या डोक्यावर ओझं देणं आहे?"

स्वामीजी विचारात पडले. मी पुन्हा म्हटलं, "महाराज, धर्म म्हणजे खरी जगण्याची रीत. माणसाला तारून नेणारी ती नौका आहे. ह्या संसार सागरातून तारून जाणं हे माणसाचं ध्येय. पण खरं

राहावी! कठोर परिश्रम केल्यावरच ती साधकाला प्राप्त व्हावी?"

स्वामीजी म्हणाले, "होय तर! म्हणून तर आपल्या पूर्वजांना गुरुगृही आश्रमात राहावं लागत होतं आणि धर्मज्ञान करून घेण्यासाठी कष्ट करावे लागत होते."

मी म्हटलं, "पण आज तर आपण घरोघरी, शाळाशाळांतून प्रसाद वाटल्यासारखा धर्मोपदेश करायला लागलो आहोत."

स्वामीजी म्हणाले, "कलियुग आहे हो हे कलियुग! अलीकडे गुरूजवळ आदरानं, नम्रतेनं शिष्य म्हणून जाणारे कितीजण आहेत?"

मी म्हटलं, "नसतील, तर नसू द्यात. धर्म असा वाटत सुटून कोणी धर्मात्मा बनणार नाही."

स्वामीजी म्हणाले, "मग आपणच यावर उपाय सुचवा. काय करावं?"

मी म्हटलं, "माझ्या मते, लहान मुलांना धर्मोपदेश न करणंच चांगलं. लहान वयात त्यांना

निरोगी शरीर, निर्मळ मन, स्वच्छ बुद्धी आणि कधी कमी न होणारी कार्यशक्ती यांची गरज आहे. त्यांना सगळीकडून बळकट बनवणं ही खरी गरज आहे. "

स्वामीजी म्हणाले, " खरंच आहे, बळकट असेल, त्याच्यातच आत्मबळ टिकून राहील. "

पाहिजे. घरात पालकांनी आणि शाळेत शिक्षकांनीही हा प्रयत्न करायला हवा. पाठ्यपुस्तकात इतर गोष्टींबरोबर धार्मिक माणसांच्या, प्रसंगांच्या गोष्टी असाव्यात. योग्य वेळी मुलांना इतर गोष्टींबरोबरच पुराण व उपनिषदाच्या गोष्टीही सांगता येतील.

**" माझ्या मते, लहान मुलांना धर्मोपदेश न करणंच चांगलं. लहान वयात त्यांना निरोगी शरीर, निर्मळ मन, स्वच्छ बुद्धी आणि कधी कमी न होणारी कार्यशक्ती यांची गरज आहे. त्यांना सगळीकडून बळकट बनवणं ही खरी गरज आहे. "**

**वेळ आली की माणसाला तारुण्य प्राप्त होतं, वृद्धत्व येतं तशी धर्मजिज्ञासाही आपोआप जागी होते. अवेळी गृहस्थाश्रम स्वीकारला तर जशी फजिती होईल, तसंच अवेळी धर्म शिकवायला लागलं तर होईल. लहानपणापासून रोज धर्माची चर्चा आणि श्लोकांचं पाठांतर सुरू केलं तर खरं त्याविषयाचं कुतूहल मरून जाईल. धर्मशिक्षणाचं महत्त्व जरूर आहे. पण त्याला फार महत्त्व देऊन माणसाचा विकास थांबेल, त्याचा दगड होईल असं करू नये.**

मी म्हटलं, " मला असं मनापासून वाटतं की वेळ आली की माणसाला तारुण्य प्राप्त होतं, वृद्धत्व येतं तशी धर्मजिज्ञासाही आपोआप जागी होते. अवेळी गृहस्थाश्रम स्वीकारला तर जशी फजिती होईल, तसंच अवेळी धर्म शिकवायला लागलं तर होईल. लहानपणापासून रोज धर्माची चर्चा आणि श्लोकांचं पाठांतर सुरू केलं तर खरं त्याविषयाचं कुतूहल मरून जाईल. धर्मशिक्षणाचं महत्त्व जरूर आहे. पण त्याला फार महत्त्व देऊन माणसाचा विकास थांबेल, त्याचा दगड होईल असं करू नये. "

स्वामीजी म्हणाले, " आपण म्हणता ते बरोबर आहे. मला पण हेच वाटतं. इतक्या दिवसाच्या अनुभवानं मलाही हे वाटतंच होतं की रोजच्या ह्या खुराकानं मुलांना अशा विषयाचं अजीर्ण होईल. मला असंही वाटतं की आपण त्यांना काहीतरी वेगळ्या प्रकारे धर्माचं शिक्षण द्यायला हवं. "

मी म्हटलं, " क्षमा करा, पण मला असं वाटतं की, आपण धर्म प्रत्यक्ष जगायला सुरुवात केली ज्याप्रकारे आपण मुलांना इतिहासातल्या शूरवीरांच्या गोष्टी सांगतो, तशा धर्मात्म्यांच्याही गोष्टी सांगितल्या पाहिजेत. लहानपणात एवढी तयारी मुलांना खूप झाली. इतर धर्मशिक्षण, धर्मग्रंथाचा अभ्यास,पाठांतर, कर्मकांड हे सगळं मुलं मोठी झाल्यावर देऊ म्हणून दूर ठेवावं. "

स्वामीजी म्हणाले, " असं असेल तर मग मला काय काम द्याल तुम्ही ? "

मी म्हटलं, " मुलांना शिकवायचं. आपणही माझ्या सारखंच मुलांना शिकवायला लागा. "

स्वामीजी म्हणाले, " संन्यासी होऊन आता मी शिक्षकाचं काम करू ? "

मी म्हटलं, " तेच तर आपलं खरं काम आहे स्वामीजी. आपल्यासारख्यांनी मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली तर खूप चांगले शिक्षक मिळतील आणि ह्या क्षेत्रात खरं काम व्हायला लागेल. "

स्वामीजींनी हसत हसत हातपाय धुतले.

त्या दिवसापासून स्वामीजींचा आणि माझा स्नेह वाढतच गेला. हल्ली ते माझ्याजवळ नवीन शिक्षणपद्धतीचा अभ्यास करत आहेत आणि मी त्यांच्याकडे धर्मग्रंथाचा अभ्यास करतो आहे.

दिवस झपाट्यानं जात होते आणि वर्षअखेरीपर्यंत माझा सगळा अभ्यासक्रम विशेष यशस्वीपणे पुरा व्हायलाच हवा होता. त्यावर तर माझ्या प्रयोगांचं वेगळेपण अवलंबून होतं !

मी ठरवलं, आता मुलांना इतिहास शिकवायला सुरुवात करावी.

म्हणाली, " गुरुजी, ही कसली गोष्ट ? "

" आम्हाला नको असली गोष्ट. "

" काल सांगितली तशी सांगा ना. "

" चला आपण खेळायला जाऊ या का ? "

" नको, आपण गाणी म्हणूया ना. "

मी मनात म्हटलं आपण तर पुरते अयशस्वी झालो !

मुलांनी मला चहुबाजूंनी घेरावच घातला आणि हळूहळू ते माझा हात धरून मला त्यांनी मोकळ्या मैदानावर आणलं.

**कदाचित् गोष्टीरूपानं सांगितला तरच इतिहास रंजक होईल आणि गोष्ट गोष्टीसारखी वाटायला तर हवी. त्यामुळे मूळ घटनेभोवती, खऱ्या घडू शकतील अशा काल्पनिक घटना गुंफून इतिहास शिकवला तर योग्य होईल.**

मी इतिहासाची पाठ्यपुस्तकं पाहिली. पण माझं काही फारसं समाधान झालं नाही. एका पुस्तकात चुकीच्या घटना लिहिलेल्या होत्या, दुसऱ्या पुस्तकाच्या लेखकाचा दृष्टिकोण जुनाट होता, तिसरं पुस्तक निव्वळ धंदेवाईक दृष्टीनं लिहिलेलं होतं. चौथ्या पुस्तकाच्या लेखनशैलीत दोष होते. जी पुस्तकं सर्वात लोकप्रिय होती, ती छोट्या मुलांना निरुपयोगी होती.

मी मनाशी म्हटलं, ही पाठ्यपुस्तकं काही चालणार नाहीत. काय करावं ? गोष्टींमधून यांना इतिहास शिकवला तर काय होईल ?

मुलांना गोष्ट ऐकायला आवडतच होती. पण आजवर मी त्यांना दुसऱ्याच प्रकारच्या गोष्टी सांगत होतो– त्यात काही खरं होतं, काही काल्पनिक होतं, काहीत थापा होत्या आणि काहीत पऱ्यांचं राज्य होतं. इतिहासाच्या गोष्टीत असं काही नसणार. तरी मी एक गोष्ट सांगायला सुरुवात केली. रुक्ष ऐतिहासिक घटनांमधून मी गोष्ट उभी करू लागलो. थोड्या वेळातच मुलं घाबरीघुबरी झाली.

मी रात्री घरी आलो आणि विचार करू लागलो. या मुलांना इतिहासातल्या नुसत्या खऱ्या घटना सांगून भागायचं नाही. मुळात ऐतिहासिक घटना प्रत्यक्ष पाहून कोण लिहितं ? कदाचित् गोष्टीरूपानं सांगितला तरच इतिहास रंजक होईल आणि गोष्ट गोष्टीसारखी वाटायला तर हवी. त्यामुळे मूळ घटनेभोवती, खऱ्या घडू शकतील अशा काल्पनिक घटना गुंफून इतिहास शिकवला तर योग्य होईल.

दुसऱ्या दिवशी मी एका गोष्टीला सुरुवात केली, एक भलं मोठं दाट जंगल होतं. तिथे भिल्ल लोक राहायचे. मोठे विलक्षण लोक होते ते. उडत्या पक्ष्याला ते खाली पाडायचे. असे ते धनुर्विद्येत प्रवीण होते. त्या जंगलात एक झोपडी होती.

तावडतोब मुलं गोष्टीत रंगून गेली आणि तन्मयतेनं ऐकू लागली. गोष्ट तर मी वीर वनराजाची सुरू केली होती. पण मुळातल्या घटना रंगवून सांगायला लागलो होतो.

त्या दिवशी गोष्ट अपुरीच राहिली. दुसऱ्या दिवशी मुलांनी दुसरं काही करूच दिलं नाही.

"बाकी काही नको. वनराज–वनराज–वनराजाची गोष्ट सांगा", सगळ्यांनी ओरडा सुरू केला.

मी वनराजाची गोष्ट पुरी केली. मग जरा भीत भीतच विचारलं, "ज्यांना ही गोष्ट पुन्हा ऐकायचीय त्यांनी उभे राहा."

एक नाही, दोन नाही सगळीच्या सगळी मुलं उठून उभी राहिली.

दुसऱ्या दिवशीपण तीच गोष्ट सांगितली. मग तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या दिवशीही त्याच गोष्टीची मागणी होती. कोणी खेळाचं, गाण्याचं नावही काढायला तयार नव्हते.

मी पण बघायचं ठरवलं, किती दिवस असं चालतंय ते.

एक दिवस कुणीतरी मोठ्या साहेबाकडे चुगली केली, "हा प्रयोग यशस्वी झाला की अयशस्वी, हे तर वेळ आली की सिद्ध होईलच आणि तेव्हा आपण हताश होऊन शिक्षकांना सांगाल की, सगळं वाया गेलं! पण तोपर्यंत या बिचाऱ्या मुलांचं एक वर्ष निष्कारण फुकट जाईल."

मला याचं काडीइतकं आश्चर्य वाटलं नाही. कुणी माझ्या विरुद्ध तक्रार केली होती ते मला माहीतच होतं. माझ्या वर्गातल्या मुलांना रोज गोष्टी ऐकायला मिळायच्या. त्यामुळे ती माझ्यावर खूष होती. दुसऱ्या शिक्षकांची मुलं तक्रार करायची. त्यांना गोष्ट ऐकायची होती. अभ्यासात त्यांचं लक्ष लागेनासं झालं. ती गडबड करायला लागली. यामुळे इतर शिक्षक माझ्यावर चिडले होते.

मी म्हणायचो, "बाबांनो, तुम्ही तुमच्या मार्गानं जा, मी माझ्या. मला माझे प्रयोग करू द्या. माझ्यात हिम्मत आहे. मला पण मुलांचं नुकसान होऊ नये ही काळजी आहेच आणि त्यासाठी मी कष्ट करतोय. पण माझी पद्धत वेगळी आहे. तुमची पद्धत वेगळी आहे. तुम्हाला त्रास होत असेल तर मी माझा वर्ग घेऊन लांब जाईन."

एक दिवस आमचे साहेब आमचा वर्ग पाहायला आले. मुळचा तो भला माणूस. पण अभ्यासाच्या वेळी गोष्ट चाललेली पाहून ते भडकले. मला म्हणायला लागले, "गुरुजी, ह्या मुलांना या प्रकारे इतिहास कसा येणार? गोष्ट चालू आहे तोवर ठीक आहे. गोष्ट संपली की ते या कानानं ऐकलेलं दुसऱ्या कानानं सोडून देतील. या पद्धतींनी ही मुलं अभ्यास काय करणार आणि लक्षात काय ठेवणार?"

मला पण त्यांचं म्हणणं काहीसं पटलं. मी विचार करू लागलो— गोष्टीतल्या मुख्य घटना तर मुलांच्या लक्षात राहिल्याच पाहिजेत. नाहीतर इतिहासाच्या परीक्षेत त्यांना उत्तरं देता येणार नाहीत. माझ्या डोक्यावर परीक्षेची टांगती तलवार होतीच.

दुसऱ्या दिवशी मी एक प्रयोग केला. वर्गात तिसऱ्यांदा वनराजाची गोष्ट चालू होती. मी त्यात काही बदल केले. मुलांनी तावडतोब मला पकडलं, "गुरुजी हे काय सांगताय? आधी तर तुम्ही म्हणालात, एक हजार घोडे होते आणि आता पन्नासच का म्हणता? आणि आधी म्हणालात, झोपडी नदीकाठी होती."

मी मनात म्हटलं, मुलांनी गोष्ट समजून ऐकली आहे आणि पचवली आहे. माझा धीर वाढला. मला वाटलं आता ही मुलं विसरणार नाहीत.

पण माझ्या तिखट मीठ लावून सांगितलेल्या गोष्टीचा इतिहासाच्या परीक्षेत काय उपयोग? मला या गोष्टींकडे परीक्षकाच्या दुर्बिणीतून पाहिलं पाहिजे.

वर्गात सांगितलेल्या सगळ्या गोष्टी मी लिहून काढल्या आणि मुलांना त्या बघायला दिल्या. जिथे थोडक्यात लिहिणं शक्य होतं तिथे मी थोडक्यात लिहिलं. काही ठिकाणी प्रत्यक्ष स्थळांचा, सनांचाही उल्लेख केला. गोष्ट सांगण्याची शैली आणि लिहिण्याची शैली यात मुळातच फरक असतो. ते

लक्षात घेऊन त्याप्रकारे मी गोष्टी लिहिल्या. मुलांना माझ्या या गोष्टी वाचायला आवडल्या. तीच गोष्ट ते पुन्हा पुन्हा वाचताना दिसत होते.

मला आजवर खात्री नव्हती की इतिहासाचे प्रश्न विचारल्यावर मुलं बरोबर उत्तरं देतील का नाही.

एक दिवस मी एक गोष्ट थोडक्यात लिहिली. एकेक घटना एकेका वाक्यात लिहिली. ती गोष्ट मुलांना वाचायला दिली.

मुलांनी ती गोष्ट वाचली. वाचता वाचता त्यांना त्यांनी ऐकलेली गोष्ट आठवत होती. मग एक दिवस मी धीर करून मुलांना गोष्टीतल्या घटनांबद्दल प्रश्न विचारायला सुरुवात केली. माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. फटाफट ती मुलं माझ्या प्रश्नांची उत्तरं देत होती. माझी खात्री पटली की आता ही मुलं परीक्षेत पास होतील; एवढंच नाहीतर परीक्षेनंतर सुद्धा त्यांच्या इतिहास लक्षात राहील.

काही दिवस गेले. नंतर मी प्रयोग म्हणून मोठ्या साहेबांना माझ्या वर्गात बोलावलं आणि, ' मुलांची परीक्षा घ्या, ' अशी त्यांना विनंती केली. परीक्षेनंतर त्यांनी समाधानानं म्हटलं, " दुसऱ्या वर्गात पण अशाच प्रकारे इतिहास शिकवायला पाहिजे. "

हे शब्द ऐकून मला फार धीर आला.

पण अद्याप बरंच काम शिल्लक होतं. चार महिने होऊन गेले.तरी मला जे यश मिळालं होतं त्यानं माझा उत्साह वाढत होता.

□ □ □

# भाग तिसरा

## सहा महिन्यांच्या अखेरीला

सालाबादप्रमाणे ह्या वर्षीही आमच्या शाळेत बऱ्याच आधीपासून जोरदार तयारीला सुरुवात झाली होती. शिक्षण–संचालक शाळेला भेट देणार होते. ते जेव्हा जेव्हा गावात येत, तेव्हा शाळेला अवश्य भेट देत. ते आले की शाळेत मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम होत. मुलांचे संवाद, कविता गायन, कवायती होत आणि चांगलं काम करणाऱ्या मुलांना मा. संचालक बक्षिसं देत. इतर मुलांनापण काहीना काही देत आणि शाळेत सर्व मुलांना खाऊ वाटत.

शाळेच्या सगळ्या विद्यार्थ्यांना एकत्र करून आमचे मुख्याध्यापक मुलं निवडत होते. चांगली गाणारी मुलं, चांगली बोलणारी, चांगला अभिनय करणारी मुलं त्यांना हवी होती. माझ्याकडेपण अशी मुलं पाठवायची सूचना आली होती. पण माझ्या वर्गातली मुलं ह्या निवडीच्या वेळी हजर नव्हती. मुख्याध्यापकांनी मला कारण विचारलं आणि मी उत्तर दिलं. " साहेब, माझ्या वर्गातली मुलं या कार्यक्रमात भाग घेणार नाहीत. "

" कारण ? "

" हे फक्त संचालक साहेबाना खूष करण्यासाठी आणि त्यांच्याकडून वा वा मिळवण्यासाठी चाललं आहे ना ? "

" पण ही आपली अनेक वर्षांची पद्धत आहे आणि मोठ्या साहेबांची पण तशी इच्छा आहे. "

" तसं का असेना ! पण माझ्या मनाला हे पटत नाही. मी ह्या सगळ्यात भाग घेणार नाही. माझ्या वर्गातली मुलंपण येणार नाहीत. "

" मग मला तसं मोठ्या साहेबांना कळवावं लागेल. तुम्ही मला सहकार्य देत नाही. उलट कामात अडथळे आणता. "

" आपण त्यांना अवश्य लिहा. मी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीन. "

" ठीक आहे. तुम्ही पण पाहाच काय होतं ते. "

त्याच उत्साहात आणि भीतीपोटी मुख्याध्यापकांनी मोठ्या साहेबांकडे माझी तक्रार लिहून पाठवली.

कार्यक्रमांसाठी शाळेच्या इतर मुलांना निवडलं. श्यामसुंदर आणि भीमाशंकर संस्कृत श्लोक म्हणणार होते. देवीसिंह आणि खेमचंद कविता म्हणणार होते. चम्पक, रमणीक, नेमीचंद आणि सरजनलाल नाटकात काम करायला आणि बाकी पंधरावीस उंचीपुरी, अंगानी चांगली मुलं कसरतीसाठी निवडली गेली.

मी मनात हादरलोच. मी मनात म्हटलं, धन्य आमचे मुख्याध्यापक, धन्य ही शाळा आणि धन्य सध्याची शिक्षण पद्धती ! यातल्या निवडलेल्या एकाही विद्यार्थ्याला त्या विषयात रस नाही. श्यामसुंदर आणि भीमाशंकरचा आवाज चांगला आहे, ब्राह्मणाघरची मुलं आहेत, घरात संस्कृतचं वातावरण आहे, म्हणूनच त्यांची निवड झालीय. पण त्यांना बिचाऱ्यांना कितीही पाठ केलं तरी लक्षात राहातच नाही. श्लोक पाठ करून ती मुलं थकून जातील. पण अशा परिस्थितीत करणार काय ? मला अतिशय वाईट वाटलं. घरी आलो. जेवत होतो, एवढ्यात मोठ्या साहेबांची चिठ्ठी आली, " ऑफिसामध्ये येऊन मला भेटा. थोडं काम आहे. " काम काय आहे, ते मला माहीत होतं. देवाचं नाव घेऊन मी साहेबांच्या ऑफिसमध्ये गेलो— मला लगेच कळलं, ते रागावले होते. चेहरा रागानं लाल

झाला होता. कपाळाला आठ्या होत्या. ओठही थरथरत होते. ते फारच चिडलेले होते. मला पाहून म्हणाले, " बसा. " मग म्हणाले, " तुमच्या वर्गातली मुलं सांस्कृतिक कार्यक्रमात का भाग घेणार नाहीत ? त्यात काही मुलं दिसायला चांगली आहेत. हुषार आहेत. "

मी मनातून शांत होतो पण मलाही राग आलेला होता. मी म्हटलं, " दिसायला चांगली आणि चुणचुणीत मुलं काय दुसऱ्याचं मनोरंजन करायला आहेत ? त्यांना दुसऱ्यांसमोर नाचवून शाळेला खोटं कौतुक, प्रशंसा मिळवून द्यायची काय ? "

" फसवणं ? यात फसवतो काय आपण ? "

" साहेब, आपण त्यांना जे काही दाखवणार, ते सगळं मुलांना धाकदपटशा दाखवून, मारून मुटकून, घोकंपट्टी करूनच करून घेणार ना ? आमच्या घर्षभराच्या शिकवण्यातून काही ते सहजपणे झालेलं नसणार. काही दिवस रंगीत तालीम घ्यायची, जोरदार पाठांतर करायचं, तेव्हा कुठे मुलं पोपटासारखी ते म्हणणार. ते सुद्धा ऐनवेळी मागून सांगितल्यावरच ! यात मुलांचा वेळ आणि शक्ती दोन्ही वाया जातात. त्यांचा चालू अभ्यास मागे पडतो. ज्या मुलांना ह्या गुणदर्शनासाठी आज निवडलं आहे, ती मुलं या

**" दिसायला चांगली आणि चुणचुणीत मुलं काय दुसऱ्याचं मनोरंजन करायला आहेत ? त्यांना दुसऱ्यांसमोर नाचवून शाळेला खोटं कौतुक, प्रशंसा मिळवून द्यायची काय ? "**

**" आम्ही तर ढोंगीपणा करतोच, पण मुलांनासुद्धा तो शिकवतो. आमचे संचालकसुद्धा आमच्यावर खोटे खोटे खूष होतील. समाधान झाल्याचा अभिनय करतील आणि बक्षीस देताना म्हणतील, " या मुलांनी जी बुद्धिमत्ता, कौशल्य आणि गुण दाखवले, त्यानं मला अतिशय आनंद झालेला आहे. आजच्या या मुलांमधून पुढे विद्वान, उत्तम नागरिक आणि चांगली माणसं बनणार आहेत, याची मला मनोमन खात्री पटलेली आहे. मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी काही बक्षिसं ठेवलेली आहेत. शाळेच्या या योजनेचं मी मनापासून स्वागत करतो. आज या मुलांना ही बक्षिसं देताना मला फार आनंद होतो आहे " हे सगळं काय ते मनापासून बोलतील ? "**

माझं हे तडकफडक उत्तर ऐकून साहेब जरा शांत झाले आणि म्हणाले, " हे पाहा गुरुजी, आम्हाला असे कार्यक्रम म्हणजे काही नवीन गोष्ट नाही. कित्येक वर्षांपासून हा रिवाज चालत आलाय. संचालक येतात तेव्हा असंच करण्याची पद्धत आहे. "

मी सुद्धा आता तडकून म्हटलं, " मग साहेब, मला आपण माफ करा. आजवरची पद्धत काहीही असेल. माझ्या मते ती बरोबर नाही. आपल्याला ती बंद करायला हवी. हा ढोंगीपणा आहे, नुसता दिखाऊपणा आहे आणि हे माननीय संचालकांना फसवणं आहे. "

कामाला योग्य नाहीत. त्यांना मारून मुटकूनच घोड्यावर बसवावं लागणार. "

" पण यात विश्वासघात कुठे करतो आपण ? "

" साहेब, विश्वासघात असा की, आपला साहेबांना असं दाखवून द्यायचा प्रयत्न चालला आहे की आमची मुलं हुषार आहेत, आमची शाळा सुंदर आहे, आमचं काम उत्तम आहे-पण प्रत्यक्षात आपण काय आहोत हे आपल्याला चांगलं माहीत आहे. "

साहेब काही वेळ गप्प बसले. विचार करत होते. मी पुढे म्हणालो, " आम्ही तर ढोंगीपणा करतोच, पण मुलांनासुद्धा तो शिकवतो. आमचे संचालकसुद्धा

आमच्यावर खोटे खोटे खूष होतील. समाधान झाल्याचा अभिनय करतील आणि बक्षीस देताना म्हणतील, " या मुलांनी जी बुद्धिमत्ता, कौशल्य आणि गुण दाखवले, त्यानं मला अतिशय आनंद झालेला आहे. आजच्या या मुलांमधून पुढे विद्वान, उत्तम नागरिक आणि चांगली माणसं बनणार आहेत, याची मला मनोमन खात्री पटलेली आहे. मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी काही बक्षिसं ठेवलेली आहेत. शाळेच्या या याजनेचं मी मनापासून स्वागत करतो. आज या मुलांना ही बक्षिसं देताना मला फार आनंद होतो आहे!" हे सगळं काय ते मनापासून बोलतील ? असले कार्यक्रम केवळ त्यांना खूष करण्यासाठी होत असतात. हे काय त्यांना माहीत नाही ? ज्यांना बक्षिसं मिळतात त्या मुलांकडून हे मारून मुटकून, ठोकून ठाकून करून घेतलं नाही तर ती किती विद्वान, गुणी, उत्तम नागरिक आहेत ते आपल्याला सर्वांना माहीत आहे ! "

साहेब म्हणाले, " गुरुजी तुम्ही सगळं शिकलेले आहात, पण व्यवहारज्ञान नाही तुम्हाला. तुमचं हे सगळं तत्त्वज्ञान आहे— पुस्तकी आहे हे सगळं. आम्हाला सगळ्या गोष्टींचा विचार करावा लागतो. "

मी म्हटलं, " साहेब, हे ठीक आहे, पण मी यात नाही भाग घेऊ शकणार. मला हा खोटेपणा, दिखाऊपणा सहन नाही होणार. "

" मग तुम्ही काय कराल ? "

" साहेब माझ्या वर्गाला या उचापतीपासून दूर ठेवा. "

" पण असं केलं तर फार पंचाईत होईल. बाकीचे शिक्षक आणि अधिकारी मला काय म्हणतील ? मग मात्र ते फारच कठीण जाईल. मला तर वाटत होतं की तुमच्या वर्गातली चांगली मुलं पाहून संचालक साहेब खूष होतील पण तुम्ही तर . . . . "

मी म्हटलं, " साहेब, कृपा करून मला यात ओढू नका. मी संचालकांच्या मनोरंजनासाठी काहीतरी नक्की करीन. मी असा कार्यक्रम करीन, की त्यात मुलांचा वेळ वाया जाणार नाही, शक्तीचा अपव्यय होणार नाही, आणि त्यांना ढोंगीपणा आणि दिखाऊपणाही करावा लागणार नाही.

आपण त्यांना माझ्या वर्गात घेऊन या. माझी खात्री आहे, माझा कार्यक्रम तुम्हाला आणि त्यांना दोघांनाही आवडेल. "

काही वेळ ते विचार करत होते..मग हसून मला म्हणाले, " ठीक आहे तुम्ही एक काम करा. मी तुमच्या मुख्याध्यापकांना एक पत्र देतो. ते तुम्हाला या कामातून मोकळं करतील. पण हे बघा, त्यांना डिवचू नका. ते बिचारे जुन्या पिढीतले, जुन्या विचारांचे आहेत. तुम्ही तरुण पिढीतले, उत्साही. मला तर दोघांनाही सांभाळून घेतलं पाहिजे आणि तुम्हाला कल्पना असेलच हे काम किती कठीण आहे ते. "

मी मनातल्या मनात साहेबांवर अतिशय खूष झालो आणि म्हणालो, " ठीक आहे साहेब. चलू आता मी ? "

शाळेत आज अत्यंत उत्साहानं तयारी चालली होती. मा. संचालक येणार ! मोठे साहेब येणार !

छोटे मोठे अधिकारी, गावातले नागरिक आणि इतर लोक, मुलं, शिक्षक सगळे आले होते. माझ्या सहकारी शिक्षकांची परिस्थिती कठीण होती. छाती धडधडत होती, चेहरे उदास होते, तरी ते रेटून उभे राहिले होते. आपली आपली कामं करत होते. मुख्याध्यापकांनी आमच्या शाळेतल्या गुंड व दंगेखोर मुलांना एकीकडे बोलावून घेतलं आणि तंबी दिली, " हरामखोरांनो, लक्षात ठेवा. जरा जरी गडबड केलीत तरी उद्या एकेकाला धुवून काढीन, समजलं ? "

टाळ्यांच्या आणि संगीताच्या गजरात शिक्षण संचालक आले. मुख्याध्यापकांनी खड्या आवाजात ऐटीत शाळेचा वार्षिक अहवाल वाचला. जणू काही

त्यांना लोकांची खात्री करून द्यायची होती की, मी घाबरलेलो नाही. पण अहवाल संपता संपता बहुतेक त्यांचा सदरा आतून घामाने संपूर्ण भिजला असावा आणि आवाज पडला होता. अहवाल-वाचनानंतर कविता, संवादाचं पाठांतर म्हणणं सुरू झालं. मुलं रेकॉर्ड वाजल्यासारखी कविता म्हणत होती. त्यांच्या चेहऱ्यावर कसलेही भाव नव्हते. संवादात ती हातवारे करून जोरात बोलत होती. निवडलेल्या कविता चांगल्या कवींच्या होत्या. पण इतक्या कठीण होत्या की मुलांना त्या समजतही नव्हत्या, याचं मला वाईट वाटलं. बिचारी मुलं कविता न समजताच पाठ करून, त्यावर अभिनय करून आपली रसिकता दाखवत होती!

संवादांची स्थितीही अशीच होती. संवादात नेहमी काही ना काही उपदेश असतोच. मोठ्या माणसाच्या तोंडी बरा दिसणारा उपदेश लहान मुलांच्या तोंडी आला की लाजिरवाणा वाटायचा. उपदेशांचं हे प्रदर्शन वाईट दिसत होतं. हे काही मलाच एकट्याला असं वाटत होतं असं नाही. संचालक साहेबांनाही तसं वाटत होतं. ते गालातल्या गालात हसत होते. माझ्या सहकारी शिक्षक मित्रांनी पण ह्या साऱ्या प्रकाराकडे तटस्थपणे पाहिलं असतं तर त्यांनाही ते जाणवलं असतं.

संमेलन संपलं. साहेबांनी सर्वांचे आभार मानले. आपला आनंद व्यक्त केला. बक्षिसं दिली गेली. मुख्याध्यापक, मोठे साहेब आणि इतर सगळे आजच्या कार्यक्रमावर खूष दिसत होते. साहेबांनी उपचार म्हणून म्हटलं, "आपल्या शाळेचं काम पाहून मला समाधान झालं आहे."

एवढ्यात आमच्या साहेबांनी संचालक साहेबांना विनंती केली की, "चौथीच्या ह्या शिक्षकांना त्यांचं काही काम आपल्याला दाखवायचं आहे. त्या पडद्यामागे त्यांनी सगळी तयारी करून ठेवलीय— "

साहेबांनी ताबडतोब मान्यता दिली. मी पडद्यामागे गेलो. तिसरी घंटा झाल्यावर मी पडदा उघडला. मी मध्ये आणि आजूबाजूला माझे विद्यार्थी असे आम्ही उभे होतो. आम्ही वर्गात म्हणायचो ते एक गाणं आम्ही प्रार्थना म्हणून म्हटलं. खोलीत सगळीकडे शांतता होती. सगळे विचारात पडले, 'अचानक हे काय नाटक काढलं?'

प्रार्थनेनंतर मुलांनी "उंदराची टोपी" या गोष्टीवरचं नाटक सुरू केलं. एक मुलगा उंदीर झाला होता. कमरेला दोरी बांधून त्यानं शेपूट तयार केली होती. डोक्यावरून काळं कापड पांघरलं होतं आणि चार पायांवर चालत "चू चू" करत होता. एक मुलगा शिंपी झाला होता. दुसरा रंगारी, तिसरा गोंडेवाला, चौथा डमरूवाला, पाचवा राजा आणि सहावा राजाचा शिपाई झाला होता. मी सहावा होतो. मी राजाचा शिपाई होतो.

सगळी पात्रं नेहमीच्या साध्या पोषाखात होती. राजा टेबलावर ऐटीत बसला होता. डोक्यावर त्यानं टोपी तिरकी ठेवली होती. शिपायानं, म्हणजे मी मिशांना पीळ देऊन मिशा उभ्या केल्या होत्या. डोक्यावरचा फेटा जरा तिरका बांधला होता. आणि एका हातात तलवार होती. मृदुंगवाल्याच्या हातात मृदुंग होता. बाकी सगळ्यांचे हात रिकामेच होते.

आमचा रंगमंच अगदी साधा होता. पडद्यावर मागे सगळा कार्यक्रम लिहिलेला होता. खोली स्वच्छ झाडलेली, पुसलेली होती. जमिनीवर एक छोटी सतरंजी घातली होती. ती एका मुलाच्या घरून आणली होती. रंगमंच सजवण्यासाठी शाळेत काहीच नव्हतं, तरी पिंपळाच्या आणि लिंबाच्या फांद्या आणून भिंती पानांनी सजवल्या होत्या. जमिनीवर मुलांनी रंगीत खडूंनी आपापल्या आवडीची चित्रं काढली होती. उंदराचं नाटक सुरू झालं, संपलं. छोटे, मोठे सगळे शांतपणे पाहत होते. मुलं तर अगदी रंगून जाऊन पाहत होती. मोठ्यांना फारच आश्चर्य वाटत होतं.

"हे काय आहे? हा कुठला नवीन प्रयोग आहे? हे कुठलं नवं नाटक आहे?"

मला हे सांगायलाच हवं की मुलांनी नाटक फार सुंदर केलं. कोणी काही चुका करत नव्हतं. प्रॉम्प्टिंग करायला कोणी ठेवलंच नव्हतं. काही चुकतंय असं वाटलं तर मीच सुधारून देत होतो.

दुसरं नाटक म्हातारीचं आणि तिसरं सशाचं केलं.

येऊन जाऊन एकच पडदा होता. त्यात निसर्गदृश्ये तर नावालाही नव्हती. मुलं कधी डोक्यावरून कापड घ्यायची. कधी हातात छडी घ्यायची. बाकी सगळी मदार मुलांच्या अभिनयावरच होती.

शेवटी प्रार्थना झाल्यानंतर नाटक संपलं आणि मी रंगमंचावर आलो. नाटकाचा मॅनेजर म्हणून मी प्रेक्षकांना म्हटलं, "सज्जनहो, आपण आमचा नाट्यप्रयोग अतिशय शांतपणे पाहिलात, त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानतो. या सगळ्याबद्दल मला आपल्याला काही सांगायचंय ते आपण ऐकून घ्याल अशी मी आशा करतो."

"ही चौथीच्या वर्गातली मुलं आहेत. जेव्हा मी त्यांना विचारलं की, आपण पण संमेलनाच्या निमित्तानं आपली नाटकं करायची का? तेव्हा ही सगळी मुलं आनंदानं तयार झाली. सर्वांनी उत्साहानं आणि तत्परतेनं कामाला सुरुवात केली. ज्या गोष्टी त्यांनी वाचल्या होत्या, मी त्यांना सांगितल्या होत्या, त्याच गोष्टी नाटकरूपानं त्यांनी सादर केल्या. मी त्यांना म्हटलं होतं की, आपण वर्गात जसे दर आठवड्याला काही तयारी न करता नाटक करतो तसंच आज करायचं. आम्ही वर्गात कसलंही पाठांतर घटवून घेतलं नाही. मुलांच्या लक्षात गोष्ट चांगली असते. प्रत्येक पात्राला त्याचं गोष्टीतलं स्थान माहीत असतं. त्यामुळे रंगमंचावर गोष्टीतल्या प्रसंगानुसार ही मुलं आयत्या वेळी सुचेल ते बोलत जातात. नाटकात आपले संवाद पाठ करायची कोणाला गरजच वाटत नाही. सीनसीनरी, पोषाख नाटकात कमी महत्त्वाचे असतात. महत्त्व असतं ते अभिनयाला आणि चेहऱ्यावरच्या हावभावांना. आम्ही त्याच्याकडेच जास्त लक्ष देतो. पोषाख वगैरे बदलत बसत नाही. त्यामुळे अभिनय चांगला करायला सवड मिळते. आपण आत्ता जी नाटकं पाहिली, त्यात हे आपल्याला दिसलं असेलच. माझ्या विद्यार्थ्यांना अशी नाटकं करायला खूप मजा वाटते. त्यांना मनापासून त्यात भाग घ्यावासा वाटतो. त्यांना त्याबद्दल शाबासकीचीही अपेक्षा नसते. त्यांच्या कामातूनच त्यांना संपूर्ण समाधान मिळतं.

**मुलांकडून संवाद पाठ करून घ्यायचा काळ आता मागे पडला. असं कृत्रिम पाठांतर करून घेणं क्रूरपणाचं आहे. तो असभ्यपणा आहे आणि त्यानं मुलांचा आत्मा मारला जातो."**

सज्जनहो, आपण मुलांवरच्या प्रेमानं शांतपणे ही नाटकं पाहिलीत, त्याबद्दल मी मनापासून आपले आभार मानतो."

संचालक साहेबांचा चेहरा प्रसन्न दिसत होता. मघापासून त्यांच्या चेहऱ्यावर मला आनंद दिसत होता. ते ताबडतोब उठले आणि म्हणाले,

"श्री. लक्ष्मीशंकर आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी आपलं जे खरंखुरं मनोरंजन केलं त्याबद्दल त्यांचं अभिनंदन केल्याशिवाय मला राहवत नाही. त्यांचा हा प्रयोग अतिशय सुंदर होता. मला तर असं वाटलं की, मी माझ्या देशात इंग्लंडमध्येच आहे. मुलं इथे उंदराची, शिंप्याची, राजाची भूमिका मोकळेपणानं,

स्वयंस्फूर्तीनं करताना पाहून फार फार आनंद वाटला. मुलांकडून संवाद पाठ करून घ्यायचा काळ आता मागे पडला. असं कृत्रिम पाठांतर करून घेणं क्रूरपणाचं आहे. तो असभ्यपणा आहे आणि त्यानं मुलांचा आत्मा मारला जातो. "

एवढं म्हणून ते थांबले आणि पुढे म्हणाले, " मी पुन्हा एकदा सांगतो, हे सगळं पाहून मला मनापासून आनंद झाला आहे. मी ह्या मुलांना बक्षिसं देणार नाही. नाटक करताना त्यांना जो खराखुरा आनंद मिळाला ते इतर कुठल्याही बक्षिसापेक्षा चांगलं आणि मोठं बक्षीस आहे. मला अतिशय आनंद झाला आहे. अगदी समाधान झालं आहे. हे मला पुन्हा पुन्हा म्हणावंसं वाटतं. "

संमेलन संपलं. लोक आपापल्या घरी गेले.

मोठ्या साहेबांच्या आनंदाला तर पारावार राहिला नव्हता. त्यांनी संचालक साहेबांशी माझी ओळख करून दिली. माझ्या प्रयोगाबद्दल सांगितलं. साहेबांनी माझा हात हातात घेऊन म्हटलं,

"अभिनंदन ! आपण आपल्या कामात चांगलं यश मिळवता आहात. तुमचे प्रयोग असेच चालू राहू देत. हे खरं काम आहे. बाकी सगळं दिखाऊ आणि खोटं आहे. "

संचालक साहेबांच्या या शब्दांनी आमच्या मोठ्या साहेबांना किती आनंद झाला असेल आणि किती अभिमान वाटला असेल याची वाचकांना कल्पना आलीच असेल. मी तर खूषच होतो.

मी घरी गेलो. खरोखर मी आज आनंदात डुंबत होतो. साहेबांनी माझ्याशी हस्तांदोलन करून मला शाबासकी दिली हे एक कारण होतंच. पण खरं कारण माझ्या प्रयोगांचं आज चीज झालं, हे होतं. मी मनात म्हटलं, साहेब तर एक सरकारी अधिकारी आहेत. त्यांना ही नवी शाळा आणि त्यातल्या प्रयोगांची काय माहिती असणार ? पण नंतर मला असं कळलं की, त्यांनी आपल्या मुलाला युरोपातल्या एका आधुनिक शाळेत घातलं होतं. त्यामुळे त्यांना शिक्षणातल्या नव्या प्रयोगांविषयी प्रेम होतं.

रात्री माझे दोन चार सहकारी मला भेटायला आले. संचालक काय म्हणत होते, असं ते मला विचारत होते. तेवढ्यात मोठ्या साहेबांचा मला निरोप आला आणि मी त्यांच्या घरी निघालो.

साहेब आज खुषीत होते. संचालक साहेबांनी शाळेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केलं होतं ना ! मी तिथे पोचलो तर साहेबांनी मला खुर्ची दिली आणि स्वतः आरामखुर्चीत बसता बसता मला म्हणाले, " गुरुजी आधी मला हे सांगा की, मुलांनी नाटकातले संवाद पाठ केले होते का नाही ? "

मी विचारलं, " आपल्याला काय वाटतं ? "

साहेब म्हणाले, " मला ते सगळं फारच चांगलं वाटलं. पण मुलांनी एवढे संवाद लक्षात कसे ठेवले असतील ? फार छान बोलत होते सगळे. "

मी म्हटलं, " आपण म्हणता ते खरंच आहे. मी त्यांना गोष्टी सांगितल्या होत्या. गोष्टी त्यांना आवडल्या होत्या. गोष्टीतल्या पात्रांशी ती एकरूप झाली होती. ही एकरूपताच त्यांनी नाटकात आपापल्या पद्धतीनं साकार केली. "

साहेबांनी विचारलं, " पण त्यांना अभिनय कोणी शिकवला ? "

मी म्हटलं, " शिकवणार कोण ? आम्ही दर आठवड्याला नाटक करतो. मी स्वतः मुलांच्या बरोबरीनं त्यात भाग घेतो आणि मुलं तर असतातच. मी माझ्या भूमिकेचा मला जमेल तसा अभिनय त्यांच्यापुढे करतो. मुलं पण त्यांच्या भूमिकेचा अभिनय करतात. "

साहेब म्हणाले, " पण हे सगळं कसं काय जमतं ? मला तर काही कळत नाही, "

मी म्हटलं, " साहेब, मुलं उघड्या डोळ्यांनी सगळं पाहात असतात. निरीक्षण करत असतात. शिंपी, सुतार, कुंभार, उंदीर ते पाहात असतात. त्यांचं

बोलणं, आवाज ऐकत असतात. गोष्टीत त्यांचं जे वर्णन येतं ते पण ऐकतात. परमेश्वरानं त्यांना कल्पनाशक्ती पण दिली आहे. म्हणून ती कल्पना आणि अनुभव दोन्हीच्या आधारानं अभिनय करतात. त्यांना जसं सुचतं तसं ती करतात. ते स्वतःच स्वतःचे परीक्षक होतात. त्यांना जे व्यक्त करायचंय ते काय केल्यानं रंगमंचावर व्यक्त होईल ते ती पाहात असतात. "

साहेब म्हणाले, "अहो, हे सगळं तर फार कठीण आहे. "

मी म्हटलं, "मुलं हे सगळं असा विचार करून करतात असं नाही. मीच आपल्याला मुलं जे करतात त्याचं विश्लेषण करून सांगतोय. "

साहेब म्हणाले, "अच्छा अच्छा! आलं लक्षात! गुरुजी, मात्र आज तुम्ही अगदी कमाल केलीत! संचालक साहेब आज फारच खूष झाले. "

मी म्हटलं, "आणि ते खूष झाले नसते, तरी आमचं नाटक चालूच राहिलं असतं. "

साहेब म्हणाले, "पण तुम्ही या तुमच्या प्रयोगांबद्दल मला कधीच सांगितलं नाही. तुमच्या इतर शिक्षकांना, इतकंच काय मुख्याध्यापकांनासुद्धा काही माहीत नव्हतं. "

मी म्हटलं, "हो, हे खरंच आहे. मी काही हे सगळं त्यांना कधी मुद्दाम सांगायला गेलो नाही. त्यांच्या मते, हे सगळं व्यर्थ आहे. ते सगळे सहामाही परीक्षेचा अभ्यासक्रम पुरा करण्यात गुंतलेले आहेत. "

साहेबांनी विचारलं, "पण त्यांना कशाचाही पत्तासुद्धा लागला नाही, हे कसं काय ? "

मी म्हटलं, "आम्ही आठवड्यातून एकदा बाहेर फिरायला जातो आणि तिथेच खेळ म्हणून हे सगळं करतो. मी बरोबर एक चादर घेऊन जातो. त्याचाच आम्ही पडदा करतो. दोन मुलं चादर धरून उभी राहतात. एका बाजूला नाटक करणारे असतात, दुसऱ्या बाजूला नाटक बघणारे असतात. "

साहेबांनी विचारलं, "खरंच का असं करता तुम्ही ? "

मी म्हटलं, "अगदी खरं. "

साहेब म्हणाले, "ठीक आहे. आता मी सगळ्या शाळांमध्ये वर्गात एक नाटकाचा कार्यक्रम ठेवायला सांगतो. संचालक साहेबांना तर हे एकदम आवडलेलं आहे. खरंच नाटकं फार सुंदर झाली होती. पाठांतर वगैरेची भानगड ठेवलीच नाही तर बिघडलं कुठे ? "

मी म्हटलं, "हो साहेब, मी तर याच विचारांचा आहे. आपल्याला जे योग्य वाटेल ते आपण ठरवा. "

साहेब म्हणाले, "ठीक आहे. मी असंच करतो. संचालक साहेबही म्हणत होते, कसलं पाठांतर आणि कसलं काय! सगळा वैताग असतो! मलाही माझ्या लहानपणची घोकंपट्टी आठवली की काटा येतो अंगावर! तरी मी हुषार होतो म्हणून मला फारसा त्रास झाला नाही. पण काही मुलं तर घोकंपट्टीनं हैराण होतात अगदी. "

मी मनातल्या मनात हसत होतो. मी म्हटलं, बरं झालं संचालक साहेब आले. मोठं काम झालं. माझ्या प्रयोगात आजचा हा अनुभवसुद्धा महत्त्वाचा आहे. मी घरी गेलो आणि अंथरुणावर पडलो.

## (२)

सहामाही परीक्षा जवळ येऊ लागली होती. दुसऱ्या वर्गात आधीच्या धड्यांची उजळणी झाली होती. इतिहास, भूगोल, गणित आणि भाषा या विषयांचं पाठांतर सुरू झालं होतं. एकदा हा सगळा सहामाहीचा अभ्यास पुरा झालेला होताच. माझं गाडं तर बरंच मागे होतं. परीक्षेच्या दृष्टिकोनातून पाहिलं तर माझं काहीच पुरं झालेलं नव्हतं. तरीही वर्गाची परीक्षा घेणं तर भागच होतं.

उजळणीत वेळ घालवण्याची मला गरज वाटत नव्हती. माझा तेवढा वेळ नक्की वाचणार होता. मी

अगदी परीक्षेपर्यंत शिकवणार होतो. कारण माझ्या वर्गात जे काही व्हायचं त्याची उजळणी विद्यार्थी स्वतःच करत असत. मी अशा काही पद्धती पण शोधून काढल्या होत्या, त्यामुळे मुलांची आपोआप उजळणी व्हायची. उदा. भेंड्या खेळताना मुलं पुन्हा पुन्हा कविता म्हणतच होती.

पण आजवर मी भूगोल, व्याकरण आणि शास्त्र यांना हातही लावला नव्हता. मी विचार केला की, आता व्याकरण सुरू करावं. व्याकरण एक कठीण विषय मानला जातो, आणि त्यात मुलांना फारसा रसपण नसतो. चौथीतल्या मुलांना भाषेचं विश्लेषण करण्यात काय आनंद मिळणार ? त्यात त्यांना आनंद किंवा जीवनोपयोगी काही ज्ञान मिळेल असं आहे काय ? व्याकरणात असा कोणता भाग आहे की ज्याचा अभ्यास करताना मुलांनी म्हणावं,

" वा ! मजा येते हे करताना ! याचा आम्हाला खूप उपयोग आहे. " त्यामुळे मी पक्कं ठरवलं की, मोठ्या वयात ज्या मुलांना भाषा शिकण्याची आवड निर्माण झालेली असेल, त्यांनाच व्याकरणाचा अभ्यास उपयोगी पडेल. प्राथमिक शाळेतून हा विषय शिकायला कठीण असेल आणि तो शिकताना मुलांची दमछाक होईल तो विषय शिकवावा तरी कशाला ? असले रूक्ष आणि निरुपयोगी विषय मुलांना शिकायला लागावेत इतकी इतर चांगल्या विषयांची वाण ज्ञानाच्या क्षेत्रात आहे का ?

पण मला हे शिकवणं भागच होतं. निदान, मी मान्य केलं होतं, त्याप्रमाणे परीक्षेपर्यंत मला हे माझ्या विद्यार्थ्यांना नीट समजावून द्यायला हवं होतं. तत्त्व म्हणून पटत नाही, या सबबीखाली माझ्या प्रयोगातून हे विषय वगळणं बरोबर नव्हतं. मला हे सिद्ध करून दाखवायचं होतं की चौथीच्या विद्यार्थ्यांनाही हा विषय चांगल्यात चांगल्या पद्धतीनं कसा शिकवता येईल.

मी व्याकरणाचा अभ्यासक्रम वाचला आणि ठरवलं की, या क्रमानं तर नाहीच शिकवून चालणार. नाम, सर्वनाम, क्रियापद यांच्या व्याख्या पाठ करणं लगेच जमेलही, पण ते मुलांना समजायला वेळ लागेल.

मी लहानपणी हा विषय शिकलो तेव्हा मलाही काही कळायचं नाही. नुसतं आपलं लक्षात ठेवायचं. न समजता पाठ करायचं. पण पाठ असलं की माझ्या शिक्षकांना वाटायचं याला सगळं कळलंच आहे. या पद्धतीपासून दूर राहायचं हे मी ठरवून टाकलं. आता व्याकरण शिकवायचं कसं, हा प्रश्न होताच. मी त्याबद्दल विचार केला. एक योजना आखली आणि त्याप्रमाणे कामाला लागलो. खरंच मुलांना असं शिकण्यात गंमत वाटली. त्यांना तो एक सुंदर खेळच झाला आणि दोन महिन्यात मुलं नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि अव्यय ओळखायला शिकली. वाक्यातून हे सर्व ती शोधूनही काढू लागली. एकवचन आणि अनेकवचन, स्त्रीलिंग आणि पुल्लिंग यातला फरकही त्यांना समजू लागला. कर्ता आणि कर्म ओळखायला कसं शिकवावं याचा मी विचार करत होतो. त्या काळातच एक दिवस वर्गात व्याकरणाचे खेळ चालू होते तेव्हा अचानक उपसंचालक महाशय शाळेत आले. त्यांनी माझं काम पाहिलं आणि अचंब्यातच पडले. म्हणाले, " गुरुजी, हे काय चाललंय ? मुलांना पत्ते खेळायला कसले

**मोठ्या वयात ज्या मुलांना भाषा शिकण्याची आवड निर्माण झालेली असेल, त्यांनाच व्याकरणाचा अभ्यास उपयोगी पडेल. प्राथमिक शाळेतून हा विषय शिकायला कठीण असेल आणि तो शिकताना मुलांची दमछाक होईल तो विषय शिकवावा तरी कशाला ? असले रूक्ष आणि निरुपयोगी विषय मुलांना शिकायला लागावेत इतकी इतर चांगल्या विषयांची वाण ज्ञानाच्या क्षेत्रात आहे का ?**

शिकवता ? सहामाही परीक्षा जवळ आलीय. जरा भरभर काम करा. आपली मान खाली होता कामा नये बरं. तुम्हाला तुमचा प्रयोग यशस्वी करून दाखवायचा आहे हे लक्षात ठेवा. "

मी हसून म्हटलं, " साहेब, मलासुद्धा ती काळजी आहेच. हे व्याकरणाचे खेळ चाललेत मुलांचे. आपण जरा या मुलांची व्याकरणाची परीक्षा घेऊन पाहा ना. "

साहेबांनी मुलांना दोन चार प्रश्न विचारले. मग मला म्हणायला लागले, " अरे वा ! फारच चांगली तयारी आहे मुलांची. मला एकदा तुमची पद्धत समजावून द्यायला पाहिजे तुम्ही. तुम्ही जर तुमच्या विद्यार्थ्यांना इतक्या मजेदार रीतीनं व्याकरण शिकवू शकता तर सर्वच वर्गांमध्ये तुमच्या पद्धतीनं व्याकरण शिकवायला काय हरकत आहे ? उद्या सुट्टी आहे. तुम्ही माझ्या घरी या आणि तुम्ही कुठली साधनं वापरलीत, काय काय केलंत ते सगळं मला समजावून सांगा. "

* * *

दुसऱ्या दिवशी मी व्याकरणाची सगळी साधनं घेऊन साहेबांच्या घरी गेलो आणि त्यांना सुरुवातीपासून सगळी योजना समजावून सांगितली–

" हे पाहा साहेब, हे माझं पहिलं साधन आहे. या पुठ्ठ्यावर किंवा पत्त्यांवर एका बाजूला पुल्लिंगी आणि दुसऱ्या बाजूला स्त्रीलिंगी शब्द लिहिले आहेत. वरच्या बाजूला स्त्रीलिंग आणि पुल्लिंग असं पण लिहिलं आहे, हे बघा. आता या पुठ्ठ्यांवर साधे इकारान्त स्त्रीलिंगी शब्द आहेत आणि या दुसऱ्या पुठ्ठ्यांवर वेगळ्या पद्धतीनं होणारे स्त्रीलिंगी शब्द आहेत. पहिल्यांदा मी हे पुठ्ठे मुलांना वाचायला देतो. मुलं ते वाचतात. जेवढे द्याल तेवढे पुठ्ठे किंवा पत्ते ते वाचून टाकतात. अशाप्रकारे त्यांना सहजपणे लिंगवाचक शब्दांची ओळख होते. पत्त्यांवर मी 'स्त्रीलिंग, 'पुल्लिंग ' असं पण लिहिलं आहे. त्यामुळे शब्दांच्या लिंगाचा विचार तरी त्यांच्या मनात निर्माण होतो. पण सुरुवातीला त्यांची लिंगवाचक शब्दांशी नुसती ओळख होते.

एवढं झाल्यावर एक दिवस मी त्यांना विचारलं, " मुलांनो, सांगा. बैलाची बायको कोण ? "

त्यांनी सांगितलं, " गाय ". " सिंहाची ? " " सिंहीण. " " म्हाताऱ्याची ? " " म्हातारी. " " कुत्र्याची ? " " कुत्री ". " घोड्याची ? " "घोडी."

हा प्रयोग तर चांगला यशस्वी झाला. पहिल्यांदा त्यांच्या मनातला विचार जागा झाला होता. आता शब्दांची ओळख वाढल्यावर ज्ञानपण जागं झालं.

मी म्हटलं, " चला आपण एक खेळ खेळूया. मी पुल्लिंग लिहीन. तुम्ही त्याचं स्त्रीलिंग लिहा. " मी पुल्लिंगवाचक शब्द लिहायला सुरुवात केली. मग मुलं माझ्याबरोबर मजेत स्त्रीलिंगी शब्द लिहायला लागली. तपासून पाहिलं तर चुका अगदी कमी होत्या. क्वचितच मुलांनी चुकीचं लिहिलं होतं.

मी म्हटलं, " हे बघा, आता एक दुसरा खेळ तुम्हाला शिकवतो. ही दोन खोकी आहेत. एकात पुल्लिंगी शब्द आहेत, दुसऱ्यात स्त्रीलिंगी शब्द आहेत. पुल्लिंगाचं स्त्रीलिंग शोधा आणि स्त्रीलिंगाचं पुल्लिंग शोधून काढा. जोड्या जमवा. "

मुलं तासन् तास हा खेळ खेळत बसली होती.

साहेबांनी विचारलं, " पण खोकी तर दोनच होती. सगळी मुलं कशी काय एका वेळी खेळली ? "

मी म्हटलं, " साहेब, त्यासाठी मी एक युक्ती केली होती. वर्गात दोन्ही टोकाला मी दहा दहा वर्तुळं काढली होती. एका बाजूला दहा वर्तुळांमध्ये स्त्रीलिंगी शब्द ठेवले होते आणि दुसऱ्या बाजूच्या दहा वर्तुळात पुल्लिंगी शब्द ठेवले होते. एकेका वर्तुळाजवळ एकेक विद्यार्थी बसला होता. आपल्या वर्तुळातला एक शब्द घेऊन तो त्याची जोडी शोधायला निघायचा आणि जिथे जोडी जमेल तिथे ती एकत्र ठेवून यायचा. या तऱ्हेनं प्रत्येक वर्तुळाच्या जोड्या जमायच्या. सर्व शब्द

संपल्यावर पुन्हा खेळ सुरू केला. दोनच मुलं जेव्हा खेळत असतात तेव्हा ती एकेक खोकं घेऊन जोड्या जमवू शकतात. "

साहेब म्हणाले, " वा ! ही छानच युक्ती आहे. पण नपुंसकलिंगाचं तुम्ही कसं काय केलंत ? "

" साहेब, स्त्रीलिंगी आणि पुल्लिंगी शब्द पक्के ओळखता यायला लागल्यावर एक दिवस मी फळ्यावर " नपुंसकलिंगी शब्द " असं लिहून त्याखाली थोडे शब्द लिहिले— होल्डर, टेबल, घड्याळ, डस्टर, औषध इ. मुलांनी ते शब्द वाचले. आणि विचार करू लागली की यांचं लिंग काय असेल? त्यांना जेवढी माहिती होती तिच्या आधारावर त्यांना हा निर्णय घेता येईना. मी म्हटलं, " " हे शब्द नपुंसकलिंगाचे आहेत आणि फळ्यावर ' नपुंसकलिंग ' लिहिलं.

एका मुलानं विचारलं, " पण नपुंसकलिंग याचा अर्थ काय ? "

मी म्हटलं, " जो पुरुषही नाही आणि स्त्री पण नाही तो नपुंसक. "

मुलांच्या लक्षात आलंसं वाटलं. मी लगेच म्हटलं, " लिहा, शब्द लिहा. तीन रकाने पाडा. एक स्त्रीलिंगाचा, दुसरा पुल्लिंगाचा आणि तिसरा नपुंसकलिंगाचा. "

मी त्यांना साठ शब्द घातले आणि मला स्वतःला हे पाहून फार आश्चर्य वाटलं की, बहुतेक मुलांनी अगदी बिनचूक लिहिलं होतं. मी विचार केला की, व्याख्येबिख्येच्या भानगडीत मुलांना न पाडता अशा प्रकारे याची ओळख करून देता येते आणि हळूहळू त्यांची तांत्रिक नावं, परिभाषा शिकवता येते.

साहेब म्हणाले, " पण ' कसा ? ' ' कशी ? ' असे प्रश्न विचारून शिकवलं तर ? "

मी म्हणालो, " साहेब, ती पुन्हा नुसती पोपटपंची झाली असती. मुलांना खरं न समजताच त्यांनी ते पाठ केलं असतं. आता गंमत म्हणून त्यांना कसा, कशीची पद्धत शिकवायला हरकत नाही. "

" साहेब म्हणाले, " बरं, आता पुढचं सांगा. "

मी म्हणालो, " नंतर मी ' वचन ' शिकवलं. एकवचन आणि अनेक वचन आणि तेही ह्याच पद्धतीनं. "

साहेबांनी विचारलं, " काय सांगता काय ? त्याचा पण खेळ करता का ? "

मी म्हणालो, " हो तर! एक वचनाला अनेकवचन शोधून आणतो आणि त्यांना एकत्र ठेवतो. "

साहेब म्हणाले, " ते ठीक आहे, पण तुम्ही नाम आणि क्रियापद ह्या गोष्टी कशा शिकवल्यात ? "

मी म्हटलं, " सांगतो. त्यासाठी मी प्रत्यक्ष क्रियापदं घेतली. मुलांना वाचता तर येतंच. मी त्यांना समजावून सांगितलं की मी फळ्यावर जे लिहीन तशी क्रिया त्यांनी करायची. मी त्यांना म्हटलं की मी क्रिया लिहीन तसं तुम्ही करा. मी ज्याला खूण करीन त्यानं क्रिया करायची. "

मी फळ्यावर लिहिलं— उठ, बस, पळ, झोप, खेळ, नाच, वाच, बोल, हाल, डोल, पड, उडी मार, घाबर, हास, गा इत्यादी इत्यादी.

हे सगळं करताना मुलांना खूप गंमत वाटली. मुलं म्हणायला लागली, " आणखी लिहा. " मी असेच आणखी काही शब्द शोधले आणि लिहीत गेलो. मुलं तशी क्रिया करत गेली. दुसऱ्या दिवशी मी एका कार्डावर लिहिलं, काही क्रियापदं— उठ, बस, पळ इत्यादी. सर्वांनी वाचलं— काही क्रियापदं. तिसऱ्या दिवशी मी एक डबा आणला. त्यावर लिहिलं, ' क्रियापदांची पेटी. ' मुलांनी पेटी उघडली आणि त्यातून क्रियापदं उचलली. नाच, उडी मार, पळ, मार, पड इत्यादी. ते वाचत गेले आणि तशी क्रिया करत गेले. मग मी म्हटलं, " आता तुम्ही काही क्रियापदं लिहून आणा. " मग त्यांनी काही लिहून आणली.

मी दुसरा एक खेळ काढला. त्यांना म्हटलं, " बघा हं. मी तुमच्यापैकी एकाला काहीतरी करायला सांगीन. तो काय करतो आहे ते तुम्ही फळ्यावर लिहायचं. " मी जगजीवनला म्हटलं, ' धाव. ' तो धावला. मी विचारलं, ' जगजीवन काय करतो आहे ? ' मुलांनी म्हटलं, ' धावतो आहे. ' दुसऱ्याला विचारलं, ' जगजीवन कोणती क्रिया करतो आहे ? ' तो म्हणाला, ' जगजीवन धावतो आहे. ' मग मी काही मुलांना धावा, उडी मारा, लिहा, वाचा अशा आज्ञा दिल्या आणि दुसऱ्यांना सांगितलं, ते काय करतायत ते फळ्यावर लिहा. मी पाहिलं त्यांनी सगळं बरोबर लिहिलं होतं. काही मुलांना मात्र हे कळलं नाही म्हणून लिहिता पण आलं नाही. काहींनी काही किरकोळ चुका पण केल्या होत्या.

याचप्रकारे मी पुढे म्हटलं, " आता तुमच्यापैकी जो जी क्रिया करेल, ती तुम्ही फळ्यावर लिहा. "

मी जगजीवनला म्हटलं, " पळ. " तो पळाला आणि मुलांनी लिहिलं, " पळाला. " असे खेळ घेत राहिलो. मग मी मुलांना आपसातच खेळ खेळायची, लिहायची मुभा दिली. मोठ्या उत्साहानं मुलं सारा वेळ खेळत राहिली.

त्यानंतर एक दिवस मी त्यांना जवळ बसवलं आणि विचारलं, " जेव्हा राम धावतो तेव्हा तो धावण्याची क्रिया करतो नं ? " मुलं म्हणाली, " हो. " "जेव्हा श्यामसुंदर लिहितो तेव्हा तो कोणती क्रिया करतो ? " " लिहिण्याची. " अशा प्रकारे मी त्यांना विचारायला सुरुवात केली आणि म्हटलं, " जेव्हा श्यामसुंदर धावतो तेव्हा तो कोणती क्रिया करतो ? " आणि त्यांनी बरोबर उत्तर दिलं. त्यानंतर मी फळ्यावर लिहिलं— धावतात, धाव, बोलतात, बोल, चाल ही सगळी क्रियापदं आहेत. या क्रियापदातनं आपल्याला काही क्रिया करावी लागते.

मुलांनी हे वाचलं आणि त्यांना समजलं.

साहेबांनी विचारलं, " मग तुम्ही काय केलंत?"

मी म्हटलं, " साहेब, मी मुलांना सांगितलं की, लिहून आणा. जेवढी क्रियापदं तुम्हाला माहीत असतील, तेवढी सगळी लिहून आणा. मुलं कामाला लागली आणि ज्याला जिथे क्रियावाचक शब्द मिळाला तो त्यांनी घेतला आणि लिहिला.

साहेब म्हणाले, " मग ? "

" मग मी दुसरा एक खेळ सुरू केला. फळ्यावर काही वाक्यं लिहिली— ' राम धावतो ', ' चंपक वाचतो. ' इत्यादी. आणि त्यांना सांगितलं की, यात क्रियापद फक्त ठेवा आणि बाकीचं पुसून टाका. मुलांनी अगदी तत्परतेनं ते काम बिनचूक केलं. इथेच मी क्रियापदाचा धडा थांबवला. "

साहेब म्हणाले, " मला असं वाटतं की या प्रकारे त्यांच्या लक्षात चांगलं राहात असेल, पण यात वेळ फार जातो. त्यांना बरेच खेळ खेळावे लागतात. "

मी म्हणालो, " खेळ खेळण्यातच तर आनंद आहे. त्यात जरी थोडा वेळ जास्त गेला तरी परिणाम चांगला आणि कायम टिकणारा झाला तर नुकसान काय आहे त्यात ? "

साहेब म्हणाले, " तुमचं बरोबर आहे. बरं, आता सांगा, तुम्ही नामासाठी काय केलंत ? सांगा ना. "

मी म्हटलं, " नाम शिकवायलासुद्धा मी अशाच प्रकारे सुरुवात केली. प्रथम मी माझ्या पद्धतीप्रमाणे नामांच्या चिठ्ठ्या केल्या. मुलांनी पुष्कळ नामं वाचली. पुन्हा पुन्हा वाचली. नामांच्या यादीत अनेक प्रकारची नामं होती आणि त्यांचे काही विभाग केलेले होते. त्यामुळे नामं वाचणं हा आनंददायक अनुभव होता. मला सगळं असं शिकवावं लागतं की, मुलांना पत्ताही लागणार नाही, आपण काही नवीन शिकतो आहोत ! आता मुलं क्रियापदं आणि नामांच्या चिठ्ठ्या वेगवेगळ्या करण्यात गुंतली. अशा प्रकारे दोन प्रकार वेगळे करणं ह्या खेळात त्यांची नाम आणि क्रियापदांशी ओळख पक्की होत होती. एकदा मी त्यांना

जवळ बोलावून म्हटलं, " हे बघा, मी आता काहीतरी मागतो. काय ते मी सांगणार नाही. ज्या वस्तूला काही नाव असेल ती वस्तू उचलून घेऊन या. जाऊन विचारा, ' तुझं नाव काय आहे ? ' जर त्या वस्तूचं काही नाव असेल तर ती घेऊन या. "

मुलांच्या ताबडतोब लक्षात आलं, आणि ती धावतच निघाली. फळ्याला विचारलं, " तुझं नाव ?" स्वतःच म्हटलं— " फळा ". " मग चल. " आणि फळा आला. अशाच प्रकारे टेबल आलं. दगड, काठी, धूळ, कागद, पुस्तक, पाटी, टाक, डबी जे जे मिळालं ते ते आणलं. एका मुलानं तर शेजारच्या वर्गातल्या एका मुलालाच हात धरून आणलं. मी विचारलं, " हे काय केलंस ? " तर तो म्हणाला, " गुरुजी, याला नाव आहे ना ? " कोणी म्हणायला लागला, " सूर्याला कसं घेऊन यायचं ? " दुसरा म्हणाला, " लिंबाच्या झाडाला पण नाही आणता येत. " मला खात्री पटली की, मुलांना आता नामाचा अर्थ समजायला लागला आहे. "


ज्या वस्तूला काही नाव असेल ती वस्तू उचलून घेऊन या. जाऊन विचारा, ' तुझं नाव काय आहे ? ' जर त्या वस्तूचं काही नाव असेल तर ती घेऊन या. "

मुलांच्या ताबडतोब लक्षात आलं, आणि ती धावतच निघाली. फळ्याला विचारलं, " तुझं नाव ?" स्वतःच म्हटलं— " फळा ". " मग चल. " आणि फळा आला. अशाच प्रकारे टेबल आलं. दगड, काठी, धूळ, कागद, पुस्तक, पाटी, टाक, डबी जे जे मिळालं ते ते आणलं. एका मुलानं तर शेजारच्या वर्गातल्या एका मुलालाच हात धरून आणलं. मी विचारलं, " हे काय केलंस ? " तर तो म्हणाला, " गुरुजी, याला नाव आहे ना ? " कोणी म्हणायला लागला, " सूर्याला कसं घेऊन यायचं ? " दुसरा म्हणाला, " लिंबाच्या झाडाला पण नाही आणता येत. " मला खात्री पटली की, मुलांना आता नामाचा अर्थ समजायला लागला आहे.


हा खेळ वर्गात चालला होता तेव्हाच मी नामाच्या चिठ्ठ्यांची पेटी घेऊन आलो. वर लिहिलं होतं, ' नामांची पेटी '. आत पाचशे नामं होती. मुलांना आता ही सवय अंगवळणी पडली होती. पेटी उघडून मूठ मूठभर चिठ्ठ्या त्यांनी उचलून नेल्या आणि वाचूनही टाकल्या. मी पेटीत सर्व प्रकारची नामं लिहिली होती. एकानं विचारलं, " हे ' लालिमा ' म्हणजे कशाचं नाव आहे ? " मी विचारलं, " हा जो लाल रंग दिसतो त्याला तू काय म्हणशील ? " मुलगा हसला आणि परत गेला. त्यानंतर मी नामं आणि क्रियापदं यांच्या चिठ्ठ्या एकमेकात मिसळल्या आणि ती वेगवेगळी करायला मुलांना सांगितलं. खूप मजा आली. आता त्यांना नाम आणि क्रियापद यांचा अर्थ कळला होता. तो ते स्पष्ट करू शकत होते. त्यानंतर मी त्यांना आणखी एक खेळ सांगितला. क्रियापदाला योग्य नाम शोधून काढायचं आणि नामाला योग्य क्रियापद शोधायचं. उदाहरणार्थ, ' घोडा ' शब्द घेतला तर, ' धावतो ' किंवा ' धावला ' ही क्रिया शोधून काढायची. ' खातो ' हे क्रियापद घेऊन त्याला योग्य असं ' रामचंद्र ' किंवा ' पूनमचंद्र ' असं नाम शोधायचं. मी हे सगळं त्यांना समजावून सांगितलं. शोधलेले शब्द एकत्र ठेवायला पण शिकवलं. मुलांना हे सगळं करताना फार मजा वाटली.

त्यानंतर मी फळ्यावर काही वाक्यं लिहिली आणि मुलांना म्हटलं, " यांच्यातून नामं आणि क्रियापदं निवडा आणि पाटीवर लिहा. या वाक्यातली

नामं दाखवा. एकदा या वाक्यांमधली नामं पुसून टाका. एकदा क्रियापदं पुसून टाका. "

मी पुन्हा विचारलं— "हे काय आहे? याला काय म्हणतात?" आणि त्यांनी सगळं बिनचूक सांगितलं.

या अशाप्रकारे त्यांना नाम आणि क्रियापदांचं वर्गीकरण करता येऊ लागलं.

साहेब म्हणाले, "फारच चांगली पद्धत आहे ही. खरोखरच या पद्धतीनं मुलांना क्षणभरसुद्धा अभ्यासाचा ताण असा पडला नसेल. या साधनांसाठी थोडा खर्च मात्र होतो. आणि तुमच्यासारखं जीव ओतून काम करावं लागतं. "

मी म्हटलं, "साहेब, मुलांची रटाळ पाठांतरापासून सुटका करण्यासाठी इतका खर्च झाला तरी तो काही विशेष नाही. हा सगळा खर्च मी माझ्या स्वतःच्याच खिशातून केला. जुने पुठ्ठे शोधून मी त्यांच्या पेट्या बनवल्या आणि घरात इकडे तिकडे पडलेले कागद घेऊन त्यांच्या चिठ्ठ्या तयार केल्या. "

साहेब म्हणाले, "हा खर्च तुम्हाला परत मिळण्यासाठी मी प्रयत्न करीन."

मी म्हटलं, "साहेब, हा खर्च देण्यापेक्षा जर आपण ही पद्धत मान्य केलीत आणि प्रचलित केलीत तर माझा खर्च सार्थकी लागल्यासारखा आहे. "

साहेब म्हणाले, "ठीक आहे. पाहतो मी. पण पुढे तुम्ही काय केलंत ते सांगा ना. "

मी म्हटलं, "यानंतर मी विशेषणांना सुरुवात केली. पण माझ्या या सगळ्या बडबडीनं तुम्हाला कंटाळा तर नाही ना आला? एक तर व्याकरणासारखा रुक्ष विषय आणि त्यावर घोकून घोकून सांगण्याची माझी सवय. "

साहेब म्हणाले, "छे छे, तुम्ही सांगत राहा. मला सगळी पद्धत सविस्तर समजून घ्यायची आहे. तुम्ही सगळं बारीक सारीक सांगितल्याशिवाय हा विषय समजणार नाही. अरे वा! जरा थांबा हं. चहा आलाच. चहा पिऊनच पुढे सांगा. "

तसे साहेब फार रसिक होते. उंची प्रकारचा चहा प्यायचे. त्यांना माझीही आवड माहीत होती. सुमारे वीस मिनिटं चहा पिण्यात गेली. चांगली तरतरी आली. मग आम्ही पुढे बोलू लागलो.

मी म्हटलं— "माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मी मुलांच्या समोर विशेषणांच्या चिठ्ठ्या ठेवल्या. मुलं चिठ्ठ्या वाचू लागली. एवढ्यात एकानं विचारलं, "गुरुजी हे विशेषण म्हणजे काय?"

मी म्हटलं, "बघ ना. ही सगळी विशेषणंच आहेत. बस्! विशेषण. " मुलांना मनातल्या मनात काहीतरी अर्थ समजत होता. नंतर पुन्हा खेळांना सुरुवात झाली. मुलं नामं, क्रियापदं आणि विशेषणं वेगळी करण्यात दंग झाली. "

त्यानंतर मी त्यांना एक नवा खेळ सुचवला. मी म्हटलं, "मुलांनो, मी जे मागीन ते तुम्ही आणा. "

मी म्हटलं, "पेन्सिल आणा. "

एका मुलानं पेन्सिल आणली.

"लाल पेन्सिल आणा. "

त्यांनी लाल पेन्सिल आणली.

"पिवळी पेन्सिल आणा. "

त्यानं पिवळी पेन्सिल आणली.

"पेन्सिल ठेवून या. "

मुलांनी विचारलं, "कोणती?"

मी म्हटलं, "लाल. "

परत म्हटलं, "पिवळी आणा", "तपकिरी आणा", "गुलाबी आणा", "मोठी आणा", "छोटी आणा" आणि मुलं पेन्सिली आणत गेली.

मी नवीन धडा सुरू केला. "कुठलीही एक पेन्सिल उचला. "

एक पेन्सिल उचलली गेली.

"आता ती हिरवी पेन्सिल उचला. "

हिरवी उचलली.

"आता ती पिवळी उचला. "

पिवळी उचलली.

"आता मोठी उचला. "

मोठी उचलली.

मी विचारलं, " तुम्ही कोणती विशेष प्रकारची पेन्सिल उचलली आहे ? "

" ही हिरवी पेन्सिल उचलली आहे. "

" खास कोणती पेन्सिल घेतली आहे ? "

" पिवळी घेतली आहे. "

" खारु कोणती घेतली आहे ? "

" लांब घेतली आहे. "

मी फळ्यावर लिहिलं, " हे खास शब्द आहेत. एखाद्या गोष्टीचा विशेष दाखवणारी ही विशेषणं आहेत. त्या गोष्टीचा विशेष गुण किंवा जास्तीची माहिती विशेषणं देतात. "

मुलांनी वाचलं आणि वाचून विचार केला.

मी नामांच्या आणि विशेषणांच्या पेट्या काढून त्यांना आणखी एक खेळ दाखवला, " नामाचं विशेषण शोधा आणि विशेषणाचं नाम शोधा. "

एका मुलानं'लाल'शब्द घेतला आणि नामाच्या पेटीतून ' घोडा ' शब्द काढला आणि ' लाल घोडा ' जोडून ठेवला. नामं आणि विशेषणं यांच्या ढिगातून अशा शब्दांच्या जोड्या तयार व्हायला लागल्या. मी त्यांचं काम बघायला वर्गात हिंडू लागलो. त्यांच्या काही काही जोड्या चुकीच्या पण लागत होत्या.

मग मी माझ्या वेगवेगळ्या प्रकारांनी मुलांची परीक्षा घेऊन पाहिली. त्यांना विशेषण याचा अर्थ मनातून समजलेला होता म्हणूनच लगेच बिनचूक नाम आणि विशेषण शोधून काढत होते. "

साहेब म्हणाले, " तुम्ही तर बरेच नवीन खेळ काढले आहेत. नाम, विशेषणं आणि क्रियापदांची मुलांना सुंदर प्रकारे ओळख करून दिलीत. ठीक आहे. आता त्यांना व्याकरणातल्या व्याख्या शिकवाल का नाही ? "

मी म्हटलं, " साहेब, व्याख्या तर मी शिकवलेल्याच आहेत. आता व्याकरणाच्या भाषेतल्या व्याख्या मी त्यांना नाही शिकवणार आणि परीक्षेतही तुम्ही त्यांना त्या विचारू नयेत. शब्द ओळखायला सांगावेत. "

साहेब म्हणाले, " मी ह्या विषयाची परीक्षाच घेणार नाही. मला तुमची ही पद्धत सगळ्या शाळांमध्ये न्यायची आहे. बिचारी पोरं व्याकरण पाठ करता करता जेरीला येतात. "

मी म्हणालो, " हो ना ! व्याकरण शिकता शिकता माझ्या तर नाकी नऊ आले होते आणि मारपण खूप खावा लागायचा. जेव्हा व्याकरणातल्या प्रश्नांची उत्तरं आम्हाला यायची नाहीत, तेव्हा आमचे गुरुजी आम्हाला बडवून काढायचे. "

साहेब म्हणाले, " तुमच्या वेळी कशाला ? अजूनही शिक्षक मारतातच ना ? "

मी म्हटले, " साहेब, आपण ही पद्धत बंद का करत नाही ? "

साहेब म्हणाले, " गुरुजी, हे माझ्या हातात नाही. तसं पाहिलं तर काही एका मर्यादेपर्यंत आहे म्हणा. पण आता माझं मत. . . हे तर खरंच की आपण चांगल्या प्रकारे शिकवलं तर हे मारणं, धोपटणं आपोआप बंद होईल. तुमचंच पाहा ना. व्याकरण शिकवताना तुम्हाला कुणाला शिक्षा करावी लागली ? आता सर्वनामांचं तुम्ही काय केलंत ते सांगा ना. "

मी म्हटलं, " आणखी वेगळं काय करणार ? मुलांना एक छोटा खेळ शिकवला. मी त्यांना समजावून सांगितलं, " मी म्हणजे कोण ? " ती म्हणाली, " लक्ष्मीशंकरजी. " " मग तू म्हणजे कोण ? " श्यामसुंदरनं म्हटलं, " अर्थात मी श्यामसुंदर. " मी विचारलं, " तो कोण आहे ? " " रामचंद्र. "

हे प्रश्न विचारल्यावर मी फळ्यावर लिहिलं—

मी—लक्ष्मीशंकर.

तू—भीमाशंकर.

तो—धनंजय.

आम्ही—लक्ष्मीशंकर, भीमाशंकर, श्यामसुंदर, धनंजय.

तुम्ही—रेवाराम, लक्ष्मणसिंह, टिकमसिंह, देवीप्रसाद.

ते—तिसरीच्या वर्गातले—मोहनसिंह, मूलचंद्र, लखमीचंद्र, रूपसिंह.

मुलांनी हे वाचलं आणि मी म्हटलं, "ही, मी, तू, तो यांना सर्वनामं म्हणतात." एकानं विचारलं, "सर्वनाम म्हणजे काय ?"

मी म्हटलं, "तूच विचार कर बरं."

दुसरा म्हणाला, "गुरुजी, माझा म्हणजे लक्ष्मणसिंहचा हाच अर्थ आहे ना? आणि लक्ष्मणशंकरजींचा म्हणजे तुमचा असंच ?"

तिसरा म्हणाला, "तुझा, माझा, तुमचा, त्यांचा ही पण सर्वनामं आहेत का नाही ?"

मी म्हटलं, "हो. ही सर्वनामंच आहेत."

चौथ्या मुलानं विचारलं, "पण सर्वनामाचा अर्थ काय ?"

मी फळ्यावर लिहिलं—

रामच्या हातात पाटी आहे.

रामच्या हातात पेन्सिल आहे.

राम ब्राम्हण आहे.

राम वाचतो आहे.

राम रोज लवकर येतो.

लक्ष्मीशंकर तुमचे शिक्षक आहेत.

लक्ष्मीशंकर तुम्हाला शिकवतात.

लक्ष्मीशंकर तुम्हाला फिरायला घेऊन जातात.

सर्वांनी हे वाचलं. मग मी दुसऱ्या वाक्यातला 'राम' शब्द पुसून 'त्याच्या' लिहिलं. 'लक्ष्मीशंकर' पुसून 'मी' लिहिलं. आणि क्रियापदही त्याप्रमाणे बदललं. मुलांनी ते वाचलं आणि अर्थ त्यांच्या लक्षात आला.

मी विचारलं, "आता सांगा हं, सर्वनाम कोणत्या जागी लिहायला पाहिजे ?" कोणीतरी म्हटलं, 'रामच्या जागी.' कोणी म्हटलं, 'लक्ष्मीशंकरच्या' जागी.

मी विचारलं, "राम आणि लक्ष्मीशंकर ही नामं आहेत का क्रियापदं ?"

"नामं आहेत."

"मग राम आणि लक्ष्मीशंकर या नामांच्या ऐवजी जे शब्द येतात त्यांना काय म्हणाल ?"

"सर्वनाम."

साहेब हसले. म्हणाले— "वा! तुम्ही तर हाडाचे शिक्षक आहात. अगदी सविस्तर तपशीलवार प्रत्येक गोष्टीचं वर्णन करता तुम्ही."

मी म्हणालो, "साहेब, ही सवय कशी सुटायची आता? मी काही वकील नाही थोडक्यात आटपायला."

माझ्या लक्षात आलं की, साहेब आता थकले होते. माझ्या गोष्टी ऐकताना त्यांना मजा खूपच वाटत होती. तरी मी बोलणं थांबवलं. आता त्यांचा निरोप घ्यावा, असं म्हटलं आणि त्यांनी 'हो' म्हटलं. साहेब म्हणाले, "तुमच्या वर्गाच्या परीक्षेतून व्याकरणाला मी मुक्त केलेलं आहे. पण अजून काळ आणि विभक्ती बाकी आहे. जेव्हा हे शिकवाल तेव्हा पुन्हा एकदा येऊन सगळं सांगून जा. पुढच्या वर्षी मला ह्याच्या संबंधात काहीतरी करायचं आहे."

मी पण थकून भागून घरी आलो आणि झोपून गेलो.

## (३)

सहामाही परीक्षेचे दिवस आले. साहेब स्वतःच परीक्षा घेणार होते. त्यांना परीक्षा घ्यायला आवडायची.

मी माझ्या वर्गाची तयारी करून ठेवली होती. पण माझ्या स्वतःच्या पद्धतीनं. सगळ्या शाळेची परीक्षा झाल्यावर माझ्या वर्गाची परीक्षा घ्यावी अशी मी परवानगी मागितली होती. आणखी म्हटलं होतं की, माझ्या वर्गाच्या परीक्षेच्या वेळी मुख्याध्यापक,

आणि इतर शिक्षकांनीही तिथे यावं. शिवाय माझ्या वर्गाच्या परीक्षेच्या वेळी प्रत्येक वर्गातल्या पाच पाच मुलांनीही यावं अशी माझी इच्छा होती.

परीक्षेच्या दिवशी मी शांत होतो. माझ्या छातीत धडधड नव्हती. मनात पास–नापासाची टोचणी नव्हती. माझ्या अनुभवाप्रमाणे, काळजीचं कारण नव्हतं. मुलांनी तर आपण होऊन म्हटलं होतं की, आपण जे रोज करतो तेच आज पण करायचं आहे. परीक्षेत तर सगळे पासच आहेत. आज आपलं काम पाहायला सगळ्यांना बोलावलं आहे.

माझ्या नाटकाच्या पद्धतीप्रमाणे मी सगळी तयारी पडद्याच्या पाठीमागे करून ठेवली होती. पुढे सगळ्यांना बसवल्यानंतर मी पडदा दूर केला.

मी ते ऐकलं आणि म्हटलं, " भाषेवर प्रभुत्व मिळवण्याची, सांगता येण्याची, लक्षात ठेवण्याची, रसिकपणाची आणि अभिनयाची. "

सगळे शिक्षक दुसऱ्या परीक्षेची वाट पाहू लागले.

पुन्हा पडदा दूर झाला. सगळे विद्यार्थी गोल बसले होते. समोर फळ्यावर लिहिलं होतं– ' भेंड्यांचा खेळ. '

एकानं कविता म्हटली आणि दुसऱ्यानं तिच्या शेवटच्या अक्षरापासून सुरू होणारी दुसरी कविता म्हटली. याप्रकारे सगळं वर्तुळ पूर्ण झालं. पुन्हा भेंड्या सुरू झाल्या.

**परीक्षेच्या दिवशी मी शांत होतो. माझ्या छातीत धडधड नव्हती. मनात पास-नापासाची टोचणी नव्हती. माझ्या अनुभवाप्रमाणे, काळजीचं कारण नव्हतं. मुलांनी तर आपण होऊन म्हटलं होतं की, आपण जे रोज करतो तेच आज पण करायचं आहे. परीक्षेत तर सगळे पासच आहेत. आज आपलं काम पाहायला सगळ्यांना बोलावलं आहे.**

स्टेजवर दुसऱ्या वर्गाच्या काही तुकड्या बसल्या होत्या. एकेका तुकडीला माझ्या वर्गातला एकेक विद्यार्थी गोष्ट सांगत होता. गोष्ट सांगायचं काम आळीपाळीनं चालू होतं. प्रत्येक विद्यार्थ्यानं आपली गोष्ट आपली आपणच निवडली होती. विसरलं तर पाहायला पुस्तक जवळ ठेवलं होतं. जो तो आपल्या पद्धतीनं गोष्ट मुलांना सांगत होता आणि ऐकणाऱ्याबरोबर स्वतःही गोष्टीचा आनंद घेत होता. त्याला गोष्ट सांगणं म्हणजे काय ते चांगलं समजलं होतं. हावभाव, अभिनयासकट अर्थ समजून तो गोष्ट सांगत होता. गोष्टी पुऱ्या झाल्या आणि सगळे शिक्षक एकमेकांकडे पाहायला लागले. मी म्हणालो, " ही माझी एक परीक्षा आहे. "

एका शिक्षकानं दुसऱ्या शिक्षकाला हळूच कानात विचारलं, " ही कशाची परीक्षा ? "

साहेबांनी विचारलं– " यांना समोरासमोर का नाही बसवलं ? या खेळात दोन गट लागतात ना ? "

मी म्हटलं– " नाही साहेब. मी ती पद्धत सोडून दिली आहे. त्यामुळे मुलांच्या मनात हारजितीची भावना निर्माण होते. पण या पद्धतीत एका मुलाला आलं नाही तर त्याच्या पुढचा म्हणायला सुरवात करतो. आणि खेळ पुढे जातो. एखाद्या वेळी लक्षात राहिलं नाही तर दुसऱ्या वेळी लक्षात येतंच. "

साहेबांनी आपली दाढी खाजवली आणि डोळ्यांची उघडझाप केली.

मुलांना मी थोडा वेळ खेळण्यासाठी बसवलं होतं. पण त्यांना इतकी गंमत वाटत होती की घंटा झाल्यावरही उठायचं कोणी नाव घेईना. मी त्यांना आणखी थोडा वेळ दिला आणि मग पडदा पडला. पडद्याबाहेर येऊन मी म्हटलं, " मित्रहो, आपण

पाहिलंत की, या मुलांना पाठ्यपुस्तकातल्या किती कविता पाठ आहेत. कवितेच्या तासाला मी रोज हा खेळ घेतो. "

साहेबांनी म्हटलं, " ऐका सगळ्यांनी. "

पुन्हा पडदा वर गेला. गोल बसलेली सगळी मुलं कोडी सोडवत होती. त्यांच्या अंगात उत्साह संचारला होता.

मुलांना सांगतो की तुम्ही नकाशामधले आणि शब्दकोशातले शब्द पहात जा. यामुळे खूपसे शब्द तुमच्या तोंडात बसतील. आता मुलं खेळ खेळायच्या ऐवजी वेगवेगळ्या प्रकारचे शब्द शोधून काढण्यात बराच वेळ घालवतात. एकमेकांना ते शब्द सुचवतात आणि काही मुलं तर ते लिहितातपण. "

**अभ्यासक्रमात भाषाशिक्षण तर आहे ना ? आणि मुलांची जिज्ञासा वाढावी ज्ञान वाढावं, त्यांचा विकास व्हावा हा तर सगळ्या अभ्यासक्रमाचा पाया आहे. माझे सगळे विद्यार्थी या खेळावर बेहद्द खूष आहेत. त्यांना पुष्कळ कोडी माहीत आहेत. म्हणूनच मी ती अभ्यासक्रमात घेतलीत. पुढच्या वर्षी आपणही अभ्यासक्रमात कोड्यांचा समावेश करा.**

साहेब म्हणाले, " ओहो ! ही कोडी मी लहानपणी ऐकली होती. पण अभ्यासक्रमात ती कुठे आहेत ? "

मी म्हटलं, " साहेब, अभ्यासक्रमात भाषाशिक्षण तर आहे ना ? आणि मुलांची जिज्ञासा वाढावी, ज्ञान वाढावं, त्यांचा विकास व्हावा हा तर सगळ्या अभ्यासक्रमाचा पाया आहे. माझे सगळे विद्यार्थी या खेळावर बेहद्द खूष आहेत. त्यांना पुष्कळ कोडी माहीत आहेत. म्हणूनच मी ती अभ्यासक्रमात घेतलीत. पुढच्या वर्षी आपणही अभ्यासक्रमात कोड्यांचा समावेश करा. "

त्यानंतर आम्ही शब्दांचा खेळ सुरू केला. एक शब्द बोलायचा. त्याच्या शेवटी जे अक्षर येईल त्यानं सुरू होणारा दुसरा शब्द सांगायचा आणि त्यानंतर तिसरा. हा खेळ तसा सोपा होता. पण मुलांनी कोणी गावांची, कोणी नद्यांची, कोणी पर्वतांची, कोणी मुसलमानांची, कोणी हिंदूंची, कोणी जातींची, कोणी ब्राह्मणांची, कोणी वाण्यांची, अशी नावं आपली आपली निवडून ठेवली होती. हे लक्षात आल्यावर तर सर्वांना हा खेळ अधिकच रम्य वाटला.

मी माझ्या शिक्षक मित्रांना म्हटलं, " या खेळासाठी जास्तीत जास्त शब्द जमवण्यासाठी मी

साहेब म्हणाले, " गुरुजी, या खेळामागे फार मोठा अर्थ आहे. त्याप्रकारचे सगळे खेळ बुद्धीची ताकद आणि सामान्यज्ञान वाढवण्यासाठी सगळ्या वर्गात सुरू करायला हवेत. "

माझ्याकडे कौतुकानं पाहत साहेब म्हणाले, " तुम्ही आपले बरे नव्या नव्या गोष्टी शोधून काढता. "

साहेबांना ऐकू न जाईल अशा बेतानं एका शिक्षकानं दुसऱ्या शिक्षकाला हळूच म्हटलं— " अरे, यासाठीच तर लक्ष्मीशंकर इथे आलेत. त्यांना थोडंच शिकवायचंय् ? ते तर मजा करतायत मजा. आमची इथे शिकवता शिकवता मान मोडून जाते आणि यांच्याकडे पाहा. खेळांशिवाय त्यांच्या कार्यक्रमात इतर काही नाहीच आहे. "

दुसऱ्या शिक्षकानं म्हटलं, " अहो गुरुजी, आता शिकवण्याची जुनी पद्धत गेली. नव्या पद्धतीचा जमाना आला आहे. आता ते पाठांतर, मोठे मोठे ग्रंथ, शेंडी टांगून शिकणं सगळं गेलं. आता शिकण्याऐवजी हे खेळ राहिलेत नुसते. पुढे आणखी काय खेळखंडोबा व्हायचाय् राम जाणे ! आता पोरांचं शिकण्यात लक्ष नसतं. खेळ घ्या, म्हणजे मग मास्तर चांगला ! "

मी मुलांचं काम दाखवण्यात गुंतलो होतो. त्यामुळे तेव्हा मला ह्या गप्पा ऐकता आल्या नाहीत. नंतर मला कुणीतरी हे सांगितलं. असो !

मी शिट्टी वाजवली आणि सगळी मुलं हातात झाडू घेऊन ओळीत उभी राहिली. मी झाडूसकट त्यांची कवायत घेतली आणि त्यांना चहूकडे जाऊन झाडायला सांगितलं. सबंध शाळाभर मुलं गेली. जिथे त्यांना कचरा दिसला तिथे त्यांनी झाडलं आणि जो केर जमला तो एका टोपलीत घालून आमच्यासमोर हजर झाली.

झाल्याशिवाय आमचं कामच सुरू होत नाही. आता या मुलांनासुद्धा घाण सहन होत नाही. "

आमच्या ह्या गप्पा चालू होत्या तेवढ्यात मुलं हात पाय तोंड धुवून आली आणि मी दुसरी शिट्टी वाजवली.

साहेब म्हणाले, " तुमचा हा प्रयोग अजबच आहे. चौथीला शिकवताना अशा आणखी कोणत्या नव्या नव्या गोष्टी केल्या तुम्ही ? "

मी म्हणालो, " साहेब माझ्या प्रयोगात सर्वच गोष्टी आहेत. चौथीचा अभ्यास शिकवायचा तर

**आजकाल आपल्या देशात अस्वच्छतेबद्दल खूप बोललं जातं. अस्वच्छता हा एक राष्ट्रीय कलंक आहे. जोवर केरकचरा कुठेही पडून राहिलेला आम्हाला चालतो, तोवर आमची परिस्थिती सुधारायची नाही. म्हणून त्याच्याविरुद्ध मी मोहीम हाती घेतली आहे. देश स्वच्छ करायला आपल्याला लढाईच करावी लागेल. झाडूची कवायत हे त्याचं प्रतीक आहे. ह्या मुलांचा पहिला धडा ही झाडूची कवायत आहे. आमचा वर्ग स्वच्छ झाल्याशिवाय आमचं कामच सुरू होत नाही. आता या मुलांनासुद्धा घाण सहन होत नाही.**

अधिकारी साहेब आणि शाळेतले इतर शिक्षक आश्चर्यानं हे सगळं पहात होते. माझ्या वर्गातल्या मुलांची ही पण एक परीक्षा होती.

साहेबांनी विचारलं, " हातात झाडू घेऊन कवायत कशाला घेतली ? माझ्या काही लक्षात आलं नाही. "

मी म्हणालो, " साहेब, आजकाल आपल्या देशात अस्वच्छतेबद्दल खूप बोललं जातं. अस्वच्छता हा एक राष्ट्रीय कलंक आहे. जोवर केरकचरा कुठेही पडून राहिलेला आम्हाला चालतो, तोवर आमची परिस्थिती सुधारायची नाही. म्हणून त्याच्याविरुद्ध मी मोहीम हाती घेतली आहे. देश स्वच्छ करायला आपल्याला लढाईच करावी लागेल. झाडूची कवायत हे त्याचं प्रतीक आहे. ह्या मुलांचा पहिला धडा ही झाडूची कवायत आहे. आमचा वर्ग स्वच्छ

आधी मला पहिलीचा अभ्यास पक्का करून घ्यायला हवा ना ? "

मुलं धावत बाहेर गेली होती आणि शाळेच्या आसपासच्या झाडांवर चढली होती. मी दुसरी शिट्टी वाजवल्यावर त्यांनी पटापटा झाडावरून उड्या मारल्या आणि तिसरी शिट्टी वाजवल्यावर ती पुन्हा वर चढली आणि चौथ्या शिट्टीला खाली उतरली.

मुख्याध्यापकांना आता राहवेना– " वा रे वा ! हे काय शिकवणं म्हणायचं का काय ? हे तर शाळेत न शिकवता येतं सगळं. यात शिकवायचं काय असतं ? "

मी म्हटलं, " अलीकडे शिकवल्याशिवाय या गोष्टी येत नाहीत. आणि आपण तर मुलांना या गोष्टी शिकूही देत नाही. "

मुख्याध्यापक– " हे अजिबात खरं नाही. "

मी म्हटलं— " ही आपल्या शाळेतली इतर मुलं उभी आहेत यांनाच विचारा ना कितीजण असे झाडावर चढतात आणि उड्या मारू शकतात. "

लगेच साहेबांनी सगळ्या मुलांना चढायचा हुकूम दिला. जेमतेम दोघंतिघं कसेबसे चढू शकले.

मी म्हटलं— " साहेब, या मुलांना अशा प्रकारच्या बऱ्याच गोष्टी मी शिकवल्यात. ह्या सगळ्याच गोष्टी माझ्या प्रयोगाचे आणि शिक्षणाचे विषय आहेत. " मग जरा हसून मी म्हटलं, " साहेब, परीक्षेच्या पत्रकात या सर्व खेळांची नावं आहेत. त्यांना आपल्याला मार्क द्यायचे आहेत. "

साहेबांनी विनोदानं उत्तर दिलं— " अच्छा अच्छा ! आता तुम्हालापण मार्क हवेत काय ? "

मी तिसरी शिट्टी वाजवली आणि मुलं शाळेच्या कपाटातून भोवरे आणि दोऱ्या घेऊन आली आणि आपले भोवरे फिरवायला लागली. गल्लीमध्ये मवाली मुलं खेळतात तशी नाही. अगदी गडबड न करता ती मुलं खेळत होती. मुलं अगदी एकाग्र होती. त्यांच्या हातून कोणतीही ओढाताण किंवा चूक होत नव्हती. खेळासाठी जागा निश्चित होती आणि एक लीडर होता. आम्ही सगळेच लहानपणी हा खेळ खेळायचो त्यामुळे प्रत्येकाला खेळ बघताना आनंद होत होता.

साहेबांनी विचारलं, " अरे वा ! यांना हा खेळ कधी शिकवला तुम्ही ? ही मुलं अगदी शिस्तीत आणि नियमानी हा खेळ खेळतायत. "

मी म्हटलं, " साहेब, आमची खेळायची जागा तर नदीकिनाऱ्यावर आहे. जेव्हा आम्ही फिरायला जातो तेव्हा असे अनेक खेळ खेळतो. खेळता खेळता किती गोष्टी यायला लागतात त्याला तर काही अंतच नाही. "

साहेब इंग्रजीत म्हणाले— " तुम्ही म्हणता ते अगदी खरं आहे. मी नुकतंच वाचलंय् की मुलं खेळातून बरंच काही शिकतात. (मुख्याध्यापकांकडे पाहून—) तुम्ही तुमच्या शाळेत तरी हे सगळं सुरू करा की. "

मुख्याध्यापक म्हणाले, " पण साहेब, आम्ही हे सगळं करायला लागलो तर अभ्यासक्रम कसा पुरा होणार ?

या गुरुजींच्या डोक्यावर कसली जबाबदारी नाही हो ! वर्षभर जसं जमेल तसं शिकवतील आणि नाही पूर्ण झालं तर म्हणतील, हा प्रयोग होता. जेवढं झालं तेवढं झालं. बाकीचं होऊ शकलं नाही म्हणून केलं नाही. मुलांना जमलं नाही. आणि आपणही म्हणाल की, प्रयोगात जे सिद्ध होईल तेच खरं. आमचं वेगळं आहे. आम्ही अभ्यासक्रमाच्या साखळदंडांनी जखडलेलो आहोत. आपणच तर वरून लिहून विचारता की काम पुरं का नाही झालं ? निकाल व्यवस्थित का नाही लागला ? अभ्यासक्रम पूर्ण का नाही झाला ? "

साहेब किंचितसे हसले. मनातल्या मनात शरमिंदेही झाले पण गप्प राहिले.

मी शिट्टी वाजवली आणि मुलांनी आपले सदरे काढले. मुलं ओळीत उभी राहिली. सगळी मुलं अगदी ताठ उभी होती. व्यवस्थित शिस्तीत उभी होती. सगळी स्वच्छ होती. ब्राह्मण मुलांची जानवी मळलेली नव्हती. हात, तोंड, केस सगळं स्वच्छ व्यवस्थित होतं. कुणाच्याही डोळ्यात घाण नव्हती. टोप्या धुतलेल्या होत्या.

साहेबांनी हसून विचारलं— " ही किती दिवसांची तयारी आहे ? एवढं साफसूफ करायला बरेच कष्ट पडले असतील नाही ? "

मी म्हटलं, " साहेब, सहा महिने तयारी चालू आहे. सहा महिने मेहनत घेतो आहे. आपल्याला माहीतच आहे सगळं. "

मी दुसरी शिट्टी वाजवली. मुलांनी सदरे चढवले. आणि ती खुशीत ओळीत उभी राहिली आणि नमस्कार करून निघून गेली.

मुख्याध्यापकांनी रोखून पाहिलं आणि विचारलं, " झाली का काय परीक्षा ? "

मी म्हटलं, "नाही. अजून अवकाश आहे. आपण सगळ्यांनी त्या खोलीत चला."

मुख्याध्यापक– "असं असं! ती खोली! तुम्ही ती बऱ्याच दिवसापासून आमच्याकडून मागून घेतली होती ती. कोणालाही आत जाऊ देत नव्हता. काहीतरी सटरफटर जमवून ठेवलंय् ना त्यात ?"

मी म्हटलं, "आपण चला तर."

आम्ही सगळे त्या खोलीत आलो.

साहेब– "अरे वा! हे तर संग्रहालयच दिसतंय्."

मुख्याध्यापक– "मला वाटलंच होतं असं काहीतरी असणार. मुलं सारखी वस्तू आणायची, ठेवायची. त्यातच दंग असायची."

मुख्याध्यापक म्हणाले, "साहेब, हे बऱ्याच वेळा मुलांना सहलीला घेऊन जातात. तिथूनच हे सगळं आणलं असेल."

साहेब म्हणाले– "हे तर प्रचंडच काम झालंय्! आता हे संग्रहालय असंच ठेवा. सबंध शाळेला याचा उपयोग होईल. आपण शिक्षकांना सांगूया की, त्यांनी या संग्रहात भर घालून तो आणखी मोठा करावा."

मुख्याध्यापक पुटपुटले, "आणि शिकवायचं कधी ?"

मुलांनी संग्रहालयाची एक यादी तयार केली होती. साहेबांना ती वाचून फार आनंद झाला.

**"ह्या सगळ्या वस्तू कशा आणि कुठून जमवल्या ? मुलांना निसर्गाची ओळख करून द्यायला या सगळ्यांचा फार चांगला उपयोग होईल."**

**मुख्याध्यापक म्हणाले, "साहेब, हे बऱ्याच वेळा मुलांना सहलीला घेऊन जातात. तिथूनच हे सगळं आणलं असेल."**

मी म्हटलं, "हो ना! किती उत्साहानं मुलांनी हे काम केलं आहे. मी त्यांना सांगितलं होतं तुम्हाला जसं मांडायचं, सजवायचं असेल तसं सजवा. मी तुम्हाला काहीही सूचना देणार नाही."

साहेब– "म्हणजे ही सगळी मांडामांड, सजावट मुलांनीच केलीय् ?"

मी म्हटलं– "होय!"

साहेब– "हे कसं शक्य आहे? इतकी कलापूर्ण मांडणी आहे ही!"

मी गप्प बसलो माझ्या कामाचा आता खराखुरा परिणाम दिसू लागला होता.

साहेबांनी विचारलं, "ह्या सगळ्या वस्तू कशा आणि कुठून जमवल्या ? मुलांना निसर्गाची ओळख करून द्यायला या सगळ्यांचा फार चांगला उपयोग होईल."

म्हणायला लागले, "ह्या मुलांना तर बक्षिसं दिली पाहिजेत."

मी म्हटलं– "हे संग्रहालय तयार करण्यातला आनंद हेच मोठं बक्षीस आहे. हे सगळं संग्रहालय म्हणजे मुलांचं बक्षीसच आहे."

साहेब– "तरी पण–"

मी काही बोललो नाही.

त्या खोलीच्या एका कोपऱ्यात काही मातीची खेळणी ठेवली होती.

साहेब– "ही कोणी केली आहेत ?"

मी म्हटलं– "मुलांनीच. ह्या खोलीत ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत माझं काही नाही."

साहेब– "पण या मुलांनी एवढी सगळी खेळणी केली कधी, भाजली कुठे ?"

मी— " नदीकिनाऱ्यावर दर आठवड्याला मुलं खेळणी बनवायची आणि तिथेच भट्टी लावून ती भाजलीपण. "

साहेब— " वा वा ! गुरुजी तुमचं डोकं म्हणजे अजब आहे. तुमचे हे प्रयोग अद्‌भुतच आहेत. जेव्हा तुम्हाला काही साधनं मिळत नाहीत तेव्हा नदीकिनाऱ्यावर जाता— शेतातल्या मातीचा लगदा बनवता. आणि . . . शाबास ! आता मला— "

मी त्यांना पुढे बोलूच दिलं नाही. मध्येच मी म्हणालो— " आता आपण या खोलीत आरामात बसा थोडा वेळ. मी मुलांचं आणखी काही काम दाखवतो. " सगळे बसले.

मुख्याध्यापक विचारात पडले होते. ते म्हणाले— " साहेब, हे सगळं काम आम्हीपण करू शकतो पण मग मुलांना शिकवायचं कधी ? "

इतक्यात मी काही पुट्ठे घेऊन आलो. एका पुठ्ठ्यावर मी शिकवायला सुरुवात केली तेव्हाच्या मुलांच्या अक्षरांचे नमुने होते. दुसऱ्यावर काल काढलेल्या ताज्या अक्षरांचे नमुने होते. पुठ्ठ्यावर लिहिलं होतं—

" अक्षर प्रगती— सूचक पत्रिका. "

सर्वांना अक्षरातली ही प्रगती आवडली.

पण एक शिक्षक दुसऱ्याच्या कानात म्हणाले— " अहो, निवडक मुलांकडून हे सावकाश लिहून घेतलेलं असणार. "

मला हा कद्रूपणा खटकला. पण मी त्याची पर्वा केली नाही. मला हा विचार अगदी तुच्छ वाटला.

साहेब— " गुरुजी, तुम्ही हा बदल आणि सुधारणा कशी केली ? "

मी— " अनेक उपायांनी. "

साहेब— " तुमच्या उपायांचा समावेश शाळेच्या कामात केला तर जमेल का ? "

मी— " हो तर ! जरूर जमेल. मी आपल्याला दाखवतोच. "

मग मी एक दुसरी वही आणली. त्यात गेल्या सहा महिन्यात मुलांनी एकूण जितकी पुस्तकं वाचली होती त्यांची यादी होती. वहीच्या प्रत्येक पानावर मुलाचं नाव होतं. प्रत्येक मुलानं पुस्तक वाचल्यावर आपल्या हातानं त्यात पुस्तकाचं नाव लिहिलं होतं.

यावरून मी त्या वहीच्या शेवटच्या पानावर काही आकडे लिहिले होते. किती विद्यार्थ्यांनी एकूण किती पुस्तकं वाचली, प्रत्येकाला खर्च किती आला, किती पुस्तकं वाचली गेली, सर्वात जास्त पुस्तकं कोणी वाचली, सर्वात कमी कोणी वाचली. मुलांनी कोणती पुस्तकं अधिक आवडीनं वाचली होती तेही नोंदीवरून काढून लिहिलं होतं.

साहेबांनी यादी पाहिली आणि त्यांना आश्चर्य वाटलं. " एवढी पुस्तकं वाचली ! आणि इतक्या विषयांची ? ही कधी वाचली असतील एवढी ? "

" होय साहेब. एवढी सगळी पुस्तकं मुलांनी वाचलीत आणि तीपण माझ्या डोळ्यांदेखत. "

साहेबांनी मुख्याध्यापकांना विचारलं— " गुरुजी, आपल्या सातव्या इयत्तेतल्या मुलांनी ह्या सहा महिन्यात किती पुस्तकं वाचली असतील ? "

मुख्याध्यापक म्हणाले— " साहेब, कसं वाचणार ? मुलं अवांतर वाचन करायला लागली तर इतिहास, भूगोल, भूमिती यांचं काय होईल ? त्याचा अभ्यास कधी करणार मुलं ? "

साहेब बोलले नाहीत पण काही विचारात पडले होते. माझ्याकडे पाहून म्हणाले, " तुमच्या विद्यार्थ्यांची भाषेची परीक्षा न घेताच त्यांना पास केलंय्. आता सांगा आणखी काय बाकी आहे ? "

मी मुलांचं एक हस्तलिखित मासिक त्यांच्यासमोर ठेवलं.

साहेबांनी विचारलं— " हे सगळे लेख या मुलांचेच आहेत ? "

" हो साहेब. "

" ह्या एकदोन कविता आहेत. त्या पण ? "

" हो तर ! आत्ता आत्ता माझे काही विद्यार्थी कविता लिहायचा प्रयत्न करायला लागले आहेत. "

" पण त्यांच्या कविता तुम्ही सुधारून देता का नाही ? "

" नाही. अजून तरी मी असं केलं नाही. जशा त्यांनी लिहिल्यात तशाच प्रकाशित केल्यात. "

" आणि मुलं हे सगळं आपणहोऊन लिहितात का कुठून उतरवून आणतात का तुम्ही सांगता ? "

" उतरवून आणायची जरूरच काय ? मी तर त्यांना सांगतो जे वाटेल ते लिहा. जे सुचेल ते लिहा. सगळं लिहिता येतं. तुम्ही जे लिहाल ते आपण प्रकाशित करू. त्यांना सर्वांचे लेख आवडतात आणि मी सगळे प्रकाशितही करतो. "

कदाचित् मुख्याध्यापकांना असं म्हणून मला उघडं पाडायचं असावं. मी अजून गणित भूगोलाचं काही केलं नव्हतं ते त्यांना माहीत होतं. मी म्हटलं, " साहेब, मी भूगोल आणि गणिताचं अजून काही करू शकलेलो नाही पण वर्ष संपायच्यावेळी ते कामपण मी आपल्याला दाखवीन. इतिहासात थोडं काम झालेलं आहे. "

मुख्याध्यापक— " ओ हो हो ! म्हणजे असं म्हणा ना, की अजून मोठे मोठे विषय तर तसेच राहून गेलेत. "

**" उतरवून आणायची जरूरच काय ? मी तर त्यांना सांगतो जे वाटेल ते लिहा. जे सुचेल ते लिहा. सगळं लिहिता येतं. तुम्ही जे लिहाल ते आपण प्रकाशित करू. त्यांना सर्वांचे लेख आवडतात आणि मी सगळे प्रकाशितही करतो. "**

साहेब— " हा अंक खास सहामाही परीक्षेसाठी म्हणून तयार केलाय् ? "

मी— " नाही नाही. गेले तीन महिने दर महिन्याला हे काम होतं आहे. हा अंक सहामाही परीक्षेसाठी दाखवायला ठेवलाय्. पण तो खास परीक्षेसाठी म्हणून नाही तयार केलेला. "

साहेबांनी अगदी खूष होऊन मान हलवली आणि म्हटलं, " फारच सुंदर काम आहे. " माझ्याकडे पाहून म्हणाले, " गुरुजी, तुम्ही एकेक विलक्षणच काम करून दाखवता. सहा महिन्यात कुठून कुठे पोचलात ? "

मुख्याध्यापकांनी हळूच विचारलं— " आता गणित, भूगोल, इतिहासाची परीक्षा कधी होणार आहे ? आम्ही सगळे दुपारी येऊ ना ? "

साहेब— " गुरुजी, ते तर तुमच्या दृष्टीनं राहिलेले आहेत. त्यांच्या दृष्टीनं नाही. तुमच्या मते तर इतिहास, भूगोल, गणित आणि पाढे म्हणजेच सगळा अभ्यास असतो. काय गुरुजी खरं आहे ना ? "

साहेब खुषीत आहेत असं पाहून मुख्याध्यापकांनी उत्तर दिलं, " पण साहेब, आपल्याही दृष्टीनं ते तसंच आहे. आपणसुद्धा याच विषयांचे निकाल आमच्याकडे मागता. "

सगळे एकमेकांशी विनोदानं बोलत उठले. माझ्या वर्गाची सहामाही परीक्षा पूर्ण झाली. जातेवेळी साहेब मला म्हणाले, " तुमचा निकालाचा कागद कुठे आहे ? "

मी म्हटलं, " साहेब, तो मी तयारच नाही केलेला."

साहेब म्हणाले, " ठीक आहे, मग तुमच्या वर्गाला परीक्षेतून मुक्त केलेलं आहे. "

□ □ □

# भाग चौथा

## अखेरचं संमेलन (१)

सहामाही परीक्षा संपली होती. माझ्या शाळेतल्या सहकारी शिक्षकांबरोबर बसून एक दिवस मी गप्पा मारत होतो. तेवढ्यात चंद्रशंकर म्हणाले, " खरंच सांगतो, मला तर आपण एक अजबच व्यक्ती वाटता. आपला प्रयोग यशस्वी झालाय असंच मी मानतो. प्राथमिक शाळेच्या शिकवण्याच्या पद्धतीत इतके चांगले बदल करता येतील यावर आमचा विश्वासच नव्हता. "

**" खरंच सांगतो, मला तर आपण एक अजबच व्यक्ती वाटता. आपला प्रयोग यशस्वी झालाय असंच मी मानतो. प्राथमिक शाळेच्या शिकवण्याच्या पद्धतीत इतके चांगले बदल करता येतील यावर आमचा विश्वासच नव्हता. "**

**आपण आपल्या प्राथमिक शाळेमध्ये याहूनही जास्त काम करू शकतो. एवढं काम करता येईल की सध्याच्या प्राथमिक शिक्षणाचं स्वरूपच बदलून जाईल. कायापालट होईल. पण अडचण अशी आहे की, काम करणारे मिळायला हवेत.**

भद्रशंकर म्हणाले, " अरे बाबांनो, हे इंग्रजी शिकलेले आहेत ना ! इंग्रजी पुस्तकं वाचतात आणि नवे नवे प्रयोग करतात. "

चंपकलाल म्हणाले, " ते तर करतातच. पण सगळे असं नाही करू शकत. यांना पैशाची काही चिंता नाही, निकालाची काळजी नाही. प्रयोग वाया गेला तरी त्यांना थोडीच काही शिक्षा होणार आहे ? "

वेणीलाल म्हणू लागले, " अहो, प्रयोग करायचे कसे ? तेवढी सवडच मिळत नाही. एवढ्या गोष्टींचा विचार करायचा आणि एवढी सगळी तयारी करायची त्याला वेळ आहे कुणाकडे? काय करणार? आपल्याला शिकवण्या कराव्या लागतात. संध्याकाळी रोज मोठ्या साहेबांच्या घरी हजेरी द्यावी लागते, घरी मुलाबाळांचं बघायला लागतं, जातवाल्यांकडे येणंजाणं ठेवावं लागतं. एवढं सगळं केल्यावर आणखी काही करायला लेकाचा वेळ आहे कुठे ? हे बरे एकटा जीव सदाशिव आहेत. त्यांनाच हे करणं जमणार ! "

शेवटी मी म्हटलं, " मित्रहो, आपण आपल्या प्राथमिक शाळेमध्ये याहूनही जास्त काम करू शकतो. एवढं काम करता येईल की सध्याच्या प्राथमिक शिक्षणाचं स्वरुपच बदलून जाईल. कायापालट होईल. पण अडचण अशी आहे की, काम करणारे मिळायला हवेत. आज आपल्याला जगात जे काही दिसतं ते तसं पूर्वी नव्हतं. जग बदलण्याचं काम माणसांनीच केलं ना ? त्यासाठी आवड पाहिजे. दांडगा आत्मविश्वास पाहिजे. आणि अखंड एकनिष्ठा पाहिजे. चांगले प्रयोग करता यायला इंग्रजी आलं पाहिजे असं मुळीच नाही. हे साफ खोटं आहे. एखाद्याला जेव्हा काही करायचं नसेल, तेव्हा अशा सबबी माणसं सांगतात. मनापासून आवड पाहिजे हे खरं. जेव्हा आपला आत्मा एखाद्या गोष्टीसाठी तडफडतो तेव्हाच त्यातून अशी आवड निर्माण होते. आणि चंपकलालजी, प्रयोग करणाऱ्याला

जेवढी त्याच्या परिणामांची काळजी असते तेवढी तर इतर कुणाला असूच शकत नाही. आपण आपला पगार वाढावा म्हणून निकालाची चिंता करता, त्यासाठी प्रयत्न करता. मी प्रयोगासाठी प्रयोग करतो. यामुळे माझा उद्देशही सफल व्हावा आणि शिक्षणक्षेत्रही व्यापक बनावं अशी माझी इच्छा आहे. माझ्या प्रयोगात जर मला अपयश आलं तर माझ्या नंतरचे प्रयोग करणारे निराश होतील. त्यांच्या कामात अडथळे येतील याची मला चिंता असते.

मी म्हटलं, "तुम्ही पगार वाढवून मागा. तुम्हाला मिळेल."

विश्वनाथ म्हणाले, "हो तर! पगारवाढ मिळायच्या ऐवजी हकालपट्टी नक्की होईल."

मी म्हटलं, "जर सगळ्या शिक्षकांनी एकत्र येऊन पगारवाढीची मागणी केली तर किती जणांना नोकरीतून काढतील, बघू या तरी. आणि मी तर म्हणतो, त्यांनी नोकरीतून काढायच्या आधी तुम्ही आपण होऊनच दूर का होत नाही? मला या गोष्टींची पर्वा नसते हेही माझ्या यशाचं एक कारण आहे."

भद्रशंकर म्हणाले, "आणि मग पोटाला काय घालायचं?"

मी म्हटलं, "पोटाला? ज्यानं दात दिले तो चाराही देतो. आपल्यात थोडी हिंमत पाहिजे. धंद्यांना काय तोटा गेलाय? तुमच्यासारखं अर्धपोटी राहण्यापेक्षा मला तर झाडू मारून पोट भरणंही बरं वाटेल. तुमचे पगार म्हणजे काय पगार आहेत?"

विश्वनाथ म्हणाले, "अहो महाशय, एक जागा असली तरी शंभरजण तिच्यावर तुटून पडतात. तुम्हाला काही पत्ता आहे का?"

मी म्हटलं, "अशा तुटून पडणाऱ्यांना आपण विरोध करायला हवा. आपण त्यांना आपला चार्ज दिला तरच ते काम करणार ना? आणि आपण नवीन माणसांना येऊ कशाला द्यायचं? एकवेळ आपण

**आज आपल्याला जगात जे काही दिसतं ते तसं पूर्वी नव्हतं. जग बदलण्याचं काम माणसांनीच केलं ना? त्यासाठी आवड पाहिजे. दांडगा आत्मविश्वास पाहिजे. आणि अखंड एकनिष्ठा पाहिजे. चांगले प्रयोग करता यायला इंग्रजी आलं पाहिजे असं मुळीच नाही.**

**जेव्हा आपला आत्मा एखाद्या गोष्टीसाठी तडफडतो तेव्हाच त्यातून अशी आवड निर्माण होते.**

**शाळेत जर आपण मुलांना चांगल्या प्रकारे शिकवलं तर कोणाला शिकवणीची गरजच कशाला पडेल? आपण नीट शिकवत नाही म्हणून तर मुलांना शिकवण्या लागतात.**

आणि वेणीलालजी, जातवाल्यांशी गप्पा मारत बसायला सवड हवी आहे कुणाला? हे काय काम आहे का? आणि मोठ्या साहेबांच्या घरीपण रोज जायची जरूर काय? तुम्ही चांगलं काम करून दाखवा, ते आपोआप खूष होतील. खुशामत करून खरंच कुणी खूष होतं का? ज्यांना काम करायचं नसतं ते खुशामत करत राहतात. शाळेत जर आपण मुलांना चांगल्या प्रकारे शिकवलं तर कोणाला शिकवणीची गरजच कशाला पडेल? आपण नीट शिकवत नाही म्हणून तर मुलांना शिकवण्या लागतात."

शिवशंकर मध्येच म्हणाले, "पण गुरुजी, ज्यांना पगारच कमी मिळतो त्यांचं काय? तुम्ही मागाल तो पगार तुम्हाला मिळतो आणि आमचा मात्र महिनासुद्धा नीट भागत नाही."

शाळेच्या चारही बाजूला पहारा देत बसू. पण ज्या खड्ड्यात आपण पडलो त्याच खड्ड्यात इतरांना खुशाल पडू द्यायचं? आपण त्यांच्या पाया पडून त्यांना समजवायला हवं की, बाबांनो, दुसरा कुठला धंदा शोधा, या उपासमारीच्या धंद्यात येऊ नका. ह्या लाचारीच्या राज्यात पाऊल टाकू नका. या आयतेपणाच्या जगापासून दूर राहा."

त्यानंतर तासन् तास अनेक प्रकारची चर्चा झाली. आज माझ्या सहकारी शिक्षकांमध्ये नवाच उत्साह संचारला होता. मी म्हटलं, चला, गुलामीची जुनीपानी घट्ट रुजलेली मुळं थोडी तरी सैल झाली!

मी आफ्रिकेला गेलो तेव्हा खरा भूगोल कळला. त्यानंतर मला भूगोलाची दृष्टी आली. आज मला भूगोल आवडतो. तो अतिशय उपयोगी आहे असं वाटतं. पण या विद्यार्थ्यांना हे सगळं आत्तापासून कशाला शिकवायचं? समजावून सांगायचं? या अभ्यासक्रमाप्रमाणे जाऊन चालणार नाही. हे पाठ्यपुस्तक पाहून तर मला हसूच येतं. संचालक साहेबांना भेटावं का? माझ्या पद्धतीनं मुलांमध्ये भूगोलाची आवड आणि दृष्टी निर्माण करण्याची परवानगी त्यांच्याकडे मागावी का?

मी डेप्युटी डायरेक्टर साहेबांकडे गेलो.

> एकवेळ आपण शाळेच्या चारही बाजूला पहारा देत बसू. पण ज्या खड्ड्यात आपण पडलो त्याच खड्ड्यात इतरांना खुशाल पडू द्यायचं? आपण त्यांच्या पाया पडून त्यांना समजवायला हवं की, बाबांनो, दुसरा कुठला धंदा शोधा, या उपासमारीच्या धंद्यात येऊ नका. ह्या लाचारीच्या राज्यात पाऊल टाकू नका. या आयतेपणाच्या जगापासून दूर राहा.
>
> मुलांना नद्यांची, पर्वतांची नावं निष्कारण का पाठ करायला लावायची? मला स्वतःला हे कुठे पाठ आहे? काल स्वतः डेप्युटी डायरेक्टर साहेबही नकाशात ऑस्ट्रेलियाचा रस्ता शोधत होते. लहानपणी पाठ केलेला भूगोल कुणाच्या लक्षात राहतो?

## (२)

आता मी भूगोल शिकवायचा विचार करू लागलो. मी भूगोलाचं पाठ्यपुस्तक पाहिलं आणि निराश झालो. ते बाजूला ठेवलं. अभ्यासक्रम वाचून तर अगदी ठेच लागल्यासारखं मन कळवळलं. मुलांना नद्यांची, पर्वतांची नावं निष्कारण का पाठ करायला लावायची? मला स्वतःला हे कुठे पाठ आहे? काल स्वतः डेप्युटी डायरेक्टर साहेबही नकाशात ऑस्ट्रेलियाचा रस्ता शोधत होते. लहानपणी पाठ केलेला भूगोल कुणाच्या लक्षात राहतो? मी विचार केला, भूगोल असा नाहीच शिकवला तर? मलासुद्धा

साहेबांनी विचारलं, "बोला. कसं काय येणं केलं आज?"

मी म्हटलं, "साहेब अभ्यासक्रमातून भूगोल हा विषय काढून का टाकू नये?"

"छे, छे. असं नाही करता येणार. भूगोल हा फार महत्त्वाचा विषय आहे. इतिहासापेक्षाही आज भूगोल महत्त्वाचा आहे. आपल्या प्रयोगात कोणताही विषय सोडायची कल्पना नाही. तुम्हाला पाहिजे त्या पद्धतीनं शिकवा, पण भूगोल सोपा विषय आहे, चांगल्या प्रकारे शिकवता येतो हे इतर शिक्षकांना सिद्ध करून द्या. माझ्या दृष्टीनं यासाठीच तुमचा प्रयोग महत्त्वाचा आहे."

डायरेक्टर साहेबांनी मोठ्या चलाखपणे माझं तोंड बंद केलं. तरी मी म्हटलंच, "साहेब, हे पाठ्यपुस्तक आणि हा अभ्यासक्रम मात्र मी मानणार नाही. मी माझ्या पद्धतीनं भूगोल शिकवीन. आपली त्यामुळे निराशा होणार नाही अशी मला आशा आहे."

साहेब म्हणाले, "माझी पण तीच इच्छा आहे."

थोड्या वेळानं त्यांनी एक दुसरा प्रश्न विचारला, "लक्ष्मीशंकर, तुमचं काय मत आहे सांगा. ह्या परीक्षांबद्दल तुम्ही काय विचार केला आहे? नवीन शिक्षणाचे पुरस्कर्ते तर परीक्षेला कसून विरोध करतात आणि परीक्षेचे खरोखरच फार भयंकर परिणाम होतात. पण आम्हाला शिक्षण खातं चालवायचं आहे. परीक्षा बंद कशा करणार? निकाल तर लावलेच पाहिजेत. उद्या परीक्षा बंद केल्या तर शिक्षक मन लावून शिकवणंच बंद करतील अशी शक्यता फार आहे. जरी प्रामाणिक शिक्षक शिकवत राहिले तरी त्यांना शिकवता येतं आहे की नाही, हे परीक्षा नसल्या तर आम्हाला कसं कळणार? आणि शिक्षकांचं एकवेळ सोडा. पण मुलांनी शिकण्यात काही प्रगती केलीय की नाही हे शोधून काढायचा काही मार्ग तर हवा? या कठीण प्रश्नाला तुमच्याकडे काही उत्तर आहे का?"

मी म्हटलं, "साहेब, तुमचा प्रश्न कठीण आहे खरा. जोवर वाटेल तो विद्यार्थी शिकतो आहे आणि वाटेल तो शिक्षक शिकवतो आहे तोवर परीक्षेची गरज भासेलच. जेव्हा विद्यार्थी अंतःकरणाच्या स्फूर्तीनं शिकायला येईल आणि त्याला शिकवायला कुशल आणि कलावंत शिक्षक समोर येईल तेव्हाच परीक्षा बंद करता येतील. पण सध्याच्या या सगळ्या उपऱ्या पद्धतीत परीक्षेला महत्त्वाचं स्थान आहे."

डायरेक्टर साहेब म्हणाले, "गुरुजी, मला यात काही सुधारणा करायची इच्छा आहे."

मी म्हटलं, "आज आपण केवळ सहामाही आणि वार्षिक परीक्षा घेता. त्याऐवजी मासिक परीक्षा घेणं सुरू करा. जर मुलांना परीक्षेच्या कसोटीवर घासायचंच असेल, तर परीक्षेशी त्यांचा जेवढा जास्त संबंध येईल तेवढं चांगलं. वारंवार परीक्षा घेऊन त्यांचा परीक्षेशी परिचय वाढला तर त्यांचा त्रास खूप कमी होईल. दुसरं असं की, परीक्षा हुषार विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी घेऊ नये. कच्च्या आणि मागे पडलेल्या मुलांना जागं करायला, ती कुठे कमी पडतात ते शोधायला परीक्षा घ्यावी. परीक्षेकडे पाहायच्या दृष्टिकोनामधला हा महत्त्वाचा बदल आहे. तिसरं असं की, ज्या विद्यार्थ्यांची तयारी चांगली असेल त्यांची परीक्षा घेऊ नये. मुलांनी आपण होऊन आपली तयारी मोजून पाहायला परीक्षा द्यावी. आणि आपण त्यांना असं समजावून द्यावं की, आपण कुठे कमी पडतो ते आपण शोधून काढलं नाही तर आपल्याला सुधारण्याची संधीही मिळणार नाही. ज्या विषयांची परीक्षा घेणं शक्य आहे त्याच विषयांची परीक्षा घ्यावी. बाकीचे विषय परीक्षेतून सोडून द्यावेत आणि परीक्षेच्या वेळी पाठ्यपुस्तकात पाहून उत्तर लिहिण्याचं स्वातंत्र्यही असावं. आम्ही मुलांना सांगावं की, जे

जेव्हा विद्यार्थी अंतःकरणाच्या स्फूर्तीनं शिकायला येईल आणि त्याला शिकवायला कुशल आणि कलावंत शिक्षक समोर येईल तेव्हाच परीक्षा बंद करता येतील.

जर मुलांना परीक्षेच्या कसोटीवर घासायचंच असेल, तर परीक्षेशी त्यांचा जेवढा जास्त संबंध येईल तेवढं चांगलं. वारंवार परीक्षा घेऊन त्यांचा परीक्षेशी परिचय वाढला तर त्यांचा त्रास खूप कमी होईल.

त्यांच्या लक्षात नसेल ते त्यांनी पुस्तकात पाहावं आणि नंतर उत्तरं लिहावीत. जे मुलांना आपल्या आपण सांगता येणार नाही ते त्यांनी पुस्तकात बघून समजावून सांगावं. उत्तर देताना विद्यार्थी पाठ्यपुस्तकाचा कसा उपयोग करतात यातच त्यांची परीक्षा आहे. याशिवाय आपण मुलांचे तीन विभाग करावेत. वरच्या वर्गात जाण्याजोगे विद्यार्थी, वरच्या वर्गात न जाण्याजोगे विद्यार्थी आणि ज्यांची तयारी करून घेतली तर पुढे जातील असे कच्चे विद्यार्थी. पहिला नंबर, दुसरा नंबर ही पद्धतच बंद केली पाहिजे."

डायरेक्टर साहेब म्हणाले, "ही आणखी एक अजब गोष्ट तुम्ही सुचवली."

मी म्हटलं, "खरं आहे. अजब आहे खरी गोष्ट."

परीक्षेच्या संदर्भात मला आणखीही काही सांगायचं होतं पण साहेबांच्या जेवणाची वेळ झाली होती आणि ते उठून उभे राहिले होते. शेवटी ते हसत हसत म्हणाले, "ठीक आहे. याबद्दल आपण पुन्हा एकदा भेटून आणखी विचार करू या. आता एकदा सगळ्या शिक्षकांसमोर तुम्ही यावर एक भाषण द्या."

**परीक्षा हुषार विद्यार्थ्यांची प्रगती मोजण्यासाठी घेऊ नये. कच्च्या आणि मागे पडलेल्या मुलांना जागं करायला, ती कुठे कमी पडतात ते शोधायला परीक्षा घ्यावी. परीक्षेकडे पाहायच्या दृष्टिकोनामधला हा महत्त्वाचा बदल आहे.**

**मुलांनी आपण होऊन आपली तयारी मोजून पाहायला परीक्षा द्यावी. आणि आपण त्यांना असं समजावून द्यावं की, आपण कुठे कमी पडतो ते आपण शोधून काढलं नाही तर आपल्याला सुधारण्याची संधीही मिळणार नाही.**

**परीक्षेच्या वेळी पाठ्यपुस्तकात पाहून उत्तर लिहिण्याचं स्वातंत्र्यही असावं. आम्ही मुलांना सांगावं की, जे त्यांच्या लक्षात नसेल ते त्यांनी पुस्तकात पाहावं आणि नंतर उत्तरं लिहावीत. जे मुलांना आपल्या आपण सांगता येणार नाही ते त्यांनी पुस्तकात बघून समजावून सांगावं. उत्तर देताना विद्यार्थी पाठ्यपुस्तकाचा कसा उपयोग करतात यातच त्यांची परीक्षा आहे.**

डायरेक्टर साहेब मध्येच म्हणाले, "गुरुजी, पुढच्या वर्षी मला तुम्हालाच माझे सहाय्यक बनवायला हवं."

मी हसलो आणि पुढे सांगू लागलो, "आणि परीक्षा त्या त्या वर्गाच्या शिक्षकांनीच घ्यायला हवी. त्यांनाच आपल्या विद्यार्थ्यांची तयारी समजू शकते. एखाद्याची तयारी का नाही याची कारणं पण त्यांना माहीत असतात आणि मूल वरच्या वर्गाचा अभ्यास पेलू शकेल का नाही हेही तेच सांगू शकतात. त्यांना एक मदतनीस लागेल, मुलांची परीक्षा घेण्यासाठी, नाही,तर परीक्षक बरोबर परीक्षा घेऊ शकतो आहे की नाही याची परीक्षा करायला."

मी त्यांना नमस्कार केला आणि मनात म्हटलं, नुसतं भाषण ऐकून सुधारणारे शिक्षक आहेत कुठे? परीक्षेच्या विळख्यातून त्यांना सोडवणं फार कठीण आहे. तरीसुद्धा संचालक साहेबांचा हुकूम निघाला तरच हे होण्याची शक्यता आहे. पण ते बिचारे तर...

## (३)

चौथीच्या मुलांची भूगोलाच्या नावावर कुठल्यातरी भलत्याच विषयाशी ओळख झाली होती. मी नकाशे मागवले आणि काठेवाड, गुजराथ आणि मुंबई इलाख्याचे नकाशे भिंतीवर टांगले. मुलांना

आश्चर्य वाटलं. आजवर मी त्यांना भूगोल शिकवलाच नव्हता. त्यांनी लगेच आपल्या वहीतून कागद फाडले आणि त्याच्या सुरनळ्या करून आपल्या बोटांवर चढवायला लागले. मी बघतच राहिलो.

मी विचारलं, " तुम्ही या नळ्या कशासाठी बनवल्यात ? "

मुलांनी म्हटलं, " गुरुजी, नकाशा वाचायला. "

मला नवल वाटलं. नकाशा कुठे वाचतात का ? भूगोलाच्या शिक्षणानं तर घोटाळाच केलाय ! काही वेळ गंमत म्हणून मी मुलांना म्हटलं, " बरं. बरं. भावनगर तर दाखवा. "

एका मुलानं मुंबईच्या नकाशावर चहूबाजूला नजर फिरवली. मुंबई वाचलं. अहमदाबाद वाचलं. हैद्राबाद वाचलं. खाली येऊन पुणे वाचलं. पुन्हा इकडे येऊन पोरबंदर वाचलं. मागे उभ्या असलेल्या मुलांनी भावनगर शोधून ठेवलं होतं. त्यांच्या नळ्या भावनगर दाखवायला अधीर झाल्या होत्या. शेवटी एकानं विचारण्याआधीच भावनगर दाखवून टाकलंसुद्धा.

मी विचारलं, " भावनगर कोणत्या दिशेला आहे ? " मुलांनी वर, खाली, डावीकडे, उजवीकडे पाहून मनात काही म्हणून पाहिलं आणि म्हटलं, " गुरुजी, उत्तरेला. "

दुसरा मुलगा म्हणाला, " उत्तर तर वरच्या बाजूला असते. ही पूर्व आहे. "

मी हसलो. म्हणालो, " वरती तर आकाश आहे. उत्तर कुठे आहे ? "

मुलं म्हणाली, " नाही. नाही. वरती उत्तर आणि खाली दक्षिण. "

दुसरा मुलगा म्हणाला, " गुरुजी, उत्तर दक्षिण लांबीत आणि पूर्व पश्चिम रुंदीत. "

तिसरा म्हणाला, " सूर्य उगवतो ना, ती पूर्व. "

मी म्हटलं, " दाखव बरं या नकाशात सूर्य कुठे आहे ? "

सगळे विचारात पडले.

मी विचारलं, " शत्रुञ्जय नदी दाखवा. "

मुलांनी नळीनं नदी दाखवली.

मी विचारलं, " ही कुणाला जाऊन मिळते ? "

नकाशात पाहून मुलांनी उत्तर दिलं— " खंबातच्या खाडीला. "

मी विचारलं— " इकडे अरबी समुद्रात का नाही मिळत ? "

एक मुलगा म्हणाला,— " तिची मर्जी ! तिला खंबातच्या खाडीलाच मिळायचं असेल ! "

मी विचारलं— " ही नदी खाली का वाहत जाते ? "

मुलगा म्हणाला— " तशीच तर वाहणार. पाहाना. दक्षिण इकडे खालीच आहे ना ? "

मला आश्चर्य वाटलं. गेल्या वर्षी शिकलेला भूगोल मुलं विसरली नव्हती. यशस्वी पाठांतराचं हे एक उदाहरण होतं. या वर्षीही मला असंच शिकवता आलं असतं. पण मग ते काय भूगोलाचं शिक्षण झालं असतं का ? मी मुलांना म्हटलं— " नकाशे गुंडाळून ठेवा. एक महिन्यानंतर आपण भूगोल सुरू करूया. आता थोडे दिवस तुम्ही चित्रं काढा. "

मुलं माझ्याकडे बघतच बसली. चित्रांचा विषय शाळेत नवीनच होता. अभ्यासक्रमात त्याला काहीच स्थान नव्हतं. शाळेत मुलांची सहनशीलता वाढवणाऱ्या एकाही विषयाला स्थान नव्हतं. पण मला असं काहीतरी सुरू करायचं होतं.

शाळेत मुलांची सहनशीलता वाढवणाऱ्या एकाही विषयाला स्थान नव्हतं. पण मला असं काहीतरी सुरू करायचं होतं.

दुसऱ्या दिवशी मी मुलांना म्हटलं, " आता चित्रं काढा. तुम्हाला हवं ते चित्र काढा. जसं काढायचं असेल तसं काढा. जसं येईल तसं काढा. बघून काढा. एखाद्या वस्तूवरून काढा. आठवून काढा. जनावर काढा. पक्षी काढा. फुलपाखरू काढा. झाड काढा. फूल काढा. आकाश काढा. घर काढा. वस्तू काढा. नकाशा काढा. जे तुम्हाला हवं ते काढा. "

क्रमानुसार त्यात चित्रं काढायला सांगितली. चित्र काढण्यासाठी मी लिंबाच्या फांद्या, पिंपळाची पानं, तुळशीच्या मंजिऱ्या आणि सदाफुलीची फुलं ठेवली. व्यापाऱ्यांच्या दुकानातून छापलेल्या वेगवेगळ्या किनारींचे नमुने आणून ठेवले. मित्रांच्या घरातून दोन चार चांगली चित्रं आणून वर्गात टांगली. नेहमीच्या उपयोगातल्या वस्तू म्हणजे दौत, टाक, डबी, पेटी इत्यादी रंगवून सजवून खास प्रकारे ठेवल्या. एका फळ्यावर मोठ्या मोठ्या अक्षरात लिहिलं— " चित्रं काढा ! चित्रं काढा ! चित्रं काढा ! आपली आपण काढा. तुम्हाला चित्रं काढता येतात, रोज रोज काढली की चित्रं चांगली चांगली होतात. चित्रं काढा. "

**" चित्रं काढा ! चित्रं काढा ! चित्रं काढा ! आपली आपण काढा. तुम्हाला चित्रं काढता येतात. रोज रोज काढली की चित्रं चांगली चांगली होतात. चित्रं काढा. "**

लगेच पाटीवर पेन्सिलींनी चित्रं तयार व्हायला लागली. वेडीवाकडी, अनेक प्रकारची चित्रं उमटू लागली. सकाळचा सगळा वेळ चित्रांमध्ये गेला. घंटा वाजली तेव्हा सर्वजण जागे झाले. शाळेची वेळ संपत होती.

मी मुलांना म्हटलं— " ज्यांचे आईवडील पेन्सिल आणि कागद देतील त्यांनी वहीवर चित्रं काढा. बाकी सगळ्यांनी पाटीवर. "

दोन चार दिवस असेच गेले. तेवढ्या काळात अनेक चित्रं तयार झाली. चित्रं अशी होती की चित्रकारांनी डोळे मिटूनही ती पाहण्याचं धारिष्ट्य केलं नसतं. तरीसुद्धा ती चित्रं मुलांच्या आपापल्या कल्पनातून, आपापल्या कौशल्यातून तयार झाली होती.

मी विचार केला— या चित्रांची नोंद ठेवली पाहिजे आणि संग्रहपण केला पाहिजे. थोडी वाकडी वाट करून साहेबांकडे गेलो. ऑफिसातून कोरे रद्दी कागद काढून घेतले आणि साहेबांकडून दोन डझन रंगीत पेन्सिली घेतल्या. साहेब हसत हसत म्हणाले, " पुन्हा अभ्यास सगळा गुंडाळून ठेवून तुम्ही चित्रांचा हा नवाच विषय काढलेला दिसतोयू. "

प्रत्येक विद्यार्थ्याला चित्रांच्या विषयाप्रमाणे एकेक वही तयार करायला सांगितली. विषयाच्या

मुलं चित्रांच्या इतकी मागे लागली की विचारता सोय नाही. काही मुलांनी तर छापलेली चित्रं आणि वेलबुट्ट्या जशाच्या तशा काढल्या. काहींनी फुलांचे खऱ्यासारखे रंग आपल्या चित्रात भरले. काही मुलं चित्र काढतच नव्हती आणि काही बसल्या बसल्या इतर मुलं कशी चित्रं काढतायत ते पाहत होती.

पंधरा दिवसांनंतर मी हायस्कूलच्या एका चित्रकला शिक्षकांना घेऊन आलो. मी त्यांना म्हटलं— " आपण मुलांना चित्रं काढायला शिकवू नका. फळ्यावर आपल्याला वाटेल ते चित्र काढायला लागा. पण जरा सावकाश आणि छान चित्र काढा. झाड बघून झाड काढा. खुर्ची बघून खुर्ची काढा. " चित्रकला शिक्षकांनी असंच केलं आणि मुलं रंगून जाऊन पाहत राहिली. दुसऱ्या दिवशी चित्र काढताना आणखीच मजा आली. जणू काही मुलांनी चित्र काढण्याचे नियम खास प्रकारे समजावून घेतले होते. त्यानंतर मी त्यांच्या चित्रांखाली तारीख आणि नाव

लिहायला सुरुवात केली.

काही दिवसानंतर पुन्हा एकदा त्या चित्रकारांना बोलावलं आणि त्यांना विनंती केली की, रेखाचित्रांमध्ये किंवा वस्तुचित्रांमध्ये रंग कसा भरायचा असतो ते मुलांना समजावून द्या. त्यांनी लागोपाठ पाच चित्रांमध्ये पेन्सिलींनी सफाईदारपणे रंग भरून दाखवले. मुलांना रंग द्यायची नवी युक्ती समजली.

काही दिवसांनी मी माझ्या एका सर्व्हेअर मित्राला बोलावलं आणि त्याला म्हटलं शाळेची माप घेऊन शाळेचा नकाशा तयार करून दाखव. मी आणि माझा मित्र शाळेची मापं घेत होतो आणि मुलं आमच्या बरोबर हिंडत होती. मुलांच्या डोळ्यादेखतच आम्ही त्यांना शाळेचा नकाशा काढून दाखवला. दोन चार दिवस मी मुलांना सर्व्हेअरच्या ऑफिसमध्ये पाठवलं. तिथे त्यांना सर्व्हेअर लोक रस्ते, गाव, पूल यांचे नकाशे कसे काढतात ते समजावून दिलं. एकदा दोन मुलांना रस्त्याचं काम करणाऱ्या लोकांबरोबर गावाबाहेर घेऊन गेलो आणि त्यांना प्रत्यक्ष रस्त्याचं काम दाखवलं. याप्रमाणे आता मुलं शाळेचा, खोलीचा, आपल्या घराचा, गल्लीचा, कधीकधी विहीर आणि तलावाचा पण नकाशा काढायला लागली. त्यांची चित्रकला वाढावी म्हणून मी कधीकधी त्यांना निसर्ग बघायला फिरायला घेऊन जायचो. डोळ्यांनी कोणत्याही वस्तूंचे निरीक्षण करता यावं म्हणून मी त्यांना अनेक प्रकारचे खेळ शिकवले. एखादं झाड पाहून त्याचं खोड, फांद्या यांचं, पाहून किंवा डोळे मिटून, कागदावर चित्र काढायचं, सूर्योदयाचे रंग पाहून लक्षात ठेवायचे, संध्याकाळच्या बदलत्या रंगाच्या छटा पाहणं दुरून झाड कसं दिसतं आणि जवळून कसं दिसतं ते पाहणं, झाड, पदार्थ, पर्वत, माणूस, त्यांच्या सावल्यांचे प्रकार लक्षपूर्वक पाहणं इत्यादी इत्यादी. अशा प्रकारे काही दिवस माझ्या वर्गात चित्रकलेचं काम झालं.

डोळ्यांनी कोणत्याही वस्तूचं निरीक्षण करता यावं म्हणून मी त्यांना अनेक प्रकारचे खेळ शिकवले. एखादं झाड पाहून त्याचं खोड, फांद्या यांचं,पाहून किंवा डोळे मिटून,कागदावर चित्र काढायचं, सूर्योदयाचे रंग पाहून लक्षात ठेवायचे, संध्याकाळच्या बदलत्या रंगाच्या छटा पाहणं, दुरून झाड कसं दिसतं आणि जवळून कसं दिसतं ते पाहणं, झाड, पदार्थ, पर्वत, माणूस, त्यांच्या सावल्यांचे प्रकार लक्षपूर्वक पाहणं इत्यादी इत्यादी.

## (४)

एक दिवस हायस्कूलमधून मी एक दुर्बिण घेऊन आलो. लांबच्या गोष्टी जवळ कशा दिसतात ते मी मुलांना त्यातून दाखवलं. त्यांना फार आश्चर्य वाटलं. दिवसभर ती आळीपाळीनं दुर्बिण डोळ्याला लावून पाहातच बसली. रात्री मी ग्रह आणि तारे पाहायचा एक टेलीस्कोप घेऊन आलो. माझे मित्र म्हणायला लागले, "बाबा रे, तू फारच उद्योगी आहेस."

माझे सहकारी शिक्षक तर अलीकडे अशा सगळ्या कार्यक्रमांत माझ्याबरोबरच असायचे. आता माझी निंदा करायचं सोडून ते माझ्याकडून काही शिकायला उत्सुक झाले होते. डायरेक्टर साहेबांनी त्यांना आठवड्यातून एक तास माझ्या वर्गात येऊन मी कसा शिकवतो ते पाहायची परवानगी दिली होती.

रात्री मी मुलांना चंद्र आणि तारे दाखवले. बघितल्याबरोबर मुलं 'अहाहाहा' म्हणायला लागली.

चंद्र दाखवता मी सांगू लागलो "पाहिलंत का, चंद्रावर तो ससा आणि हरीण दिसतं ते म्हणजे चंद्रावरचे मोठमोठे पर्वत आणि दऱ्या आहेत. तिथे इतकी थंडी असते की माणूस जिवंतच राहू शकत नाही." मुलं माझ्या तोंडाकडे पाहातच राहिली.

मी म्हटलं, "आपण ज्या पृथ्वीवर राहतो ती पृथ्वी आणि चंद्र बहीण-भाऊ आहेत आणि सूर्य म्हणजे त्यांचा पिता."

मुलं आश्चर्यचकित होऊन माझ्याकडे पाहू लागली.

एकानं विचारलं- "ही गोष्ट कुठल्या पुस्तकात लिहिली आहे?"

मी म्हटलं- "ही गोष्ट नाही. खरं आहे."

मुलं म्हणाली- "असं असूच शकणार नाही."

मी म्हटलं- "अरे बाबांनो, असंच आहे."

आणि या गप्पांमध्येच मी सांगायला सुरुवात केली की, सूर्यापासून पृथ्वी कशी निर्माण झाली. नंतर ह्या गप्पा इतक्या रंगल्या की त्यात अनेक दिवस गेले. त्यातच मी त्यांना सांगितलं की, पृथ्वीचा पृष्ठभाग थंड कसा झाला, दऱ्या, पर्वत, खड्डे, उंचवटे कसे तयार झाले. सरोवर आणि नद्या कश्या बनल्या. शेवाळ, पाण्यातले प्राणी, मासे, बेडूक, इतर प्राणी, जंगली माणसं आणि त्यातून हळूहळू आजचा माणूस कसा तयार झाला. ह्या सगळ्या गोष्टी फार अद्‌भुत होत्या. मुलं अगदी मन लावून एकाग्रतेनं सगळं ऐकत होती. आमचे मुख्याध्यापक सातवीतल्या मुलांनाही हे सगळं ऐकण्यासाठी पाठवायला लागले.

एक दिवस मी पृथ्वीगोल घेऊन आलो. आणि म्हटलं- "हे बघा, मी आत्तापर्यंत तुम्हाला समजावून सांगितलं की ह्या साऱ्या गोष्टी पृथ्वीवर कशा तयार झाल्या आहेत."

मी मुलांना समजावून सांगितलं की, पाणी आणि जमीन कुठे आहे, काळे आणि गोरे लोक कुठे राहतात. पिवळे आणि लाल लोक कुठे राहतात. बुटके आणि उंच लोक कुठे राहतात. त्यानंतर मी पृथ्वीचे स्वाभाविक भाग आणि त्यांची नावं सांगितली. मग सांगितलं की आपण आशिया खंडात राहतो. आशियामध्ये हा जो दिसतो आहे तो भारत आहे. भारतात हा काठी लोकांचा प्रदेश काठेवाड आहे. मग सांगितलं की आपण इथे भावनगरमध्ये राहतो.

मी मुलांना म्हटलं- "हा पृथ्वीगोल घ्या आणि आता त्या पेटीतून नकाशे काढा. मग हे शोधून काढा की ह्या पृथ्वीगोलावर हे नकाशे कुठे दिसतात."

मी मुलांना रोज काही ना काही नवीन पाहायला सांगू लागलो. मी म्हटलं, "तुम्ही आजवर जी जी गावं, शहरं पाहिली असतील, ती शोधून काढा. तिथे कसे जाता येतं ते पण शोधून काढा. वाटेत कोणत्या नद्या लागतात, कोणती गावं लागतात ते पण बघा."

ही एक पद्धत झाली. दुसरीकडे मी आफ्रिका पाहून आलो होतो. म्हणून आफ्रिकेचा नकाशा समोर ठेवून मी त्यांना आफ्रिकेच्या गोष्टी सांगायला लागलो. मी त्यांना विक्टोरिया, नियांजा, टांगानिका, जांबसी आणि नाइल, आफ्रिकेचे सिंह आणि हत्ती, तिथले लोक यांच्या गोष्टी सांगितल्या. मग एक दिवस मी म्हटलं, "हे आपल्या आसपास ते कोळी, कुंभार, लोहार, चांभार वगैरे लोक कसे राहतात ते तर बघून या." आणि हे सांगून ह्या दृष्टीनं मी त्यांना एक दोनदा गावात, धरणावर, नदी किनाऱ्यावर आणि डोंगरावर घेऊन गेलो आणि भूतलाच्या अभ्यासाची गोडी निर्माण केली.

त्यानंतर मी त्यांच्यासाठी भूगोलावरचं एक वाचनालय तयार करायचं ठरवलं. पण प्रवास-वर्णनांसारखी सुंदर पुस्तकं आमच्या भाषेत मिळाली नाहीत. जी मिळाली ती त्यांना देऊन म्हटलं,

" पुस्तक वाचता वाचता नकाशा बघत जा. प्रवासी कुठून कुठे जातो बघा आणि त्याच्याबरोबर हिंडा. "

मुलांना प्रवासवर्णनं वाचायला आवडतात. दोघा मुलांना 'काठेवाड–सर्व–संग्रह' वाचताना फार आनंद झाला. नकाशावरून एखादं गाव शोधून मुलं 'सर्व–संग्रह' मधून त्याची माहिती वाचू लागली. अशा प्रकारे काही ओळखीच्या आणि काही अनोळखी गावांबद्दल त्यांनी माहिती मिळवली.

श्री. रविशंकर रावल यांच्या चित्रांनी त्यांना अहमदाबादची सुरेख ओळख करून दिली. प्रत्येक महत्त्वाच्या गावाची अशी चित्रपूर्ण माहिती मिळायला लागली तर काय बहार होईल! एक दिवस रविशंकर आले. त्यांच्यापाशी मद्रासच्या दृश्याची एक फिल्म होती. मी मुलांना ती फिल्म दाखवली. एकीकडे चित्रपटानं मुलांचं नुकसान होतं, पण दुसरीकडे तो शिक्षणाचं एक महत्त्वाचं साधन म्हणून उपयोगी पडतो. दूरदूरची दृश्य जशीच्या तशी पाहिली की मुलांची भूगोलाविषयीची आवड वाढत जाते. एकदा "सीझर्स सिगरेट"ची काही पानं माझ्या हाती लागली. त्यांच्यात देशोदेशीच्या माणसांची चित्रं होती. ती चित्रं पण मी मुलांना दाखवली. मला काही त्यांनाा सगळ्या जगाचं ज्ञान द्यायचं नव्हतं, यातलं काही त्यांनी खास लक्षात ठेवावं असाही हेतू नव्हता. जग खूप मोठं आहे. त्यात खूप गोष्टी बघण्याजोग्या आहेत आणि ते पाहायची ही ही साधन आहेत एवढंच मला त्यांच्या मनावर बिंबवायचं होतं. मला एवढं पुरेसं होतं.

मला काही त्यांना सगळ्या जगाचं ज्ञान द्यायचं नव्हतं, यातलं काही त्यांनी खास लक्षात ठेवावं असाही हेतू नव्हता. जग खूप मोठं आहे, त्यात खूप गोष्टी बघण्याजोग्या आहेत. समजून घेण्याजोग्या आहेत आणि ते पाहायची ही ही साधनं आहेत. एवढंच मला त्यांच्या मनावर बिंबवायचं होतं. मला एवढं पुरेसं होतं.

मी एक दुसरा खेळपण काढला होता. त्याचं नाव होतं, " चला, आपण प्रवासाला जाऊ या. " मुलं भावनगरहून अहमदाबाद, द्वारिका, मुंबई, हिमालय, विलायत सगळीकडे जायला निघायची. मग कसं निघायचं, कोणत्या गाड्यांमध्ये बसायचं, कुठे गाड्या बदलायच्या, कोणती ठिकाणं पाहायची, तिथे काय काय पाहायचं, किती दिवसात प्रवास पूर्ण होईल, कोणाकोणाला भेटायचं, काय काय खरेदी करायची, सगळा विचार मुलं करायची. किती खर्च येईल याचा अंदाज काढायची आणि शहरांची 'गाइडस्' पाहून प्रवासातली पाहण्याजोगी ठिकाणं लिहून घ्यायची आणि भूगोलातली प्रसिद्धी वाचून काय काय खरेदी करायची ते ठरवत होती. खरंच! प्रवासाला निघाल्यासारखी मुलं या सगळ्या गोष्टींचा अभ्यास करत होती. हा अभ्यास मी भूगोल समजून द्यायच्या पद्धतीचा एक नमुना म्हणून मी करून घेत होतो. बाकीचं सगळं मुलांवर सोपवत होतो. कधी मुलं अमूक एक काडेपेटी कुठून आली त्याचा नकाशावर पत्ता लावायची. कधी इथला कापूस विलायतेत जातो तो कोणत्या मार्गानं जात असेल ते शोधायला कल्पनेत कापसाच्या गाठीवर बसून निघायची. कधी बाजारात जायची आणि एका दुकानात कोणकोणती गावं आणि देश एकत्र आले आहेत ते शोधून काढायची. कधी नद्यांची नावं, कधी पर्वतांची, कधी शहरांची नावं घेऊन भौगोलिक भेंड्या खेळायची. चित्रकलेत जशी मुलं प्रेमानं झाडाचं चित्र काढायची, तसाच वेगवेगळ्या देशाचे नकाशे काढण्यात त्यांना आनंद

व्हायचा. काढलेल्या नकाशात मग मुलं पाहिलेल्या, वाचलेल्या, ऐकलेल्या गावांची, पर्वतांची ठिकाणं दाखवायची आणि भूगोल वाचून आणखी नवी गावं कुठे आहेत ते शोधून काढायची. अशा प्रकारे आमच्या वर्गात भूगोलाचा अभ्यास चालायचा.

माझ्या सहकारी शिक्षकांनी एकदा मला म्हटलं, " गुरुजी, हे काम म्हणजे तुम्हालाच जमणार. आम्हाला एवढ्या सगळ्या गोष्टी माहीतही नसतात. आम्हाला अशाप्रकारे भूगोलाची चर्चा पण करायला जमत नाही. " मी म्हटलं, " मित्रांनो, सगळं काही येऊ शकतं, थोडे कष्ट करायला पाहिजेत आणि त्यासाठी आपल्यात उत्साह असला पाहिजे. "

आहे. पण हे ज्ञान नकली आणि यांत्रिक आहे. मी विचार करू लागलो, यावर काय उपाय असेल ? मला तर काही उलगडेनासंच झालं. एक तर गणित हा माझा फारसा आवडता विषय नव्हता. दुसरं असं की तो शिकवण्याच्या पद्धतीतले दोष मला समजायचे, पण ते दूर कसे करायचे ते मी शोधलं नव्हतं. अशा परिस्थितीत काय करावं हे मला सुचत नव्हतं. डेप्युटी डायरेक्टर साहेबांकडे मी गेलो आणि त्यांना सरळच म्हटलं, " साहेब, गणिताच्या बाबतीत मी नवं काही करून दाखवू शकणार नाही. अर्थात मुलांना व्यवस्थित समजावून देईन आणि अभ्यासक्रम पुरा करीन. "

> " मित्रांनो, सगळं काही येऊ शकतं थोडे कष्ट करायला पाहिजेत आणि त्यासाठी आपल्यात उत्साह असला पाहिजे. "

## (५)

वार्षिक परीक्षा जवळ येत होती. मी माझ्या कामाचा आढावा घ्यायला बसलो. बसल्या बसल्या मी गणिताचा विचार करू लागलो. आजवर मी गणिताला हातच लावला नाही, असं नव्हतं. पण त्याची चर्चा करण्याची इच्छा मात्र आज झाली. गणिताची परीक्षा घेण्यासाठी मी जेव्हा मुलांना उदाहरण मालिकेतले काही प्रश्न सोडवायला दिले तेव्हा सर्वांनी ते बिनचूक सोडवले. आधी मला वाटलं की ही सगळी मुलं यात तयार आहे आणि एक प्रकारे ते बरंच होतं की ज्या विषयात मी फारसं काही नवीन करून दाखवू शकत नव्हतो तो विषय मुलांना बऱ्यापैकी येत होता. पण जेव्हा मी हळूहळू गणिताच्या प्रश्नाच्या मुळाशी असलेल्या कारणांकडे वळलो. रीतीचं कारण मी विचारलं तेव्हा मला अंधार दिसला. मला असं दिसलं की, मुलांना बेरीज, गुणाकार, बाकी इत्यादी माहीत

डायरेक्टर साहेब म्हणाले, " असं का बरं ? गणित शिकवण्याच्या पद्धतीत काही सुधारणा नाही का करता येणार ? "

मी म्हटलं, " करता येईल तर ? पण ती सुधारणा मुळातच व्हायला हवी. मुलांना आपण जेव्हा लहानपणी मोजायला शिकवतो तेव्हाच योग्य पद्धतीनं ते शिकवायला हवं. गणित हा विषयच असा आहे की एकदा त्यायला तर्क बुद्धिवर नेमका ठसला नाही तर तो कायमचा कच्चा राहतो. "

डायरेक्टर साहेब म्हणाले, " पण तुम्ही त्यांना सुरुवातीपासून गणित का नाही शिकवत ? "

मी म्हटलं, " त्याला वेळ कुठे आहे ? आणि वेळ असला तरी ज्या मुलांना यंत्रासारखं काम करण्याची सवय लागलीय, गणितात जी असं का ? असा प्रश्न विचारीतच नाहीत. नुसती आकडेमोड करतात, त्यांना वळण लावणं फार कठीण आहे. "

डायरेक्टर साहेब म्हणाले, " मग या मुलांचं

गणित. . . "

मी म्हटलं, "ते मी अगदी चांगल्या प्रकारे समजावून देईन. पण मला आपल्याला एवढंच सांगायचं आहे की या विषयात जे प्रयोग करण्याची शक्यता आहे ते मला करणं जमणार नाही. "

डायरेक्टर साहेबांनी विचारलं, "समजा, तुम्हाला पहिलीचा वर्ग दिला तर तुम्ही त्याच्यावर गणिताचे प्रयोग कराल की नाही ? "

मी म्हटलं, "गणिताच्या प्रयोगांना एक, दोन मोजायला शिकवतानाच मी सुरुवात करीन असं मला वाटतं. तेव्हाच मला खात्रीनं म्हणता येईल की, ही बघा, ही रीत चांगली आहे. माझ्या शिक्षक मित्रांना गणित शिकवताना कोणत्या ना कोणत्या पद्धतींनी ते शिकवायला आवडतं हे मला ठाऊक आहे. जर पुढच्या वर्षी मला प्रयोग करायला मिळालं तर मी आणि चंद्रशंकर या विषयात अवश्य प्रयोग करू. मला वाटतं, मॉन्टेसरी गणित पद्धत चांगली आहे. ती स्वाभाविक आहे. मी ती वाचली आहे आणि त्यावर थोडा विचार पण केलेला आहे. पण अजून अनुभव नाही घेतलेला. "

त्यांनी मला विचारलं, "पुढल्या वर्षी तुम्ही इथे डेप्युटीची, अध्यापन मंदिरात शिक्षकांची आणि गणिताच्या प्रयोगकर्त्याची जागा घ्याल का ? "

मी उत्तर दिलं, "साहेब,जशी ईश्वराची इच्छा असेल तसं होईल. पण यावेळी मी आपल्याला सांगून टाकतो की, गणितात मी काही खास नवीन दाखवू शकणार नाही. "

## (६)

वार्षिक परीक्षा जवळ आली. मी माझ्या पद्धतीनं मुलांची परीक्षेची तयारी करून घेऊ लागलो. मुलं मोठ्या उत्साहानं तयार होत होती. मला माझी मुलं परीक्षेत यशस्वी होतील याबद्दल पूर्ण विश्वास होता.

परीक्षेचा दिवस आला. अधिकारी महाशयांनी सगळ्या वर्गांची परीक्षा घेऊन टाकली. आज माझ्या वर्गाची पाळी होती. आमच्या अटीप्रमाणे त्यांनी स्वतःच परीक्षा घ्यायची होती. ते हसून म्हणाले, "लक्ष्मीशंकरजी, मी तुमच्या वर्गाची परीक्षा घेणार नाही. तुमच्या वर्गातल्या सगळ्या मुलांना मी वरच्या वर्गात चढवतो. "

मी म्हटलं, "नाही, नाही साहेब. असं नाही होणार. असं केलंत तर माझ्या काही विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही. "

डायरेक्टर साहेबांनी विचारलं, "म्हणजे त्यांच्यावर अन्याय होईल ? "

मी म्हटलं, "हो. जी मुलं वर चढवण्याजोगी नाहीत, त्यांना मी वर चढवू शकत नाही. "

डायरेक्टर म्हणाले, "पण मला तर दिसतंय की तुम्ही सगळ्यांना चांगल्या प्रकारे शिकवलं आहे आणि तुमचं शिकवणं मला मंजूर आहे. "

मी म्हटलं, "आपलं म्हणणं बरोबर आहे. पण माझ्या पद्धतीचा सगळ्यांच्यावर सारखा परिणाम तर

**"त्यांच्यापैकी काहीजणांनी तर शाळा सोडूनच द्यावी. राघव न्हाव्याच्या मुलाचं इतिहास, भूगोल, गणितात मन लागत नाही. तो शाळेच्या वातावरणात उदास दिसतो. पण त्याला उरक इतका आहे की शंभर न्हाव्यांचा पालक होऊन एक मोठं दुकान तो चालवू शकेल. त्याला हजामतीतलं कौशल्य आणि 'सलून' व्यवस्थापन शिकवण्यासाठी मुंबईला पाठवायला हवं. "**

होत नाही ना ? काही काही मुलांना तर ती स्पर्शही करू शकली नाही. ते कोरेच्या कोरे राहिलेत. "

डायरेक्टर साहेबांनी विचारलं, " मग त्यांच्याबद्दल तुम्ही काय विचार केलाय ? "

मी म्हटलं, " त्यांच्यापैकी काहीजणांनी तर शाळा सोडूनच द्यावी. राघव न्हाव्याच्या मुलाचं इतिहास, भूगोल, गणितात मन लागत नाही. तो शाळेच्या वातावरणात उदास दिसतो. पण त्याला उरक इतका आहे की शंभर न्हाव्यांचा पालक होऊन एक मोठं दुकान तो चालवू शकेल. त्याला हजामतीतलं कौशल्य आणि ' सलून ' व्यवस्थापन शिकवण्यासाठी मुंबईला पाठवायला हवं. "

डायरेक्टर साहेबांनी विचारलं, " असं ? आणखी कोण कोण शाळेत जायला अयोग्य आहेत ?"

मी म्हटलं, " साहेब मुलं शाळेत जायला अयोग्य नाहीत. पण त्या शाळा त्यांच्यासाठी अयोग्य आहेत. ज्या कामांसाठी मुलं लायक आहेत ती कामं शाळा त्यांना शिकवत नाही. "

डायरेक्टर साहेब म्हणाले, " ठीक. ठीक. तसं का म्हणा ना. पण अशी कोण मुलं आहेत ? "

मी म्हटलं, " जीवनशेठचा मुलगा ' नेमी ' पोलिस खात्यात जायला लायक आहे. त्याला आखाड्यात पाठवा. शेठजींनी त्याच्या प्रवासाची थोडी सोय करून द्यावी. एखाद्या चांगल्या फौजदाराजवळ राहून त्यानं थोडा कायद्याचा अभ्यास करावा. पाच वर्षात उत्तम पोलीस होईल तो. आत्तापासून तो अर्ध्या शाळेवर हुकमत गाजवतोच आहे. "

त्यांनी विचारलं, " आणखी कोण कोण कच्चे आहेत ? "

मी म्हटलं, " अशा प्रकारे आणखी तिघं कच्चे आहेत. त्यांना मी या सुट्टीत माझ्याजवळ ठेवून घेणार आहे आणि पुढल्या इयत्तेसाठी तयार करणार आहे. साहेब, सध्याच्या आपल्या शाळांच्या पद्धती आणि अभ्यासक्रमाचा कठोरपणा यावर आपण काही उपाय करणार नाही का ? "

डायरेक्टर साहेबांनी म्हटलं, " आत्ता हा विषय राहू दे. मी कितीतरी वेळा तुम्हाला सांगितलं आहे की, माझे हातपाय बांधलेले आहेत. बरंय मग. तुमच्या वर्गाची परीक्षा संपली असं समजू या ? "

मी म्हटलं, " नाही साहेब. "

डायरेक्टर साहेब थट्टेत म्हणाले, " सहामाही परीक्षेच्या वेळी तुम्ही जसे विशेष कार्यक्रम केलेत तसेच आज पण दाखवायचा विचार आहे की काय ? आता आम्हाला तुमच्या सगळ्या युक्त्या कळल्यात. "

" साहेब मुलं शाळेत जायला अयोग्य नाहीत. पण ह्या शाळा त्याच्यासाठी अयोग्य आहेत. ज्या कामांसाठी मुलं लायक आहेत ती कामं शाळा त्यांना शिकवत नाही. "

## (७)

आज आमच्या शाळेचं संमेलन होतं. दरवर्षी परीक्षेनंतर असं संमेलन होतं. जी मुलं परीक्षेत चांगल्या नंबरानं पास होतात त्यांना आज बक्षिसं दिली जातात. संमेलनासाठी गावातले शेठ, सावकार, अंमलदार सगळे आले होते. साहेबांनी या प्रसंगी कार्यक्रम करण्याचं काम माझ्यावर सोपवलं होतं. मी हे काम माझ्या विद्यार्थ्यांवर सोपवलं होतं. माझ्याकडून फक्त सूचना आणि सल्ला घेऊन त्यांनीच बाकी सगळं केलं होतं.

प्रथम टिपऱ्यांच्या तालावर रासक्रीडा सुरू झाली. अर्धा तास त्यांनी नृत्य केलं. मग स्पर्धा सुरू झाल्या. धावण्याची, लंगडीची, तीन पायांची, संगीत

खुर्चीची, अशा अनेक स्पर्धा. लोक एकटक खेळ पाहात होते. खेळ संपल्यावर मूक नकलांचा कार्यक्रम झाला. कोणी गावच्या शेठजींची, कोणी शिक्षणाधिकाऱ्याची, कोणी फौजदाराची, कोणी देशाच्या नेत्यांची अशा सुंदर नकला केल्या. त्यानंतर मुलं त्यांनी काढलेली चित्रं घेऊन आली आणि झुकझुक करून प्रत्येकाला ओळीनं दाखवू लागली. सगळा प्रेक्षकवर्ग मुलांची चित्रं पाहण्यात गुंग होऊन गेला.

शेवटी पारितोषिक वितरणाचा समारंभ होता. दरवर्षी १२५ रु.ची बक्षिसं वाटली जात. ही बक्षिसं मुलांना मिळायची.

शेवटी डायरेक्टर साहेबांनी नेहमीप्रमाणे दोन शब्द सांगितले. ते म्हणाले, "सज्जनहो, माझ्या मते आजचं हे संमेलन वेगळ्या प्रकारचं आहे. माझ्या शेजारी बसलेल्या या गृहस्थांनी बक्षिसांच्या बाबतीत मला एक नवीन धडा शिकवला आहे. या वर्षीच्या १२५ रु.ची मी बक्षिसं वाटणार नाही, तर या रकमेतून यांच्या नावानं शाळेत एक वाचनालयाची स्थापना होईल. मी वरच्या अधिकाऱ्यांकडून त्यासाठी आदेशही मिळवला आहे. यापुढे दरवर्षी बक्षिसाची ही रक्कम वाचनालयालाच दिली जाईल. आपल्याला ही आनंदाची बातमी सांगताना मला मनापासून आनंद होतो आहे. व्यक्तिगत बक्षिसं देऊन मुलांमध्ये अहंगंड आणि न्यूनगंड निर्माण होतात. आता नव्या पद्धतीप्रमाणे ह्या बक्षिसाच्या रकमेचा सर्वांनाच लाभ होईल. मला बक्षिसांमधला फोलपणा समजावून देणाऱ्या आणि या प्रयोगाचा अनुभव देणाऱ्या माझ्या या मित्राचे मी सर्वांच्या देखत आभार मानतो."

"या प्रसंगी मला हेही सांगावंसं वाटतं की हे गृहस्थ केवळ चौथीच्या वर्गावर वर्षभर प्रयोग करण्यासाठी माझ्याकडे आले होते. त्यावेळी मी त्यांना पढतमूर्ख समजलो होतो. मला असं वाटलं की असे खूप लोक असतात, ते प्रयोगांच्या कसोटीवर घासले गेले की पळून जातात. त्यांच्यापैकीच हे असावेत म्हणून मी त्यांना परवानगी दिली. मला हे सांगितलं पाहिजे की माझा यांच्यावर मुळीच विश्वास नव्हता.

पण आता मला हे मान्य करतानाही आनंद होतो आहे की, यांचे प्रयोग यशस्वी झाले आहेत.

> या वर्षीच्या १२५ रु. ची मी बक्षीसं वाटणार नाही तर या रकमेतून यांच्या नावानं शाळेत एका वाचनालयाची स्थापना होईल.

माझ्या विचारांमध्येही यांनी महत्त्वाचं परिवर्तन घडवलं आहे. मला माझा आतला आवाज असं सांगतो आहे की, प्राथमिक शाळा चालवण्याच्या या जुनाट पद्धतीचा लवकरच अंत होईल. आपल्यासारख्या शिक्षकांनी आणि अधिकाऱ्यांनी राजीखुषीनं निवृत्त होऊन नव्या पिढीच्या शिक्षणतज्ज्ञांना आणि कल्पक विचारवंतांना आपल्या जागा रिकाम्या करून द्यायला हव्यात.

सज्जनहो, माझा आनंद कसा व्यक्त करावा हेच मला समजत नाही. यांच्या वर्गातल्या या मुलांकडे पाहा. किती व्यवस्थित, निरोगी आणि आनंदी दिसतायत ती! यांच्या शक्तीच्या आणि बुद्धीच्या विकासाचा मी साक्षीदार आहे. या मुलांबद्दल त्यांचे पालक समाधान व्यक्त करतानाही मी अनेकदा ऐकलं आहे."

डायरेक्टर साहेबांचं भाषण संपल्यावर संमेलनही संपलं. सगळे आपापल्या घरी गेले.

मी पण एक वर्षाच्या माझ्या प्रयोगाच्या यशावर खूष होऊन घरी आलो आणि नवीन शिक्षणाच्या उज्ज्वल भविष्याचं मधुर स्वप्न पाहण्यात मग्न झालो.

□ □ □

८–५–१९३२, अक्षय्यतृतीया

# इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ एजुकेशन

१२८/२, जे. पी. नाईक पथ, कोथरूड,

पुणे ४११ ०३८